
साप्ताहिक १२ ऑक्टोबर १९८५/दोन रुपये

# माणूस

## राज करेगा खालसा!







साप्ताहिक

# माणूस

□

**वर्ष : पंचविसावे**

**अंक : विसावा**

□

**१२ ऑक्टोबर १९८५**

**किंमत : दोन रुपये**

□

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

□

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेघा राजहंस**

□

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर



# मुंबापुरी

## □ मोर्चे बांधणी

कामगार आघाडीचे नेते डॉक्टर दत्ता सामंत यांनी झोपडपट्टीबासीयांचा एक प्रचंड मोर्चा गेल्या शुक्रवारी मंत्रालयावर नेला. कमीत कमी चाळीस हजारावर लोक त्यात सामील झाले जॉर्ज फर्नांडिस ह्यांनी आधीच झोपडपट्ट्या हटविण्याची मोहीम सुरू झाली, तर रक्ताचे पाट वाहतील असा इशारा दिला आहे. त्यामुळे मुंबापुरीतील श्रीमंतांची आणि मध्यमवर्गीयांची पार गाळण उडाली आहे. त्यांच्या या इशाऱ्यानंतर त्यांच्याच हिंद मजदूर पंचायतेने झोपडपट्टीवासीयांकडून दहा दहा रुपयांचे फॉर्मस् भरून घ्यायला सुरुवात केली आहे. कॉंग्रेस आयने देखील मालाड येथे झोपडपट्टीतील रहिवाश्यांचे नेत्रदिपक संमेलन भरविले आणि त्याला डॉक्टर व्ही. सुब्रमण्यम आणि मुरली देवरा ह्यांना निमंत्रित केले या संमेलनातील प्रवेशासाठी दोन–दोन रुपयांच्या पावत्या फाडण्यात आल्या.

एकूण काय तर पदपथावरील झोपड्यांबाबत सुप्रिम कोर्टाने दिलेल्या निर्णयानंतर आता सर्व राजकीय पक्षांनी मोर्चे बांधायला सुरुवात केली आहे. एकतीस ऑक्टोबरनंतर महापालिकेला अनधिकृत झोपड्या पाडायला सुरुवात करता येईल, असे सुप्रिम कोर्टाने सांगितले. फक्त शहात्तरपर्यंत आलेल्या झोपडपट्ट्यांचेच पुनर्वसन केले जावे, असा कोर्टाने निर्णय दिला. आता या निर्णयाच्या अंमलबजावणीची तारीख जशी जवळ येत चालली तसे सगळेच राजकीय पक्ष कोंडीत पडले आहेत.

झोपडपट्ट्यांचा प्रश्न हा सुप्रिम कोर्टाचा निर्णय किंवा महापालिकेचे प्रयत्न ह्यामुळे सुटणार नाही. जोपर्यंत राजकीय पक्ष ह्या प्रश्नाबाबत निश्चित धोरण स्वीकारत नाहीत तोवर मुंबापुरीचे हे वाढते बकाल स्वरूप थांबणार नाही. शहराच्या एकूण सत्याऐंशी लाख लोकवस्तीपैकी पंचेचाळीस लाख लोक झोपडपट्ट्यांत रहातात. आजच्या घटकेला या स्तरातील लोक ज्याप्रकारे संघटित झाले आहेत तेवढे संघटनासामर्थ्य महापालिका अथवा सरकार ह्यांकडे नाही.

खरे पहाता पदपथावरील झोपड्या पाडल्या जाव्यात की नाही हा वादाचा विषय असण्याचे कारण नाही. रस्त्यावरून वहानांना चुकवत चालण्याऐवजी पादचाऱ्यांनी पदपथांवरून चालावे ह्यासाठी पदपथांची योजना झाली आहे असे असताना प्रत्येकाला जगण्याचा हक्क आहे, अशा प्रकारची वेडपट परंतु उदात्त भूमिका पीयुसीएल आणि इतर काही डाव्या विचार सरणीच्या संस्थांनी घेतली. ह्यासाठी ते सुप्रिम कोर्टापर्यंत गेले आणि त्यामुळे गेली चार वर्षे मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्यांची वाढ झाली तरी महापालिकेला स्वस्थ बसण्याची पाळी आली.

लोकशाहीमध्ये व्यक्तीस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, मूलभूत हक्क वगैरे बरोबरच सामाजिक जबाबदारीचाही भाग असतो. व्यक्तिस्वातंत्र्य आणि संचारस्वातंत्र्य ह्याचा अर्थ गजबजलेल्या रस्त्यावर लोकांना प्रातर्विधी करण्यासही परवानगी देणे असा नाही. हे विधान ज्यांना अतिशयोक्त वाटते त्यांनी दादरचा सेनापती बापट मार्ग पहावा, किंवा भल्या पहाटे दहिसर ते अंधेरी असा लोकलने प्रवास करावा.

नगरपालिकेचे नियम सरसकट धाब्यावर बसवून पदपथावर आणि काही ठिकाणी रेल्वे मार्गाला लागून झोपड्या उभारल्या गेल्या आहेत. जोपर्यंत महापालिका नागरीनियमांची लोकांना काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास भाग पाडत नाही तोवर ह्या वाढीला आळा घालणे शक्य होणार

नाही. द. म. सुखथनकर, कुंदा कदम आणि आता काही प्रमाणात खैरनार ह्या अधिकाऱ्यामुळे जी काही थोडी फार दहशत निर्माण झाली होती तीदेखील आता ह्या सघटित नेतृत्वामुळे लयाला जात चालली आहे

दत्ता सामत ह्यानी लाखो रुपये खर्च करून, सगमरवरी दगड वापरून पवईला टोलेजग बगला बाधला आहे त्याच्या आसपास ते किती झोपड्या येऊ देतील हा वादाचा मुद्दा आहे. हिंद मजदूर पचायतेने नुकतीच सात लाखाला परळ येथे नविन इमारत विकत घेतली आहे. याच इमारतीत कार्यालय थाटून आता झोपडपट्टीवासीयाकडून दहा दहा रुपये गोळा केले जात आहेत. जॉर्ज फर्नांडिस याचा सतत देशभर दौरा चालू असतो. ते अधूनमधून जहाल भाषणासाठी मुबापुरीत अवतरतात. डॉक्टर सुब्रमण्यम आणि मुरली देवरा मलबार हिलवर राहतात. त्याना एखादा दिवस मालाडला जाण्याचा योग येतो.

उरता उरतो प्रश्न मध्यमवर्गीयाचा, ज्यांना ह्या वाढत्या बकाल वस्तीला सतत तोड द्यावे लागते. झोपडपट्ट्याकडून कोणत्याही स्वरूपाचा कर महापालिकेला मिळत नाही. परतु त्याच्या वाढत्या सख्येमुळे महापालिकेच्या पुरवठा यत्रणेवर मात्र ताण पडत आहे मध्यमवर्गाकडे त्याची बाजू समर्थपणे माडणारे नेतृत्व निवडून द्यायची ताकत नाही, आणि झोपडपट्टीतील मतदाराच्या जोरावर निवडून येणारे राज्यकर्ते मात्र त्यानी भरलेल्या कराच्या आधारावर राज्य चालवितात.

### ☐ 'क्रियेटिव' कामे

कोणी सन्यास घेतय म्हटलं की आम्हाला कससच होतं. कशाला नसते उपद्व्याप करायचे ?

सन्यास घेणारे भलेभले तोडावर आपटले. वसंतदादाचच घ्या ना. दादांनी मागे नव्हता का राजकारण सन्यास घेतला ? साधासुधा नाही. अगदी त्रिदडी. मग पुन्हा आले वळणावर. घराला आग लागलीये. मी स्वस्थ कसा बसू ? असं म्हणत पेटत्या आगीत आणखीन रॉकेल नाही का ओतलं दादानी ? वैजयतीमालेन तेच केलं सिनेमातनं संन्यास घेतला. राजकारणात 'टेक टू' सुरू केला.

मागे विनोद खन्नाने चित्रपट सृष्टी सोडली अन् रजनीशबुवाच्या नादी लागला. तेव्हा आम्हाला वाटल की हे सगळं काही दिवसापुरतंच आहे त्या स्मिता पाटील (की स्मिता पाटील–बब्बर ?) देखील भगवे कपडे पेहरून या खन्नांबरोबर असत. तेव्हा तर आमची खात्रीच पटली की हा आतरभारतीचा एक भाग आहे.

पण आता विनोद खन्नाने शेवटचं सागून टाकलय की तो सिनेमात पुन्हा कधीच दिसणार नाही. सन्यासात मग्न राहणार आणि हे बहुधा सिरीयस असावं. कारण मुक्त विचाराच्याकरारी स्मिता पाटीलनं विनोद खन्नाची वाट न पाहता राज बब्बरच्या नावे हिरवा चुडा, भरून टाकलाय. भगवे कपडे, रुद्राक्षमाळा गायब झाल्यात. भारी साडी, वेणीचा सट, हातात अळिता–मेंदी, पायात बिछवे अशा एकदम मुक्त, आधुनिक, प्रगल्भ स्त्रीच्या रुपात स्मिता हल्ली दिसते.

खन्नाबुवा तिथं ओरेगॉनमध्ये करतात तरी काय असा आम्हाला नेहमी प्रश्न पडे. त्याचही उत्तर मिळाल. ते खूप 'क्रियेटिव' असं काम करतात. म्हणजे, भाज्या चिरतात, खरकटं उचलतात, भांडी विसळतात. बहोत अच्छे !

विनोदजी, आपल्या माहितीसाठी सांगतो. स्मिता इथेही अशीच बरीचशी 'क्रियेटिव' कामं करत असते. उदाहरणार्थ, बब्बरबुवाच्या घरी सडा–समार्जन, स्वयपाकपाणी, दळण–काडण करून स्टुडियोत जाते. तिथनं 'जेसीज', 'जायट्स' अशा समाजोपयोगी संस्थाच्या सभा–समारभांना उपस्थित राहते. जोडघाने. मग घरी जाऊन पुन्हा केरवारे. झाडलोट. पाय चुरणे. वगैरे किती मस्त 'क्रियेटिव' काम आहेत !

स्मिताची आणि माझी अतिशय 'स्पेशल अँड ब्युटिफुल' रिलेशनशिप आहे असं विनोद आजही सांगतो. पण नेमक हेच तो भगवान रजनीशांच्याबद्दलही सांगतो, काय गौडबगाल आहे समजत नाही. यावर महेश भट्ट एखादं पिक्चर काढेल तर बरं होईल. कोडी सुटेल.

— विष्णु जयदेव

---

पुणे वार्ता

## काळा पैसा चलता है–चलता रहेगा

काळ्या पैशाबद्दल आम्हाला कौतुक आहे. तो आम्हाला जादुई वाटतो (अरेबियन् नाईटस् प्रमाणे सुरम्यही वाटतो) काळ्या पैशाचे कारनामे आम्हाला धन्य करतात. तो येतो कोठून आणि जातो कोठे याबद्दल आम्हाला कुतुहल असते (तो आम्हाला चुकून का होईना मिळावा असे आम्हाला नेहमी वाटते– पण आमचाच सफेद पैसा दुसऱ्याच्या तिजोरीत जाताना काळा होताना आम्ही पहातो–त्यावेळी आमचा वासलेला 'आ' मिटता मिटता नाकीनव येते )

तेव्हा एखादा आयकरवाला बडा अधिकारी या विषयावर बोलणार म्हटल्यावर आमचे कुतुहल जागे होते. शुक्रवारी चार तारखेला गोखले अर्थशास्त्र सस्थेत निवृत्त आयकर अधिकारी व्ही. एस गायतोंडे काळ्या पैशावर बोलणार असल्याचे कळते. आम्ही मनातल्या मनात सयोजकाचे–पुणे विद्यापीठ विधी विभागाचे आभार मानतो.

व्ही. एस गायतोंडे आम्हाला परिचित असतात एक कर्तबगार अधिकारी म्हणून. पुण्यातही त्यानी आयकर अधिकारी म्हणून काम पाहिलेले. सध्या आयकर खात्याच्या अॅपीलेट ट्रॅब्यूनलवर ते सदस्य आहेत. त्याच्या सपन्न अनुभवाबद्दल ते काही बोलतील अशी आमची अपेक्षा असते. पण गायतोंडे तसं बोलत नाहीत. ते आधीच सागून मोकळे होतात 'मी सरकारी माणूस म्हणून बोलणार नाही.' आणि आमच्या पदरी मोठी निराशा येते.

गायतोंडे अस्सल प्राध्यापकी थाटाने काळ्या पैशाच्या सदर्भात विवेचन करतात, तेव्हा हा विषय क्रमिक पुस्तकातला एखादा धडा होऊन जातो. गायतोंडे विषयाच्या सर्वांगानी बोलतात, पण बोलताना स्वत चे भाष्य करीत नाहीत. ते काळ्या पैशाची व्याख्या सागतात, त्याच्या निर्मितीचे स्त्रोत सागतात, कायद्यातल्या तरतुदी सांगतात,

कायदा कसा वागतो तेही सांगतात. पण हे सारे सागताना ते विषयाच्या काठाने फिरतात आणि एकूणच या जिवत समस्येला 'अॅकॅडेमिक' स्वरूप देतात. कदाचित एकूणच व्याख्यानाचे स्वरूप अॅकॅडेमिक असावे असे त्याना वाटले असावे. ( कदाचित सयोजक पुणे विद्यापीठ विधी विभाग आहे म्हणूनही असेल )

काळा पैसा म्हणजे आयकरापासून लपवलेले उत्पन्न. काळा पैसा आणि त्याचे वाढते प्रमाण ही देशातील मोठी आर्थिक व सामाजिक समस्या आहे. काळ्या पैशामुळे सरकारी तिजोरीत घट येते व पर्यायाने विकास कार्यक्रमाना पैसा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे ही कामे एक तर होत नाहीत किंवा लाबणीवर पडतात. या समस्येवर गायतोडे दृष्टिक्षेप टाकतात खरे; पण काळ्या पैशाचा मुख्य स्त्रोत काळे धदे हाच आहे. मटका, जुगार, स्मगलिंग आणि इतर बेकायदेशीर कामे यातून मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण होतो आहे आणि हा पैसा देशात समांतर अर्थव्यवस्था राबवतो आहे ही देखील एक गभीर समस्या आहे. शिवाय हा काळा पैसा कोणत्याही उत्पादक कार्यक्रमावर वापरला जात नाही. चित्रपट, पर्यटन, हॉटेल्ससारख्या अनुत्पादक व्यवसायामध्ये हा मोठ्या प्रमाणात वापरला जातो. पर्यायाने राष्ट्रीय उत्पादनातही घट येते.

काळ्या पैशाचे निर्मूलन व्हावे यासाठीच्या विविध उपायावर मोठी चर्चा सर्वत्र चालू आहे. अर्थमंत्र्यानी चालू अंदाजपत्रकाच्या अनुषगाने काही पावले उचललीही आहेत. उदा. राजकीय पक्षाना देणग्या देण्यास स्वातंत्र्य, विविध परवाने, बंधने सैल करणे वगैरे पण या साऱ्यानी काळा पैसा कमी होईल का, हा खरा प्रश्न आहे. अगदी टोकाला जाऊन बोलताना आयकर रद्द करावा असेही म्हटले जाते. आयकर रद्द झाल्याने हे चुकवलेले उत्पन्न आपोआपच प्रत्यक्ष उत्पादनावर वापरले जाईल असे काहीना वाटते. पण ही देखील नाण्याची एक बाजूच असेल. कुणी आयकरापेक्षा प्रत्यक्ष खर्चावर कर ( Expenditure Tax ) अंमलात आणण्याविषयी चर्चा करतात.

या सदर्भात कायद्याची बाजू घट्ट होणे आणि त्याच्या अमलबजावणीत फटी असता कामा नयेत हे महत्त्वाचे. स्मगलर्स आणि काळा बाजारवाले याना अजूनही कायदा घट्ट बांधू शकत नाही आणि राजरोसपणे त्याचे धदे चालू राहतात ही खेदाची बाब आहे.

कायद्याच्या अमलबजावणी बरोबरच कठोर शिक्षाची तरतुद आवश्यक आहे. आपला कायदा शिक्षेच्या बाबतीत फारच सौम्य आहे. खुनासारख्या गुन्ह्यालाही फाशी क्वचितच असते जन्मठेपदेखील फक्त १४ वर्षाची असते अमेरिकेसारख्या देशात दीर्घ मुदतीच्या शिक्षा ५० हूनही अधिक वर्षांच्या असतात.

गायतोडेंसारखे अधिकारीही ह्या विषयावर जपून भाष्य करतात. आपल्या संपन्न अनुभवानतरही प्रकट विचार माडत नाहीत तेव्हा आपण फार काही घडण्याची अपेक्षाही करू शकत नाही. अर्थातच ब्लॅक मनी चलता है– चलता रहेगा !

## ब्रिटिश कौन्सिल ग्रंथालयाची २५ वर्षे

पुण्यातील ब्रिटिश कौन्सिल ग्रंथालयाने नुकताच रौप्यमहोत्सव साजरा केला. या निमित्ताने गुरुवारी तीन तारखेला ग्रथालयातच एक छोटेखानी समारभ सपन्न झाला या छोटेखानी समारंभाला पाहुणे मात्र बडे होते. ब्रिटिश उच्चायुक्त रॉबर्ट बेडगेरी आणि नभोवाणी मत्री विठ्ठलराव गाडगीळ उपस्थित होते.

पुण्याचे हे ग्रंथालय सर्वच दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावर कॉलेज शेजारी एका टुमदार इमारतीत ते थाटलेले आहे. गेल्या २५ वर्षात पुण्याच्या शैक्षणिक क्षेत्रात या ग्रथालयाने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली आहे. साहित्य, अर्थ, शास्त्र, तंत्रज्ञान या सर्वच शाखातील मान्यताप्राप्त सदर्भग्रथ या ग्रथालयाने उपलब्ध करून दिले आहेत ग्रथालयाचे आज मितीस दहा हजारावर सभासद आहेत आणि सदतीस हजारावर पुस्तके आहेत. भारतातील इतर ब्रिटिश कौन्सिल ग्रथालयामध्ये हा उच्चांक आहे.

डॅ. विठ्ठलराव गाडगीळ अशा समारभात नेहमीच छान बोलताना आम्ही ऐकले आहे. शिवाय ते पुण्याचे आहेत. या स्वरूपाच्या समारंभासाठी जसे बोलावे लागते तसेच ते बोलले.

त्यांच्या बोलण्यातून पुण्याविषयीचा 'पुणेरी' अभिमान डोकावला (त्याचा आम्हालाही अभिमान वाटला) ब्रिटिश कौन्सिल ग्रंथालयाशी असलेल्या त्याच्या सबधाविषयी आणि आठवणीविषयी ते मिष्किलपणे बोलले. (आम्हालाही गुदगुल्या झाल्या) आणि जाता जाता पुस्तकाच्या सदर्भात ग्रथालयाच्या जबाबदारीविषयी बोलून त्यानी भाषण थाबविले.

सर रॉबर्ट बेडगेरी यानी ब्रिटिश कौन्सिलच्या माध्यमातून भारतात शिक्षण क्षेत्रात ब्रिटनने केलेल्या कार्यामुळे आपल्याला आनंद व अभिमान वाटतो आहे असे सांगितले. पुण्यातील ग्रंथालयाच्या कार्याचाही त्यानी गौरव केला. ब्रिटन-भारत साहचार्याबद्दल त्यांनी भाष्य केले ब्रिटिश कौन्सिलने या निमित्ताने भरवलेल्या पुस्तक प्रदर्शनाचे डॅ. गाडगीळानी उद्घाटन केले.

रौप्यमहोत्सवानिमित्त समारंभाचे औचित्य आम्ही समजू शकलो; पण या निमित्ताने आणखी काही विधायक कार्यक्रम कौन्सिलने आयोजित करायला हवे होते असे वाटते. ग्रंथालयाचे या रौप्यमहोत्सवानिमित्त अभिनदन !

—मनोहर सोनवणे

सास्कृतिक डोंबिवली

## बँकेचे अनुदान वितरण अटलजींची सभा

महाराष्ट्रातील काही भागातून दुष्काळाच्या भीषण सकटाची चाहुल लागत आहे. मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित दुर्भिक्षाचे सावट त्या विभागावर पडू लागले आहे; पण ठाणे जिल्ह्यात पावसाने छान कामगिरी केल्याचे लक्षात येते आहे. त्यामुळे ह्या परिसरात सुगीचे दिवस जाणवू लागले आहेत. डोंबिवली हे नगर प्रामुख्याने नोकरदाराचे आहे. डॉ. वि. म. दाडेकराच्या शब्दात सागायचे झाले, तर ओला वा सुका दुष्काळ

पडला तरी एक तारखेला टिच्चून पगार घेणाऱ्याचे हे नगर आहे. जून ते सप्टेंबर हे चार महिने काही अपवादात्मक दिवस सोडले आणि गणेशोत्सवाचे दहा दिवस वगळले तर सास्कृतिक आघाडीवर सारी सामसूम अशाच प्रकारचे असतात. पावसाने आपली माया पूर्णपणे पसरून काढता पाया घेतला की ह्या नगरीतील सास्कृतिक कार्यक्रमाच्या उधाणाला सुरुवात होते. नारळी पौर्णिमेनंतर सागराचे उधाण संपले की, दर्यातील चदेरी दौलत मिळविण्यासाठी कोळी आपल्या होड्या मोठ्या निर्भयतेने सागरावर लोटतात त्याप्रमाणे डोंबिवलीच्या सास्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते सप्टेंबर महिना सपत आला की ह्या चार महिन्याच्या काळात मनाशी योजलेल्या अनेक कल्पनाच्या होड्या जनसागरावर खुशाल विहार करण्यासाठी मोकळ्या सोडतात. त्याची साक्ष पटविणारे कार्यक्रम सुरू झाल्याचे दिसत आहे. एकामागोमाग एक कार्यक्रम आकाराला येऊ लागले आहेत, आणि शात असणारे डोंबिवलीचे सास्कृतिक जीवन गजबजू लागले आहे !

आध्र बँकेच्या डोंबिवली शाखेच्या उद्घाटनासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. कोणा (कोना ?) प्रभाकर राव हे खास हेलिकॉप्टरने आले. त्याचे आगमनही वास्तविक डोंबिवलीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाची आनंदाची, अभिमानाची घटना. पण ते आले अवेळी, त्यामुळे ग्रामस्थांनी फारशी दखल घेतली नाही आणि त्याचे येण्याचे कारणही तसे फारसे महत्त्वाचे नसल्यामुळे सर्वसामान्याच्या दृष्टीने ती सभा फारशी उत्सुकता निर्माण करणारी ठरली नाही. उलट ‘ राज्य पाल भेटीसाठी लाखोची उधळपट्टी ’ झाली म्हणूनच वाजली, गाजली. ‘ ही शाखा आध्र बँकेची होती म्हणून राव महाशय आले ’ अशीही कुजबूज ऐकू आली. एक मोहरा वाया गेला अशीही हळहळ व्यक्त झाली.

दोन ऑक्टोबरच्या मुहुर्तावर डोंबिवली नागरीक सहकारी बँकेने आयोजित केलेला विशेष पुरस्कार अनुदान समारभ हा दीर्घकाल लक्षात राहील असा कार्यक्रम होता. सप्टेंबर १९७० मध्ये स्थापन झालेल्या ह्या सहकारी बँकेने आपल्या सुरुवातीपासून एक चागला उपक्रम सुरू केला आहे. दरवर्षी झालेल्या नफ्यातून काही भाग धर्मादाय म्हणून सेवाभावी सस्थाना देण्याचे ठरविले. अगदी पहिल्या वर्षी रु १८४/– नफा झाला तरी त्यातला सुमारे ४०/– रुपयांचा वाटा बाजूला ठेवला आज ह्या बँकेचे सतरा हजार आठशे सभासद आहेत तेहतीस लाख भाडवल आणि ठेवी दहा कोटीच्यावर आहेत. अर्थात् नफ्याचे प्रमाणही काही लाखात गेले असल्यास नवल नाही सेवकवर्गाशी व्यवस्थापनाचे सबध अगदी जवळिकीचे, खेळीमेळीचे आहेत त्याना संतुष्ट ठेवूनही ह्यावर्षी लाख भर रुपये बेचाळीस सस्थाना अनुदान म्हणून देण्याचे ठरविले समाजाचे ऋण व्यक्तीनेच नव्हे तर आर्थिक सामाजिक सस्थानीही फेडावे. सहकारी सस्थानी, बँकानी हे ऋण कसे फेडावे ह्याचा उचित आदर्श ह्या संस्थेने घालून दिला.

हा अनुदान वितरण सोहळा सस्मरणीय झाला ह्याचे एक कारण म्हणजे अवघ्या भारताचे दुसरे (पहिले अर्थात पतप्रधान राजीव गाधी) लाडके व्यक्तिमत्व श्री. अटलबिहारी वाजपेयी ह्यांच्या हस्ते हा सोहळा साजरा झाला. ऑगस्ट महिन्यापर्यंत आलेल्या विविध सामाजिक, सास्कृतिक, शैक्षणिक सस्थाच्या अर्जांतून निवड करून त्या संस्थाना पाचशे रुपयापासून पाच हजार रुपयापर्यंतचे अनुदान (गिफ्ट चेक्सरुपाने) दिले महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या सत्तेचाळीस सस्थाच्या अर्जांतून ह्यावर्षी बेचाळीस सस्थाना हे अनुदान दिले. त्यात अधिक सख्येने ठाणे जिल्हयातील सेवाभावी सस्था होत्या हे सागणे, लिहिणे नलगे. वृत्तपत्रातून आवाहन न करता ह्या अनुदान योजनेला मिळत असणारा प्रतिसाद लक्षणीय आहे.

श्री. अटलजीचे भाषण डोंबिवलीत आहे असे ऐकल्यानंतर, वाचल्यानतर सारे रस्ते टिळक नगरच्या विद्यामदिराच्या दिशेने वाहू लागतील असे वाटले होते. सयोजकांचीही तीच अपेक्षा असावी, आणि म्हणून पटागण अपुरे पडेल, बाहेर असख्य माणसे जमतील, त्याची निराशा होऊ नये म्हणून क्लोज्ड सर्किट टी. व्ही. ची सोय केली होती पण अशी अफाट गर्दी झाली नाही. निवडणुकीच्या मोसमात अटलजीच्या सभेला डोंबिवलीत अफाट गर्दी होती. ह्यावेळेस असे का झाले? अटलजी मैफिलीचे वक्ते नसून मैदानवक्ते आहेत ह्यात शकाच नाही. आजचा त्याचा सूर असा मैदानी वक्तृत्वाचा नव्हता ते थोडेसे अतर्मुख होऊन अधिक गभीरपणे आर्थिक विचार माडण्याच्या मनःस्थितीत असावे असे वाटले पण त्याच्यावर प्रेम करणाऱ्या श्रोत्यांना विचारवत अटलजीपेक्षा प्रचारक अटलजी हवे असावेत असे वाटले. प्रचलीत राजकारणावर, सत्ताधाऱ्यावर हल्ला करणारे, उपरोध, उपहासाचे शस्त्र चालविणारे, चिमटे, धपाटे, घालणारे, मधूनच काव्याची लय साधणारे असे मैदान मारणारे वक्तव्य ऐकायला आलेल्या श्रोत्माना मात्र वेगळे अटलजी ऐकावे लागले सहकारी बँकेचा कार्यक्रम म्हणून त्यानी सरकारीकरणाला विरोध केला, तसाच व्यक्तिगत भांडवलशाहीलाही आपला कडवा विरोध आहे असे सागितले. सरकारीकरणापेक्षा सहकारीकरण हवे असे आवर्जून सांगितले. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याची स्तुती केली तर उत्तरप्रदेशातील सहकारी साखर कारखान्याचे सरकारीकरण झाल्याची खत व्यक्त केली रिझर्व्ह बँक सरकारचे एक खाते म्हणून काम करणार की एक स्वायत्त आर्थिक सस्था म्हणून काम करणार हे निश्चित झाले पाहिजे आजच्या ह्या भाषणात त्यानी कर्जावर राज्य चालू आहे ह्याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्याबद्दल बोलताना ते म्हणाले, ‘ विष्णूच्या पायाशी लक्ष्मी आहे. त्याचा निवास शेषावर ( सरप्लसवर ) आहे. सारे राजकारणच चिखलाने बरबटले आहे असे मुक्तचिंतन करणारा हा विचारवत. त्याच्यातील भा. ज. प. चा अध्यक्ष जागा होऊन पुढे म्हणाला ‘ त्या चिखलातही एखादे कमल (भा ज. प ची निशाणी) उगवतेच ’ अशा मुक्तचिंतनामुळे ह्या व्याख्यानाचा दर्जा उचावला होता; पण नेहमीचा हशा–टाळ्याचा गडगडाट मात्र नव्हता. अटलजी आता वृद्धत्वाकडे झुकू लागले आहेत असे वाटते त्याच्या रगात बदल होऊ लागला आहे; पण वक्तृत्वाला अधिक खोली येत आहे रगवण्या, रिझविण्यापेक्षा अतर्मुख होऊन अतर्मुख करण्याकडे ते लक्ष देतात असे वाटले. अर्थात प्रसगच तसा असल्यामुळेही वाटले असेल. एक लक्षात ठेवण्यासारखे

व्याख्यान झाले ह्यात शकाच नाही.

समारंभ संपल्यानंतर काही प्रतिक्रिया ऐकू आल्या, त्याची नोंद करावी असे वाटते. कार्यक्रमावर सुरुवातीपासूनच संघाची छाप जाणवत होती अनुदान मिळालेल्या संस्थाही संघ विचारसरणीच्या कार्यकर्त्यांच्या प्रभावाखालील होत्या; पण कार्यक्रम आज त्या कडव्या शिस्तीचा झाला नाही. पांढरपेशा, आदिवासी आणि कुष्टरोगी ह्याच्यात कार्य करणाऱ्या संस्थाना अनुदान मिळाले. दलित समाजात–चालल्या अस्पृश्य, हरिजनात काम करणारी एकही संस्था नव्हती, असे का ? 'बँकेची ओळख करून देण्याची गरज नाही,' 'अटलजीची ओळख करून देण्याची गरज नाही, असे म्हणत म्हणत विस्ताराने ओळख करून दिलीच. अहवाल वाचन, ओळख, आभार इ. प्रकार आपण टाळू शकलो नाही तरी ते कमीत कमी वेळात करता येणार नाहीत का ? महत्व होते वितरणाला, अटलजीच्या विचार प्रकटनाला. त्याला अधिक वेळ कसा मिळेल म्हणजेच मुख्य वक्त्याला जास्त वेळ कसा मिळेल हे संयोजकानी का पाहू नये ? आपल्या साऱ्याच कार्यक्रमात असे होताना दिसते. ते बदलता येणार नाही का ? अशा कार्यक्रमानी डोंबिवलीच्या जीवनातील सांस्कृतिक सुगीची साक्ष पटू लागते. ह्या शहरातील अनेक अभावाचा त्यामुळे विसर पडतो.

— चंद्रशेखर राजे

# ' माणूस ' दिवाळी अंकात

' गांधीवधानंतर झालेल्या जाळपोळीत आमचं घर जाळलं गेलं होत. घर म्हणजे घरातलं सगळंच सामान. कारण घरमालक मुसलमान होता. त्यामुळे घर जाळलं गेलं नाही उलट त्याच्या घराला कुठं धक्का लागू नये म्हणून आमचं घर जाळायला आलेल्यांनी खूप खबरदारी घेतली होती. ह्या गोष्टीला आता सदतीस वर्षं पूर्ण झाली होती. आणि आता इतक्या वर्षांनंतर मी पुन्हा एकदा ते जुनं घर बघण्यासाठी म्हणून एका वेडया हट्टानं कोल्हापूरला निघाले होते. या मधल्या काळात आम्ही कोल्हापूरलाच रहात होतो. लग्न होऊन गेले तरी दरवर्षी माहेरपणाला तिथं जात होते. जुनं घर आतून हिंडून बघायची इच्छा असूनही इतक्या वर्षात कधी ते घडलं नव्हतं. कदाचित तेवढया तीव्रतेनं वाटलं नसावं किंवा मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात नकोसंही वाटत असेल. '

गांधीवधानंतरच्या जाळपोळीत जळलेल्या घराच्या सलणाऱ्या आठवणीतून त्यावेळच वातावरण डोळ्यासमोर उभं करणारा ललित लेख — —

## नैहर छूटो जाय....

**प्रतिभा रानडे**

# शेअरबाजार

## नरमाईचा काळ

अर्थसंस्थानी काही उद्योगाचे समभाग विक्रीस काढून शेअर बाजारातल्या तेजीला दणका दिला होता. महिन्यापूर्वीच्या या घटनेमुळे 'नरम' झालेले बाजार अजूनही विशेष ' तेजी ' दाखवत नाहीये. तर 'नरमाईत' असलेल्या शेअर बाजाराची कारणं शोधण्याचा प्रयत्न केला असता, एक सोडून अनेक कारण ऐकावयास मिळाली. परंतु एकदरीत सूर निराशेचाच होता.

शेअर बाजारातील ' तेजी ' व ' नरमाई ' यांच्या समर्थनात अनेक कारणे सांगितली जातात. अर्थातच दलालाकडून; पण ती कारणे कोणत्याही प्रकारची असू शकतात. आता शेअर बाजार ही खरोखरच इतकी सवेदनाक्षम जागा आहे का ? की कोणत्याही घटनेचे दूरगामी परिणाम लक्षात घेऊन येथे प्रतिक्रिया व्यक्त होतात. का असे एखादे ' कारण ' शोधून धंदा वाढवायचा ही येथील जुन्या जाणत्यांची रीत आहे. सध्याच्या नरमाईची कारणे जी सांगितली जात आहेत त्यातील काही खालीलप्रमाणे.

' वित्तीय संस्थानी समभागांची विक्री थांबली आहे...अशी जरी ओरड काहीजण करत असले तरी वस्तुस्थिती तशी नाहीये. वित्तीय संस्था अजूनही, काही प्रमाणात विक्री करतच आहेत...' एक दलाल. ऐकण्यात येणाऱ्या कारणामध्ये सर्वात जास्त पटणारे कारण परंतु शेअर बाजारातील इतर कारणेही समोरचे ' गिऱ्हाईक ' हातून जाऊ नये...या दृष्टीनी दिल्यासारखी वाटतात शेअर बाजारात असलेल्या नरमाईमुळे तिथे येणारा माणूस निराश होऊ नये म्हणून दिली जाणारी कारणंसुद्धा असंख्य आहेत.

सध्याच्या नरमाईमुळे गुंतवणूक-दरात एकप्रकारची उदासीनता आली आहे आणि हीच नरमाई अजून काही काळ चालू राहिली तर मात्र त्याचा शेअर बाजारावर मोठा परिणाम होईल असे संबंधितांना

पृष्ठ ३१ वर

ह्या ना त्या निमित्ताने

# 'आखिर क्युं ?'

फिरोझ रानडे

'वा ! काय छान परीक्षण केलं आहे ह्या बाईनं !'

श्याम हातातले एक सडपातळ साप्ताहिक उघडून त्यातला मजकूर वाचून दाखवण्याच्या हेतूची प्रस्तावना करत म्हणाला.

ते साप्ताहिक नुसतेच सडपातळ नव्हते तर साधे–सुधे पण होते. आता साध्या व फोडणीच्या साप्ताहिकाबद्दल इतके बोलून वा लिहून झाले आहे की, त्याच्याबद्दल जास्त काही लिहण्या–बोलण्याची गरज नाही तरी पण जसा एखाद्या सस्थेचा चिटणीस 'आजचे व्याख्याते इतके प्रसिद्ध आहेत की त्यांच्याबद्दल काही सागण्याची गरज नाही' असे सागून चागले अर्ध्यातासाचे त्या वक्त्याच्या प्रसिद्धीबाबतचे भारूड लावतो त्याप्रमाणे सागायचे झाले तर साधी साप्ताहिके म्हणजे ज्यात जाहिरात फक्त नावाला असते व ललनाची चित्रे मधल्या पानावरच काय पण मुखपृष्ठावरसुद्धा नसतात उलट ज्या साप्ताहिकात दर पानागणिक एक जाहिरात व मधल्या पानावरसुद्धा ललनाच्या मुखाची व पृष्ठाची चित्रे असतात ती 'फोडणी' ची असे म्हणता येईल. असो.

श्याम आज कोणाबद्दल का होईना पण कौतुकाने बोलतो आहे हे बघून राधा धरून सगळ्या मडळीना प्रथम आश्चर्य वाटल व नतर त्या आश्चर्याच आनंदात रूपातर झाल व पुढे त्या आनदाचं प्रश्नात रुपातर झाल.

'कोण ही एवढी भाग्यवान बाई आहे ? श्याम काका कौतुक करताहेत म्हणून जरा..' तरुण कामतची तरुण बायको जरा चाचरत–चाचरत म्हणाली. कामताचा गणपती पाच दिवसाचा असल्यामुळे तो बोळवला गेला होता व आता कामत मडळी मोकळी झाली होती

'हो श्यामरावना काही पसत पडायचं म्हणजे अवघडच !' बर्वेगुरुजी म्हणाले. त्याचा 'मी अमुक तमुक' बाबतचा राग अजुनी गेला नव्हता.

'खरंच, काही वेळा अस वाटतं की राधाताईंना त्यानी पसंत तरी कस केल ?' हा प्रश्न कर्वेबाईंनी विचारला होता. प्रश्न ऐकताच राधाने आपले नाक मुरडले.

प्रश्न राधाला असला तरी तो श्यामला टोचून असल्यामुळे श्यामला त्याचे उत्तर देणे फार आवश्यक वाटले.

'त्याचं कारण फार सोपं आहे. लग्नाच्या वेळी माझी फक्त एकच अट होती. मुलगी बाकी कशीही असो फक्त ती पुण्याची नको एवढीच ती अट ! मग मुलीनाहो काय तोटा ? तश्या तोटयातल्या एका मुलीशी शेवटी लग्न केल !' .

श्यामने 'तोटया' वर अगदी क्षुल्लक विनोद केला व त्यावर अक्षुल्लक पद्धतीने म्हणजे मोठ्या पद्धतीने हसला व त्याला जोडून कर्वेबाई व कामतबाई क्षुल्लक हसल्या.

आधीच श्यामचा विनोद राधाला झोंबला होता. त्यात कर्वे–कामत बाई हसल्यामुळे तो जास्तच झोंबरा झाला होता त्यामुळे ती चिडून म्हणाली, 'काय झाला आहे हो तुमचा तोटा, माझ्याशी लग्न करून ? म्हणे पुण्याची मुलगी नको होती, पण शेवटी पुण्याचीच मुलगी मिळाली की नाही ? पुण्याच्याच मुलीशी लग्न करायला लागल ना ?' राधाच्या बोलण्यातला आनद आणि चीड स्पष्ट दिसत होती

'म्हणजे तुम्ही पुण्याच्या ?' कर्वेबाईंनी विचारल. त्या स्वतः पुण्याच्या होत्या.

'वाटत नाही तुम्ही पुण्याच्या असाल अस.' कामत बाई थाड्या राधाकडे थोड्या कर्वेबाईंकडे पाहात म्हणाल्या.

आता 'तुम्ही पुण्याच्या वाटत नाहो.' हे कामत बाईंनी म्हणायची काही जरुरी होती का ? पण दोघीजणो म्हणजे राधा व कर्वे बाई पुण्याच्या असूनही त्याच्यात फार फरक होता. राधाला लोकानी आपल्याकडे यावे–त्याचा आपण पाहुणचार करावा वगैरे वाटत असे. कामतबाईंनी त्याअर्थीच 'तुम्ही पुण्याच्या वाटत नाही' अस म्हटल हात.

'म्हणजे तशी मी कोल्हापूरची.' कामत बाईचे बोलणे कर्वेबाईंना उद्देशून होते. त्यामुळे राधाला आनद झाला होता. त्या आनदातच ती म्हणाली, 'तसा माझा जन्म पुण्याचा असला तरी सगळ आयुष्य कोल्हापूरलाच गेलं आमचं.'

'वाटलच मला तसं.' परत कामतबाई, कर्वे बाई काही तरी क्षणक्षणीत उत्तर देण्याच्या विचारात होत्या. तेव्हढ्यात बर्वे–गुरुजी म्हणाले, 'पण ज्या चागल परीक्षण लिहिल्याबद्दल तुम्ही त्या बाईचं कौतुक करताहात ती पुण्याचीच आहे ना ?'

श्यामने ते सडपातळ साप्ताहिक चाळले पण त्या साप्ताहिकाची लेखकाचे पत्ते वगैरे देण्याची पद्धत नव्हती त्यामुळे बर्वे–गुरुजीचा प्रश्न तसाच अनुत्तरीत राहिला.

'हे ह्या साप्ताहिकवाल्याच काहीतरीच आहे' कर्वेबाई, कामत बाईवरचा राग त्या साप्ताहिकावर काढत म्हणाल्या. 'काही मासिकातून कसं लेखकाच नाव, गाव–पत्ता अगदी सगळी माहिती दिली असते.'

'ते राहू द्या हो मी सहज श्यामरावना खिजवण्याकरता म्हटल' बर्वे गुरुजी म्हणाले 'श्यामराव तुम्ही कोणत्या सिनेमाच्या परीक्षणाबद्दल एवढी खुषी दाखवत होतात ?'

'ह्याच, स्मिता बब्बरच्या 'आखिर क्यु ?' ह्या सिनेमाबद्दल.'

'स्मिता पाटीलच्या' राधा श्यामला दुरुस्त करत म्हणाली

हल्ली हे नेहमीचेच झाले होते श्यामने स्मिता बब्बर म्हणून उल्लेख करायचा व राधाने तिला परत स्मिता पाटील बनवायची.

'पण मी म्हणतो ज्या नवऱ्याशी लग्न करताना काही वाटत नाही, त्याच नाव लावायला लाज कसली ? तुझ नाही माहेरचं अलाणे नाव होत, त्याच फलाणे केलस ?' श्यामने विचारले ते थोड्या रागानेच.

'माझ पहिल नाव काही स्मिता नाही आहे.' राधाने तडक उत्तर दिले. आणि त्या बाईप्रमाणे मी ठोस पण नाही आहे.'

'अहो विषय काय चाललाय आणि तुम्ही कसला वाद घालता आहात ? बर्वे गुरुजी गाडी परत रूळावर आणत म्हणाले त्या मडळीत ते वयोवृद्ध असल्यामुळे ही कामगिरी त्याना वेळोवेळी करायला लागे. 'हं, त्या स्मिता बब्बरच्या किंवा स्मिता पाटीलच्या सिनेमाबद्दल म्हटल तरी काय आहे ?'

'आणि सिनेमा तरी असा कोणत्या विषयावरचा आहे ? आणि तुमचं कौतुक कशाबद्दल ?' कर्वे बर्वेगुरुजीच्या मदतीला आले

'चित्रपटाचा विषय तसा हल्ली बराच कॉमन झाला आहे म्हणजे स्त्रियाच्याभोवती फिरणारे, त्याचे प्रश्न माडणारे सिनेमे आजकाल बरेच निघताहेत. हा त्यातलाच एक आहे.' श्याम आपले म्हणणे सागू लागला

'पण काका, ही सिनेमाची माहिती झाली. त्या परिक्षण करणाऱ्या बाईचं तुम्हाला एवढं काय आवडलं ?' कामतला कोणत्याही गोष्टीच चऱ्हाट लावलेल आवडत नसे.

श्यामने ते साप्ताहिक हातात घेतले व हवे ते पान उघडून म्हणाला, 'मी सगळं काही परीक्षण वाचत नाही. फक्त शेवटचा परिच्छेद तेव्हढा वाचतो.'

श्यामच वाचन सगळे कान देऊन ऐकू लागले. श्याम वाचू लागला,

'एकूण काय हा चित्रपट पाहिल्यावर तो काढला कशाला, आपण तो पाहिला कशाला, असे प्रश्न प्रेक्षकाला पडतात आणि 'आखिर क्यू ?' अशी त्याची अवस्था होते.'

श्यामचे वाचन झाल्यावर थोडी शांतता पसरली.

'पण म्हणून का त्या सिनेमाला 'आखिर क्यू ?' असे नाव दिले आहे ?' कर्वेबाईंनी भोळसटपणे विचारले.

सगळेजण वर्गातल्या नादार मुलाकडे वा आगगाडीतल्या विदाऊट – तिकिटवाल्याकडे ज्या अनुकपेने पहातात त्याप्रमाणे कर्वेबाईंकडे पाहू लागले. परत काही वेळ शातता पसरली.

'मग तस बघायला गेल तर बहुतेक हिंदी सिनेमांना 'आखिर क्यू ?' हे नाव द्यायला लागेल !' कामत उमळून म्हणाला. सिनेमा कोणत्याही विषयावर असो, कोणीही तो काढो व कोणीही त्यात काम करोत, बहुतेक वेळा 'आखिर क्यू ?' असाच प्रश्न पडतो.'

'पण मग 'आखिर क्यू ?' हा किताब फक्त हिंदी सिनेमानाच का ?' कामतबाई हिंदी सिनेमाच्या पक्षाची होती. तिचे म्हणणे असे की हिंदी सिनेमाचा डोक्याला ताप नसतो. 'कितीतरी मराठी नाटक 'आखिर क्यू ?' पद्धतीची असतात. 'परवा आपण कोणते हो ते नाटक पाहिल ?' कामतबाईंनी कामताना प्रश्न केला.

आता ह्या प्रश्नाच उत्तर देण कामताना फार अवघड होत. ते दोन कारणाकरता. एकतर कामतबाईंचं किंवा कोणत्याही बाईच 'परवा' म्हणखे खरोखरीच्या परवापासून ते अगदी सात–आठ महिन्यापूर्वीच सुद्धा असायचा संभव असतो. दुसरं कारण म्हणजे आजकाल इतकी मराठी नाटक 'आखिर क्यू ?' प्रश्नायोग्य निघत होती की त्यातले नेमके एक सागणे अवघड होतं.

कामतला तसाच विचारात ठेवून कर्वे म्हणाले, 'मग फक्त सिनेमा वा नाटकच 'आखिर क्यू ?' काय म्हणून ? कितीतरी कादंबऱ्या 'आखिर क्यू ?' पद्धतीच्या असतात अगदी चांगल्या चांगल्या बायकांनी लिहिलेल्या सुद्धा !' कर्व्यांच्या स्त्रियांबाबतच्या काही ठोस कल्पनः होत्या.

'पण मग फक्त कादंबऱ्याच का ? ते दूरदर्शनवर होणारे कार्यक्रम, त्यातल्या त्यात ती घरगुती नाटकं–कोणी बाई वा पुरुष म्हातारा दाखवायचा झाला की त्याच्या वा तिच्या केसात पांढरी पावडर टाकली की झालं गचाळ लिखाण, तितकंच भिकार दिग्दर्शन, तितकीच भिकार सगळ्यांची कामं ! दर आठवड्याला एकदा तरी हा 'आखिर क्यूं ?' हा प्रश्न पडतो.' राधाचा ह्या कोणत्याही तऱ्हेचा प्रकाश न पाडणाऱ्या दिव्याच्या कार्यक्रमावर फार राग होता.

'मग तोच कार्यक्रम फक्त 'आखिर क्यू ?' काय म्हणून ?' आता बर्वेगुरुजी सुद्धा 'आखिर क्यूं ?' चळवळीत सामिल झाले. 'ते मुलाखतीचे कार्यक्रम तरी कसे असतात ? प्रश्न विचारणारी बाई प्रश्न विचारते आहे की उत्तर देते आहे हेच कळत नाही ! आता बोला !'

असे म्हणून त्यांनी श्यामकडे पाहिले; पण श्यामच्या गोटात काहीच हालचाल दिसेना 'तुम्ही विषय सुरू केलात आणि आता तुम्हीच शांत ? आखिर क्यु ?' राधाच्या ह्या प्रश्नाने मोठा हंशा पिकला.

पिकलेला हंशा थोडा शांत झाल्यावर श्याम म्हणाला, 'मी बोललेलं तुम्हाला आवडत नाही. म्हणून मी काही बोलणारच नाही आहे.'

'अय्या !' राधा आधुनिक स्त्रियांप्रमाणे कधी अय्या वगैरे म्हणत नसे. पण श्यामच्या उत्तराने तिला अगदी राहवले नाही. 'तुम्ही कधीपासून लोकांच्या आवडण्या-नावडण्याची पर्वा करायला लागलात ?'

'आता मी ठरवलं आहे की फक्त कौतुकाचं तेवढंच फक्त बोलायचं !' श्यामने गंभीरपणे उत्तर दिले.

'श्याम काका, हे मात्र टु मच हां !' कामत म्हणाला. 'सिंहच स्वतः पाला–पाचोळा खातो म्हणू लागला तर ?'

'खरंच, तुमच्या काही काही कॉमेन्टस फार छान असतात.' कर्वेबाईंनी श्यामला उत्तेजन दिले.

'का तुम्हाला आज काही सुचत नाही आहे ?' राधाने सापाच्या शेपटीवर पाय ठेवत विचारले.

'न सुचायला काय झाले ?' श्याम तडकून म्हणाला. 'पण तुम्हा लोकाना आमचं म्हणणं पटत नाही ना ?'

'ते आम्ही आमचं बघून घेऊ !' बर्वेगुरुजी म्हणाले 'तुम्ही सागा तर खर, काय सागायचे आहे ते !'

आता बर्वेगुरुजींनीच भर घातल्यावर श्यामला काही न बोलणे शक्य नव्हते.

'खर म्हणजे आपल्या देशाचे तरुण पंतप्रधानच 'आखिर क्यु ?' आहेत.' श्याम शातपणे म्हणाला.

'मला वाटलच गाडी शेवटी आमच्या राजीवजीवरच येणार म्हणून,' राधा श्यामला आपले बोलणे पुरे न करू देताच म्हणाली.

'बघा, मी म्हटलं नव्हतं ? तुम्हा लोकाना आवडणार नाही म्हणून' श्याम थोडासा नाराज होऊन म्हणाला.

'राधाताई, तुम्ही किंवा दुसरे कोणीही मध्ये बोलू नका' बर्वेगुरुजी म्हणाले, 'हं सांगा श्यामराव आमचे पतप्रधान 'आखिर क्यु ?' कसे ठरतात ?'

'ही मंत्रिमडळाची बदलाबदल पाहिलीत ?' श्यामने प्रश्न केला

'पण तो अधिकारच आहे त्याचा !' कामत मध्येच म्हणाला.

'कामत, काय ठरलं आहे आपल ? मध्ये बोलायच नाही.' परत बर्वेगुरुजी.

'अधिकार वगैरे ठीक आहे पण त्याला काही अर्थ ? यु. पी. मध्ये पुराचा इतका धुमाकूळ चालला आहे. तर पतप्रधानानी काय करावं ? तर त्या तिवारीला उचलला व टाकला उद्योग मत्रालयात ! जसा काही उद्योग मंत्रालयाचा जीव चालला होता.'

'इतकी जाहिरातबाजी करून नव्या शिक्षणाची उदोउदो केली व त्याचं काही होण्याआधीच त्या पताला तेथून काढला ! आता नवीन मत्री ते सगळ समजावून घेणार आणि मग त्या नव्या शिक्षा–नीतीचा अंमल होणार ! असा तुम्ही बदल केल्यावर तुम्हाला शिक्षणाबद्दल खरंच काही तरी करायचं आहे ह्याच्यावर कोण विश्वास ठेवेल ?

त्या गनीखान चौधरीला रेल्वेमत्रालय साभाळता आल नाही, त्याला दिलं जास्त महत्वाच मत्रालय ! आणि बाकी सगळे भुरटे अदलाबदल. ज्याच्याकडे 'पोलाद' होतं त्याचेकडे 'खत' दिलं ! वहावा !

हे सगळं पहिल मंत्रिमंडळ आल्यानंतर किती दिवसात ? तर फक्त आठ महिन्यात! मग प्रश्न पडतो, 'आखिर क्यु ?' □

### पंजाब निवडणुका

# आणखी एक प्रांत प्रादेशिक पक्षाच्या हाती गेला

अविनाश भगवंत धर्माधिकारी

चंडीगढहून प्रसिद्ध होणाऱ्या 'ट्रिब्यून'मध्ये निवडणुकीपूर्वीच्या-काळात रोजच्या रोज मोठ्या मोठ्या अर्ध्या किंवा पूर्ण पानाच्या जाहिराती येत असत. दहशतीनं दबून न जाता लोकांनी मतदानासाठी बाहेर पडावं म्हणून लोकांना उद्युक्त करण्यासाठी या जाहिरातींची रचना होती. ज्या डोक्यातून या कल्पनेनं जन्म घेतला होता त्या डोक्याची सृजनशीलता या जाहिरातींमध्ये दिसत असे. कधी चित्रात आग पेटलेली असे, जवळच घरात एक कुटुंब जीव मुठीत धरून उभं असायचं आणि चित्राच्या एका कोपऱ्यात नेमक्या जागी सवाल असायचा 'ही आग तुमच्या घरापर्यंत पोचायची वाट पहात तुम्ही थांबून रहाणार का...निर्भयपणे मतदान करा.' किंवा दुसऱ्या एखाद्या चित्रातल्या घराच्या खिडकीत कुणाची तरी वाट पहात उदासपणे उभी असलेली एक आई असायची आणि प्रश्न असायचा 'एक दिवस शाळेत गेलेला तुमचा मुलगा घरी परतणारच नाही...त्या दिवसाची वाट पहात तुम्ही थांबणार का?'

मग निवडणुका होऊन गेल्यावर 'ट्रिब्यून'मध्ये एक पूर्ण पानभर अशी जाहिरात यायला हवी होती. त्यातल्या चित्रात आश्वासक आनंदानं फुललेलं घर, समृद्धी सुबत्तेनं डोलणारा पंजाब, तरारून आलेली गव्हाची शेतं दाखवून वर मथळा दिलेला की...'तुम्ही एक लढाई जिंकलेली आहे...पण ध्यानात ठेवा युद्ध अजून चालूच आहे...'

स्वतंत्र भारताच्या इतिहासात ज्या घटनांचं स्थान अढळ ठरेल अशा घटनांच्या यादीत आता 'पंजाब निवडणुका' दाखल झाल्यात. उद्या जेव्हा योग्य वर्षांच्या अंतरानंतर या घटनांचं ऐतिहासिक स्थान निश्चित करणं शक्य होईल, जेव्हा इतिहासाच्या पानावर सार्थ वजनासहित या घटनांवरचं भाष्य नोंदवता येण्याइतकी साधनं हाताशी असतील, तेव्हा कदाचित इतिहास हे नोंदवेल की, पंजाबमधल्या या एका जिंकलेल्या लढाईनं पुढच्या युद्धाचा रंग पालटवला, त्या युद्धाची दिशा, युद्धभूमी, युद्धपद्धती या सगळ्याला एक निर्णायक वळण दिलं. हे सर्व उद्या. आज तरी आपण एवढंच नोंदवू शकतो की, लढाई जिंकलीय, युद्ध अजून चालूच आहे.

ही लढाई ज्या शूरवीर सेनापतींमुळे जिंकता आली त्यांना वंदन करायला हवं. इंदिराजी आणि संत लोंगोवाल यांना मरणोत्तर परमवीरचक्र प्रदान केलं जायला हवं, तर राजीव गांधी, बर्नाला, अर्जुनसिंग अशा सर्वांना महावीरचक्र. सुरक्षा सेवेवर तैनात असलेला प्रत्येक सैनिक, निवडणूक यंत्रणेतला प्रत्येक अधिकारी, निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता हे सर्वच या लढाईतले योद्धे पण या सर्वांहून अधिक वंदन करायला हवं मतदानासाठी निर्भयपणे बाहेर पडलेल्या जनतेचं. पंजाबी जनता, हाच लढाई जिंकून देणारा योद्धा. मतदानाला बाहेर पडण्याएवढा विश्वास जनतेच्या मनात निर्माण करण्यात प्रशासन यशस्वी ठरलं असा त्याचा अर्थ जरूर होतो. पण त्याहून महत्त्वाचा अर्थ असा होतो की, चार वर्षे हिंसाचार, दहशत, फुटिरता यांनी गांजून गेलेल्या जनतेनं योग्य वेळ येताच आपल्या हातातलं हत्यार कमालीच्या परिणामकारकपणे वापरलं. आग आपल्या घरापर्यंत पोचायची वाट पहात तो थांबला नाही. आपली कोवळी, भविष्य घेऊन वावरणारी मुलं सुरक्षित घरी पोचतील याची त्यानं तरतूद केली. 'पंजाब करार', भारतीय लोकशाही आणि राष्ट्रीय ऐक्य यांच्या बाजूनं त्यानं स्पष्ट कौल दिला.

## लोंगोवाल वेव्ह

या सर्व घटनांच्या गदारोळातून 'भारतीय मतदार' नावाच्या अजस्र चेहऱ्याची धूसर अस्पष्ट आकृती दृग्गोचर होऊ लागते ही आकृती अद्भुत वाटावी इतकी गूढतेच्या वलयांनी वेढलेली आहे. आणीबाणीनंतरच्या निवडणुका, जनता पक्षाच्या अपयशी प्रयोगानंतरच्या निवडणुका, इंदिराजींच्या हत्येनंतरच्या निवडणुका यातून या चेहऱ्यानं आपला आविष्कार घडवला. पंजाबच्या निवडणुका हा सर्वांत ताजा आविष्कार. हा चेहरा अत्यंत अ–निश्चित, फसवा आहे कोणतेही पत्रकार, राजकीय नेते, संख्याशास्त्रीय तंत्रे या कशालाच त्याचा निश्चित थांग लागत नाही. अबोल, निर्विकार चेहऱ्याचा हा 'भारतीय मतदार' योग्य क्षणी असा परिणामकारकपणे बोलतो की त्याच्या अथांगतेला केवळ वंदन करायला हवं सामूहिक कृतीतून व्यक्त होणारा त्याचा आविष्कार, जाणते-अजाणतेपणे का होईना पण समज व्यक्त करणारा असतो. भारतीय लोकशाही परिपक्वतेच्या दिशेनं प्रवास करत असल्याच्या या खाणाखुणा आहेत. पंजाबमधल्या प्राप्त परिस्थितीत : निवडणुका होणं, मतदार मोठ्या संख्येनं बाहेर पडणं, घटनात्मक लोकशाही स्थापन होणं हाच उपलब्ध रस्ता होता. शिवाय याच प्राप्त परिस्थितीत पंजाबमधली राजकीय सत्ता अकालींच्या हाती सोपवली जाणं आवश्यक होतं. पंजाबी मतदारानं हे सगळं करून दाखवलं.

निवडणुका व्हायलाच हव्यात असा ठाम आग्रह राज्यपाल अर्जुन-

सिंग याचा अचानकपणे नियुक्ती झाल्यावर राज्यपालपदाची सूत्रं हाती घेतल्याच्या दिवसापासून अर्जुनसिंग यानी आपलं हे उद्दिष्ट नि.सदिग्धपणे जाहीर केल होत : पजाबमध्ये घटनात्मक सरकारची स्थापना. या उद्दिष्टाच्या दिशेनं त्यानी केलेल्या कामाला केंद्र सरकार आणि अकाली दल याची समजूतदार साथ मिळाली. मग सरतेशेवटी समजूतदार साथ देण्याच आपल काम जनतेनही यथासाग पार पाडले. शीख मतदार तर एक गठ्ठा अकाली दलामागे उभा राहिलेला दिसतोच पण हिंदू मतदारानंही यावेळी मत देताना 'जातीय' विचार केलेला दिसत नाही. ८४ डिसेंबरमधल्या निवडणुकावर इदिराजीच्या हत्येचा जो परिणाम झाला तोच परिणाम पजाबमधल्या निवडणुकांवर सत लोगोवाल याच्या हत्येचा झाला असावा. यापूर्वी एवढी मत अकाली दलाला कधीच मिळाली नव्हती. १९७७ मध्ये सर्वात जास्त मतं मिळाली होती. तेव्हा अकाली दल जनता पक्षाबरोबर होत अन् उत्तर भारतात जनता पक्षाची हवा होती. आता पंजाबमध्ये 'लोगोवाल वेव्ह' नं आविष्कार घडवल्याच दिसतं.

ठीक आहे. लढाई पार पडली. अकाली दलाच्या हाती सत्ता जाण्यात लोकशाहीचा विजय झाला वगैरे. आता यापुढची लढाई अकाली दलाला खेळायची आहे या नव्या अकाली सरकारची पहिली परीक्षा अर्थातच पजाब समझोता अमलात आणणे आणि त्यासाठी दहशतवाद शक्तीशी मुकाबला करण्यात होणार आहे. पजाबच्या अर्थव्यवस्थेला पूर्ववत तजेला प्राप्त करून देणे, कायदा व सुव्यवस्था याची हमी ही पुढची महत्त्वाची आव्हाने शेती, अन्नधान्य उत्पादन आणि औद्योगिक विकास या क्षेत्रात अकाली सरकारच्या कार्यक्षमतेची विधायक निशाणी दिसेल. मागच्या वर्षी शेतकरी सघटनेनं पंजाबमध्ये आदोलन हाती घेतल होत. अकाली दलानं त्यावेळी शेतकरी संघटनेला आपला पाठिंबा जाहीर केला होता. मग आता हाती सत्ता आल्यावर 'शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत रास्त भाव' याबाबत अकाली सरकारची भूमिका काय रहाते हे पहाणे महत्त्वाचे आहे.

या सर्वाला अर्थातच पूर्वगृहीत हे आहे की, हे सरकार स्थिरपणे पाच वर्षे टिकायला हवे. टिकू दिले जायला हवे. यापूर्वी दोन वेळा अकाली दलाची सरकारे मुदतीपूर्वीच बरखास्त झाली होती. हा पंजाबमधल्या राजकीय असतोषातला एक मोठा घटक होता. अकाली दल या पापाच ओझं कॉंग्रेसच्या, दिल्लीच्या खाद्यावर टाकत असते. आता या वेळी बाहेरून धोका कमी संभवतो. पक्षातर्गत एकजूट टिकवणे हीच बर्नाला मत्रिमडळाची मुख्य कसोटी आहे. प्रकाशसिंग बादल मंत्रिमंडळाबाहेर आहेत. तर मत्रिमडळावर तोहरा गटाच वर्चस्व आहे. सत लोगोवाल यांची धुरा पेलणाऱ्या बर्नालाची स्थिती काही फारशी सुखद, निर्धास्त वाटावं अशी नाही. अनेक आव्हानाचा भार पेलणारे सुरजीतसिंग बर्नाला हे शीख राजकारणातलं 'मवाळ' व्यक्तिमत्त्व. जनता पक्ष काळात ते केंद्रिय मत्रिमडळात कृषीमंत्री होते. त्यामुळे त्याच्या दृष्टिकोनाना एक राष्ट्रीय आवाका आला असणार. भिंद्रानवालेंच्या बहराच्या दिवसामध्ये बर्नालाची काही वक्तव्यं जरा 'विचित्र' होती खरी, पण हिंसाचार आणि फुटीरता याची तळी त्यानी कधीच उचलून धरली नाही. पंजाब समझौता घडवून आणताना सत लोगोवाल यांचा ते उजवा हात बनले होते. म्हणून तर सतजीच्या निधनानंतर नेतृत्वाची माळ त्याच्या गळयात पडली. आता मग यापुढे बर्नाला सरकारला निर्वेधपणे कारभार करता यायला हवा. दहशतवादी गट, बाबा जोगिंदरसिंग आणि त्याचे 'संयुक्त' अकाली दल आणि जगदेवसिंह तलवंडी याच बर्नाला सरकार काय करत, काय करू शकतं यावर त्या सरकारच जीवन मरण अवलंबून आहे.

म्हणजे लढाईचा पुढचा भाग आता वेगळया पद्धतीन खेळला जायचाय राष्ट्रीय सदर्भात या भागाला महत्त्व आहेच. पण आता त्याच महत्त्व ओळखून योग्य त्या प्रमाणातच पजाबमधल्या घडामोडीना यापुढे स्थान मिळायला हवं. कोणत्याही एका राज्याच्या राजकारणाला, सरकारला, घटनाना राष्ट्रीय संदर्भात जेवढ वाजवी स्थान मिळतं तेवढंच यापुढे पजाबला मिळायला हवं. जास्त स्थान देऊन नसलेली भुत उभी करायला नकोत. आणि कमी स्थान देऊन, असलेल्या भुताकडे दुर्लक्ष व्हायला नको.

## प्रादेशिक शक्ती

पजाबच्या रूपान भारताचा आणखी एक प्रात प्रादेशिक पक्षाच्या हाती गेला जनता पक्षाचं विघटन आणि एक अखिल भारतीय पर्यायी पक्ष निर्माण करण्यात विरोधकाना आलेल अपयश यातून या नव्व्या दशकात प्रादेशिक पक्षाना अधिकाधिक मोठे स्थान प्राप्त होत गेलं आहे. आत्ता तर लोकसभेतला क्र. २ चा पक्ष, म्हणजे मुख्य विरोधी पक्ष हाच एक प्रादेशिक पक्ष आहे. राष्ट्रीय राजकारणात प्रादेशिक पक्षाचं स्थान, लोकशाही आणि ऐक्य यांना त्याचे योगदान अथवा धोका या सर्वांविरची चर्चा हा महत्त्वाचाच विषय आहे. पजाबमध्ये अकाली दल सत्तेवर येण्याच्या निमित्तान तो पुन्हा एकदा प्रकाशात येतोय.

प्रादेशिक शक्तीशी जुळवून घेण्याच एक धोरण काँग्रेसन आखल होतं. 'राज्यात तुम्ही, केंद्रात आम्ही' हे त्या धोरणाचं बोधवाक्य. इंदिराजी या धोरणाच्या निर्मात्या. तमिळनाडूत आण्णा द्रमुकशी जुळवून घेण्यात या धोरणाचा यशस्वी आविष्कार दिसला. या रागेत येऊन उभे रहात नाही म्हटल्याबरोबर काश्मीरमध्ये फारुक अब्दुला आणि आंध्र प्रदेशात रामाराव यांना केंद्र सरकारकडून 'घटनात्मक' फटका खावा लागला होता. त्यानतर आता अलिकडे 'केंद्रात आम्ही, राज्यात तुम्ही' च्या खोगीरात रामाराव निवात बसल्यासारखे दिसतात. आता आसाममध्ये 'आसु' आणि गणसग्राम परिषद याच्या हालचालीतून जन्माला येणारा पक्षही आसाममधली एक महत्त्वाची प्रादेशिक शक्ती ठरणार हे निश्चित. तिच्याशी काँग्रेस कोणत्या पद्धतीन जुळवून घेते हे पहायला हवे.

त्यापूर्वी अकाली दलाशी जुळवून घेण्याचा कार्यक्रम मात्र तूर्त यथासाग पार पडला आहे. पजाब करार झाल्यानंतर अशी वदता होती की, राज्यात निवडणुका होतील अन् निवडणुकानंतर राज्यातली सत्ता अकालीच्या हाती सोपवायची असं त्या करारातल अलिखित कलम आहे. बर्नालाच मुख्यमत्री होणार आणि लोकसभेच्या जागावर काँग्रेस हक्क सांगणार असं ठामपणे सांगणारे ज्येष्ठ पत्रकारही भेटले होते. नंतर निवडणुकीच्या काळात, विधानसभा मतदार संघात काँग्रेसन अकाली उमेदवाराविरुद्ध कच्चे उमेदवार उभे केले होते

तर लोकसभा मतदार संघात अकाली दलान काँग्रेस उमेदवाराविरुद्ध कच्चे उमेदवार उभे केले होते. यानं अस काही अलिखित कलम असल्याला दुजोरा मिळत होता. (तमिळनाडूतल्या निवडणुकीतही, विधानसभेकरता मत अण्णा द्रमुकला द्या असं काँग्रेसी कार्यकर्ते सागत होते तर लोकसभेकरता मत काँग्रेसला द्या असं अण्णा द्रमुकचे कार्यकर्ते सागत होते.) या सदर्भात खरं काय हे निश्चित कधीच बाहेर येणार नाही, पण अलिखित कलमाची हवा अकालीच्या पथ्यावर पडली असणार.

यापूर्वीच्या केंद्र सरकारनं, काश्मीरमधली सत्ता शेख अब्दुलाच्या हाती सोपवल्याशिवाय तिथे शातता व सुव्यवस्था नादणार नाही, परिणामकारक प्रशासनाची स्थापना होणार नाही, या भूमिकेतून, शेख अब्दुल्लांना तुरुगातून मुक्त करून, त्याच्या हाती सन्मानानं सत्ता सोपवली होती. मात्र अस करताना काश्मीरचं भारताबरोबरचं विलिनीकरण अतिम, अपरिवर्तनीय असल्याच्या वास्तवाला शेख अब्दुल्लाचा होकार मिळवला होता. आता पजाबमधली सत्ता अकालीच्या हाती जाताना जवळजवळ हीच प्रक्रिया घडली आहे तपशील वेगळा, ढोबळमानान तत्त्व तेच, त्याच तत्त्वाच्या कसावर, लालडेंगालाच मुख्यमंत्रीपद देऊन मिझोरामचा प्रश्न निकालात काढण्याचा प्रयत्न चालू असल्याच्या बातम्या होत्या कदाचित तत्कालिक राजकीय आवश्यकता म्हणून हे आवश्यक अथवा योग्य ठरत असेलही; पण व्यापक आणि दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने हे योग्य ठरते का यावर विचार व्हायला हवा. उदाहरणार्थ पंजाबच

## अतिरेकवादावर लक्ष हवे

लोकशाहीचा विजय, पंजाब करारावर जनतेन उमटवलेला मान्यतेचा ठसा, दहशतवादाचा पराभव, राष्ट्रीय एकात्मतेचा विजय अशा सर्व जयघोषातून असाही एक– अस्पष्ट का होईना– सूर कानावर आलेला आहे की, अकाली आणि अतिरेकी याच्यातच गुप्त करार ठरला होती की, निवडणुकीत काही दंगाधोपा, हिंसाचार करायचा नाही. हे जर दूरान्वयानं जरी खर असेल तर पजाबमधल्या सर्व घटनाचा अर्थच बदलतो. सगळा जयघोष प्रश्नाचिन्हांकित होतो. १९७०–७१ मध्ये बगालच्या सयुक्त मंत्रिमडळात मार्क्सवादी सामील झालेले होते. गृहखात ज्योती बसुकडे होते तेव्हा हाती आलेल्या सत्तेचा पद्धतशीर वापर करून त्यानी नक्षलवाद्याना पाठीशी घातल होत, पोलीस खातं पोखरून टाकलं होतं. कलकत्त्यान नक्षलवादी दहशतीचे भयस्वप्नसदृश दिवस याच काळात पाहिले होते. पजाबमधले अतिरेकी ही नक्षलवाद्याचीच शीख आवृत्ती आहे. नक्षलवाद्याना धार्मिक पाया नव्हता. पजाबमधल्या अतिरेक्याना तो आहे. त्यामुळे त्यांच्या दहशतवादाला जास्तच धोकादायक धार येते. बर्नाला मंत्रिमडळानं दिलेल्या पहिल्या धोरणात्मक निवेदनात म्हटलय– सुवर्ण मंदिरात पोलीस पाठवणारं नाही .. अतिरेकी हे आमचेच बाधव आहेत... ते वाट चुकलेत, त्याना आम्ही प्रेमाने समजावून सांगून योग्य रस्त्यावर आणू, पजाबमधल्या ताज्या घडामोडीनतर केल्या जाणाऱ्या सर्व जयघोषात या मुद्यांची लक्षपूर्वक नोद घ्यायला हवी

अशी नोद घेण्यान त्या निवडणुकाच महत्त्व कमी होत नाही. त्यांच्या चौकटी, मर्यादा आखल्या जातात इतकच. अन् तस मर्यादाचं आणि म्हणून अजूनही शिल्लक असलेल्या आव्हानांच भान ठेवायला हवं. दहशतवाद ही आतरराष्ट्रीय 'संस्था' आहे. एका निवडणुकीतल्या विजयानं किंवा पराभवानं ती सपत नाही, मरतही नाही. दहशतवादाशी चालणारं युद्ध हे इद्रजिताच्या मायावी युद्धासारख आहे. त्याच्याशी नुसतं शस्त्रान लढता येत नाही. कारण हा इद्रजित ढगाआड दडलेला असतो. त्याला त्याच 'लक्ष्य' मात्र स्पष्ट दिसत असतं. लोकाच्या मनातली दहशत हे त्याच सर्वात मोठं भाडवल. इद्रजिताच्या तपश्चर्येची जागा हुडकून काढून तिथे जाऊन त्याचा नायनाट करायचा तर लोकाच्या मनातली दहशत दूर व्हायला हवी. म्हणून निवडणूक पार पडणं ही या शक्तीची पीछेहाट; पण माघारीच्या काळात डोक खाली घालून शात रहाव आणि परत योग्य वेळ येताच उलट टोला द्यावा हे कळण्याएवढ्या त्या शक्ती सूज्ञ कावेबाज असतात.

सहज जाता जाता, १९८३ च्या फेब्रुवारीत आसाममध्ये झालेल्या निवडणुका आठवतात. त्याही निवडणुका केंद्राच्या पुढाकारान, बंदुकीच्या छायेखाली झाल्या होत्या; पण जनतेनं मतदानावर बहिष्कार टाकला होता. म्हणून त्या निवडणुका हा लोकशाहीचा खून होता कारण बंदुकाची बायोनेटस् जनतेच्याच हृदयावर रोखलेली होती. इथे पजाबमध्ये त्या बदुका अतिरेक्याच्या छातीवर टेकलेल्या होत्या, त्याच्या छायेत मतदार सुरक्षितता अनुभवू शकला. इथे लोकशाहीचा खून पडू नये म्हणून लाखभर बंदुका सज्ज होत्या. राजीव गाधी म्हटले ते महत्त्वाचे होते 'कोणता पक्ष जिंकतो, हारतो हे महत्त्वाच नाही. महत्त्वाचे हे आहे की, लोकशाही जिंकते की नाही.' भारताच्या एका टोकाला लोकशाहीचा विजय झालेला आहे आता दुसऱ्या टोकाला– आसाममध्येसुद्धा– जनमतानुसार निवडणुका होऊन लोकशाहीचा विजय व्हायला हवा. तस झाल तर ती जिंकलेली आणखी एक लढाई असेल. पजाबातली ही लढाई आणि आसाममधली ती लढाई याची रूप जरी वेगळी असली तरी या दोन्ही लढाया एकाच युद्धाचा भाग आहेत

पंजाबमध्ये नुकतीच पार पडलेली लढाई त्या युद्धाचं एक महत्त्वाच रणक्षेत्र होत म्हणून त्या निवडणुकाना इतकं महत्त्व प्राप्त झाल होत. राष्ट्रीयच नव्हे तर आतरराष्ट्रीय स्तरावर, वृत्तपत्रविश्वात त्याना तसं महत्त्वाचं स्थान मिळाल आहे. आजवर कोणत्याच एका राज्याच्या निवडणुकांना एवढं राष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालं नव्हत आतरराष्ट्रीय तर नाहीच नाही. कारण हेच ती 'निवडणूक' नव्हती 'लढाई' होती.

अन् लढाई तर अजून चालूच आहे. ललित माकन, अर्जुनदास याचे खून या लढाईतल्या काही चकमकी. निवडणुकाबाबत युवक उदासीन दिसतात, अस मला पंजाबमधून आलेल्या एका पत्रात म्हटल होत. साहजिक आहे, कारण दहशतवादाची आग शीख युवा मनातच जास्त पेटलेली आहे अतिरेक्याचे आतरराष्ट्रीय अड्डे अजून शिल्लक आहेत. निवडणूक-काळातच पाडण्यात आलेल्या 'ऑपरेशन मुडा' मध्ये बियास भागातले अतिरेकी तळ उध्वस्त करण्यात आले होते. तेव्हा लक्ष्मणच्या एका बोचऱ्या कार्टूनन आठवण करून दिली होती की, 'अतिरेक्याचे तळ उध्वस्त केलेत, आता फक्त अतिरेकीच तेवढे उध्वस्त करायचे राहिलेत.' त्याना पाठीशी घालणाऱ्या आतरराष्ट्रीय शक्ती अजून कार्यरत आहेत. जगजितसिंह चौहान 'रिपब्लिक ऑफ खलिस्तान'चा दूतावास इक्वेडोरमध्ये उघडतायत इक्वेडोर भारतातला त्याचा दूतावास बद करतय आणि इक्वेडोरमध्ये 'खालसा-नगर' साठी ४०० एकर जागा देतेय इक्वेडोरचं बाहुलं पडद्यामागून कोण नाचवतंय हे स्पष्टच आहे.

म्हणून म्हटल 'लढाई जिंकलीय, पण युद्ध चालूच आहे' आणि या अर्थान हे युद्ध सततच चालणार कारण Vigilance is the price of independence ! □

# डॉ. कोटणीस
## मायभूमीपासून दूर.... हजारो मैल

● सुभाष काळे ●

**चीन** व जपानमधील एक जुन्या तहानुसार काही रेल्वे मार्गांच्या संरक्षणासाठी मांचुरियात जपानी सैनिकांच्या तुकड्या होत्या. चिनी सैनिक अधिकारी व जपानी सैनिक अधिकारी यांच्यात वारंवार चकमकी उडू लागल्या.

सप्टेंबर १९३१ मध्ये नकामुरा नावाच्या जपानी कॅप्टनला मांचुरियाच्या ग्रामीण भागात हिंडताना चिनी सैनिकांनी पकडले. आपण शेतीतज्ज्ञ आहोत, असे नकामुराने सांगितले; पण चिनी लष्करी अधिकाऱ्यांनी त्याला हेर समजून ठार मारले. या ठिणगीने संघर्षाचा स्फोट उडाला. रेल्वे संरक्षणासाठी ठेवलेल्या जपानी लष्कराने १८–१९ सप्टेंबर रोजी मुकडेन शहर घेतले.

त्यानंतर एका ठिकाणी रेल्वे मार्गावर प्रचंड बॉंब स्फोट झाला हा घातपाताचा प्रकार होता. जपान्यांना एवढे निमित्त पुरेसे ठरले. त्यांनी आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याच्या नावाखाली वेगाने विद्युत हालचाली करून मांचुरियातील सर्व जिल्हे जिंकले. आणि फेब्रुवारी १९३२ मध्ये स्थानिक लोकांपैकी काहींना हाताशी धरून 'माचुकुवो' सरकार स्थापन केले. हे सरळ सरळ आक्रमण होते. चीनने त्याबाबत लीग ऑफ नेशनकडे जोरदार तक्रारपण केली. अर्थात त्याचा काही उपयोग झाला नाही.

फेब्रुवारी १९३३ मध्ये जपानने परत उत्तरेकडील प्रचंड भिंतीच्या बाजूने ( ग्रेट वॉल ) आक्रमण केले आणि हळूहळू हातपाय पसरायला प्रारंभ केला. उत्तर चीनमधील एकेक शहर जिंकून घेऊन जपानने चीनचे लचके तोडायला सुरुवात केली. १९३५ पर्यंत जपानी सैन्याने उत्तर चीनमधील शांटुंग, हुपेई, शान्सी, चहार, सुईयुआन या पाच प्रांतात सरकारे स्थापन केली; पण चीनचा शहेनशहा चँग–कै-शेक जपानला शत्रू मानत नव्हता. त्याच्या व्याख्येत त्याचे खरे शत्रू होते कम्युनिस्ट जपानी त्वचारोगासारखे आहेत, तर कम्युनिस्ट कॅन्सरसारखे आहेत ही त्याची तुलना. साहजिकच त्याने वरील पाचही प्रांतांना स्वातंत्र्य बहाल केले.

जपानचे आक्रमण सुरू असतानाच त्यावेळी कम्युनिस्टांचा लॉंग मार्च सुरू होता. लॉंग मार्चच्या धामधुमीतच १ ऑक्टोबर १९३५ला कम्युनिस्ट पार्टीने चीनमध्ये जपान विरोधी आघाडी स्थापन केली. आपसातील युद्धे थांबलीच ताहिजेत ही कम्युनिस्टांची आघाडीतील योजना चीनमध्ये लोकप्रिय होती.

९ डिसेंबर १९३५. पेकिंग विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी जपानविरुद्ध प्रचंड निदर्शने केली.

१९३६ च्या मे च्या पहिल्या आठवड्यात माओत्से-तुंगने येनानहून जाहीर केले की, 'जपानी आक्रमणाच्या छायेखाली असताना आपसात लढून आम्ही चीनची शक्ती खच्ची होऊ देणार नाही. मांचुरियन सैन्याशी न लढण्याचे आम्ही आपण होऊन ठरवून टाकले आहे.

घोषणेपाठोपाठ माओने चँगच्या नानकिंग सरकारला तार केली. तारेत म्हटले आहे–

'चिनी राष्ट्र आणि चिनी जनता धोक्यात आली असताना या आणिबाणीच्या प्रसंगी आपण आपसातील भाऊबंदकी थांबवून शत्रूच्या प्रतिकारासाठी आपली शक्ती एकवटली पाहिजे. आपला भूतकाळ विसरून हे राष्ट्रव्यापी नागरी युद्ध थांबवावे अशी लाल सैन्याची, क्रांतीकारी समितीची नानकिंग सरकारला सूचना आहे. ही गोष्ट नानकिंग सरकारच्या हिताची तर आहेच; पण त्याचबरोबर त्यात आपल्या देशाचे आणि जनतेचे हित आहे. एवढे करूनही नानकिंग सरकारला जाग येत नसेल आणि ते हटवादीपणाने जपान्यांची बाजू घेत राहील तर शेवटी ते कोसळूनच पडेल. अखिल चीनची जनता हे सरकार मग खाली खेचून काढील.'

या तारे पाठोपाठ कोमिटांग सरकारला पत्र पाठवून चीनमध्ये लोकशाही गणराज्य स्थापन करण्याचा प्रयत्न झाल्यास, त्या गणराज्याचा भाग म्हणून राहण्यास कम्युनिस्ट तयार आहेत असे जाहीर केले व पत्रे, तारांवर तारा पाठविण्याचा कम्युनिस्टांनी सपाटा चालविला.

या वातावरणात, चँग–कै–शेक १९३६ मध्ये निर्मूलन मोहिमेची पाहणी करण्यासाठी ७ डिसेंबरला सियानला आला.

### चँग–कै–शेक अटकेत

१० डिसेंबर रोजी त्याने सहाव्या मोहिमेची आखणी केली व आदेश सुटताच कम्युनिस्टांवर तुटून पडण्याच्या सूचना सर्वत्र दिल्या

द्वारकानाथ कोटणीस – सोलापुरातल्या एका मध्यमवर्गीय कुटुंबातला मुलगा. अतिशय हुशार, जिद्दी आणि त्याग-वृत्तीची उपजत जाण असलेला. मुंबईत येऊन कोटणिसांनी वैद्यकीय शिक्षण तर घेतलं, पण चार-चौघासारखी चाकोरी न धरता चीन–जपान युद्धकाळात युद्धभूमीवर पाठवल्या जाणाऱ्या भारतीय वैद्यकीय पथकात जाण्यासाठी नाव नोंदवलं. सर्व सुखसोयी आणि गोड स्वप्नं बाजूला सारून हा काटयाकुटयातला मार्ग डॉ. कोटणिसांनी स्वीकारला. डॉ बसू, डॉ. अटल, डॉ. चोलकर यांच्याबरोबर डॉ. कोटणीस चीनमध्ये पोचले एका नव्या संस्कृतीची ओळख करून घेऊ लागले. चीन–जपान युद्धातल्या अतिशय तणावपूर्णप्रसंगी भारतीय वैद्यकीय पथक तिथे पोचले दररोज हजारो चिनी जखमी होत होते, गावच्या गाव उध्वस्त होत होती, आणि डॉक्टरांची संख्या मर्यादित होती. अशा प्रतिकूल वातावरणात भारतीय पथकाची कामगिरी सुरू झाली होती. आव्हान मोठं होतं आणि डॉ. कोटणीस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ते स्वीकारलं होतं...

गेल्या अंकात या चरित्रकथेचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. हा पुढील भाग...

गेल्या; पण निर्मूलन मोहिमेची आज्ञा निघण्याच्या आधीच ११ डिसेंबरला रात्री यंग मार्शल–चँग–हुसूये–लियाग याने माचुरियन सैन्याचे जनरल्स व शेन्सी प्रांतातील जनरल्सची गुप्त सभा घेतली आणि १ लाख ७० हजार सैन्य सियानभोवती गोळा केले.

चँग–कै–शेक शरीर रक्षकासह सियान शहरापासून दहा मैल दूर लिनटुंग नावाच्या सुप्रसिद्ध सौंदर्यस्थळी रहायला गेला होता. यंग मार्शलने स्वतःचे शरीररक्षक तिकडे पाठविले आणि २०० माचुरियन बरोबर घेतले. १० सैनिकांचा एक ट्रक चँग ज्या हॉटेलात होता त्याच्या आवारात वेगाने घुसला. चँगचे शरीररक्षक व सैनिक यांच्यात गोळीबार होऊन चँगचे शरीररक्षक ठार झाले.

यंगमार्शलच्या शरीररक्षकाचे नेतृत्व कॅप्टन सन यांच्याकडे होते तो चँगच्या खोलीत घुसला तेव्हा चँग मागच्या खिडकीतून हॉटेलच्या मागे असलेल्या डोंगरात घुसला. सनने चार–पाच माणसे बरोबर घेतली व त्याला शोधले. अखेर तो सापडला. चँगला पाहताच कॅप्टन सनने त्याला हात जोडून नमस्कार केला.

पण चँग म्हणाला,

'तू जर माझा मित्र असशील तर अगोदर मला गोळी घालून ठार कर.'

'नाही! मी तुम्हाला मारणार नाही. जपान विरुद्धच्या मोहिमेत तुम्ही देशाचे नेतृत्व पत्करावे एवढीच आमची मागणी आहे. त्यासाठीच मी आलो आहे.'

चँग थोडा वेळ तसाच बसून राहिला– अनवाणी पायाने पळत असताना पडल्यामुळे ठिकठिकाणी अंग खरचटले होते. अंगावर ढिला नाईट गाऊन, डोक्यावर टक्कल, दाताची कवळी नसल्याने तोंडाचे बोळके. थंडीने अंग कुडकुडते आहे. एका गुहेसारख्या खडकाच्या आडोशाला कसाबसा तो उभा होता.

'यंग मार्शल, चँगला अगोदर इथे बोलाव मग मी खाली येईन.'

'यंग मार्शल इथे नाही, येनानमध्ये गडबड चालू आहे. मी तुमच्या संरक्षणासाठी आलो आहे' सन म्हणाला.

चँगने घोडा आणायला सांगितले पण घोडा नाही म्हणून सनने त्याला पाठीवर बसवून डोंगराखाली नेले व एका मोटारीत बसून दोघेही सियानच्या दिशेने निघाले.

सन म्हणाला,

'झाले गेले ते आपण विसरून जावे. यानंतर आता आपण चीन-साठी काही तरी नवीन धोरण स्वीकारले पाहिजे– आपण काय करणार आहात? जपानला प्रतिकार करणे हे आपल्या समोरचे पहिले काम आहे. उत्तर चीनच्या लोकांचीही खास मागणी आहे जपानला विरोध करण्याऐवजी कम्युनिस्टांशी लढा असे आपण आम्हाला सांगता?'

चँग ओरडला,

'डुकरा! मी चीनचा नेता आहे. चीनचे प्रतिनिधित्व मी करतो. आणि माझे धोरण बरोबर आहे. तुला काय कळते त्यातले?'

मोटार सियानला पोचल्यावर चँगला यंग मार्शलचा पाहुणा म्हणून ठेवण्यात आले आणि त्याच्या निवासस्थानी सैन्याचा कडक पहारा बसविण्यात आला.

दुसरे दिवशी, 'चँग–कै–शेक अटकेत,' 'अखिल चीनचा अधिपती हुकूमशहा जनरॅलिसिमो चँग–कै–शेकला पकडले', 'चीनमध्ये लष्करी क्रांती' 'चँगचा जीव धोक्यात' वगैरे बातम्या वृत्तपत्रात झळकल्या

तरुण सैनिकांचीच नव्हे तर शेकडो लोकांची इच्छा चँगला ठार मारण्याची होती, पण माओ त्से तुंग व चाऊ एन लाय यांनी एकंदर देशहिताचा विचार करून समंजस भूमिका घेतली. चँग फारसा लोक-प्रिय नव्हता हे खरे असले तरी तो नामधारी का होईना राष्ट्रप्रमुख होता. त्याची जागा घेऊन समर्थपणे कोणाला राज्यशकट हाकता येईल अशी परिस्थिती नव्हती. या गोंधळाचा फायदा जपान उठवेल असा विचार कम्युनिस्टांनी केला व चँगचे नेतृत्व मान्य करण्यास होकार दिला.

### संयुक्त आघाडीला मान्यता

१७ डिसेंबर ते २५ डिसेंबर संयुक्त आघाडी वाटाघाटी चालू होत्या. चौएनलाय, मेह–चिएन–चिंग, मॅडम कै शेक, टी व्ही युंग हे सहभागी होते. वाटाघाटीत कम्युनिस्ट निर्मूलन मोहीम बंद करून

सर्व सेना एकत्रित करायची व त्याचा प्रमुख सेनापती म्हणून चॅंग-कै-शेकला मान्यता दिली गेली. या करारामुळे कम्युनिस्टांच्या रेड आर्मीचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन 'राष्ट्रीय क्रांतिकारी सेनेची आठवी फौज व चौथी फौज' हा दर्जा मिळाला. सीमेवरून परतल्यानंतर चॅंगने जपान विरुद्धच्या आघाडीला १५ जुलै १९३७ ला अधिकृत मान्यता दिली

येनान येथील कम्युनिस्ट प्रणित सरकारला चिनी प्रजासत्ताकातर्गत 'खास स्वायत्त विभागाचे सरकार' म्हणून चॅंगने मान्यता दिली. वाटाघाटीत चॅंग कै शेकच्या सुटकेनंतर चॅंग-शू-लिआग व यांग-हू-छेंग या दोन सेनापतींना क्षमा करून अधिकारावर ठेवण्याचे एक कलम होते; पण सुटका होताच चॅंग-कै-शेकने त्याला हरताळ फासला व दोघानाही पकडून तुरुंगात डाबले नंतर तो १ ऑक्टो. १९४९ ला फार्मोसाला पळाला तेव्हा त्याने त्या दोघाना तिकडे नेले व ३१ ऑगस्ट १९३१ ला मुक्त केले.

चॅंग-कै-शेकने कम्युनिस्टाविरोधी मोहीम तात्पुरती मागे घेतली. पण जपान्याबरोबर उघड संघर्ष टाळून कम्युनिस्टांच्या विरोधी छुप्या कारवायांच्या कृतीमुळे जपानचे फावले. संधी साधून जपानने चीनवर कुरघोडी केली. जपान्यांच्या विरुद्धची लढाई म्हणजे कम्युनिस्टांच्या अंतिम विजयाची पहिली पायरी अशी खूणगाठ माओ त्से तुगने मनात बांधली होती. म्हणून स्वतःची अस्मिता, ताकद वगैरे गोष्टी बाजूला ठेवून कम्युनिस्ट चॅंग-कै-शेकच्यामागे उभे होते.

७ जुलै १९३७ रोजी पेकिंगच्या दक्षिणेस नऊ मैलावर लुकावचिओ इथं मार्को पोलो पुलाजवळ चिनी-जपानी चकमक झडली होती व चकमकीचे निमित्त पुढे करून जपान्यांनी युद्ध घोषित न करता चीनवर हल्ला चढविला. पीत नदीच्या वळणावरील चीनच्या प्रचंड भिंतीच्या (ग्रेट वॉल) दक्षिणेस असलेल्या पाच प्रांतावर कब्जा करण्याचा जपानचा प्रयत्न होता यावरून हे पूर्व नियोजित युद्ध होते यात शकाच नाही.

१७ जुलै १९३७ ला चॅंग-कै-शेकने राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात 'आता माघार नाही, समझोता नाही की आक्रमणापुढे शरणागती नाही' हे स्पष्ट करून सयुक्त आघाडीस मान्यता दिली. उत्तर चीनवर कब्जा प्राप्त होताच जपानी फौजा ऑगस्ट १९३७ मध्ये शांघायवर तुटून पडल्या. शांघायजवळ दोन नाविक अधिकारी ठार झाल्याने चिडून जाऊन जपान्यांनी आपली सर्व ताकद तिथे ओतली; पण चिन्यांच्या कडव्या प्रतिकारामुळे 'शांघाय' घ्यायला जपानला तब्बल तीन महिने लागले. चिडलेल्या जपान्यांनी शांघाय अक्षरशः बेचिराख केले त्याबरोबर स्त्रियांवर बलात्कार, लुटालूट, जाळपोळ आणि अर्भकांची हत्या या निर्दय कृत्याने जगभर निषेधाची लाट उसळली. संयुक्त राष्ट्रसंघापाठोपाठ अमेरिकेनेही जपानचा तीव्र धिक्कार केला अर्थात त्याचा जपानवर काहीच परिणाम होण्याचे कारण नव्हते. शांघायपाठोपाठ ते यांगत्सेकडे निघाले. चीनच्या राष्ट्रीय सरकारची राजधानी नानकिंग त्यांनी १३ डिसेंबर रोजी जिंकून घेतली. लुटालूट, पाशवी अत्याचार, नासधूस, निर्दयी बॉंबफेक यामळे युद्धाची भयानकता तीव्र केली. जपानी फौजांच्या लाटेपुढे करोडो चिनी घरदारे सोडून जीव वाचविण्यासाठी दऱ्याखोऱ्यांच्या दिशेने सैरावैरा धावत सुटले. प्रतिकाराची भीती न उरल्याने जपान्यांनी आक्रमणाचा वेग तीव्र केला. 'नानकिंग' जवळ उभ्या असलेल्या ब्रिटिशांच्या चार बोटी व अमेरिकेची प्रवासी बोट 'पनाय' वर देखील जपान्यांनी हल्ले चढवायचे बाकी ठेवले नाही. जपानने सुमारे एक कोटी सैनिक चीनमध्ये उतरविले होते.

## स्थलांतर

एवढे प्रचंड सैन्य उतरविण्यामागे जपानचा हेतू स्पष्ट होता की एका दमात चीनला गिळकृत करायचे. त्यासाठी त्याने सैन्य सख्येबरोबरच आक्रमणाच्या वेगाची तीव्रता प्रथमपासून ठेवली होती. लष्करी व गुप्तहेर यंत्रणा अत्यंत कार्यक्षम ठेवली होती. असे असतानादेखील जपानच्या पायाखालची वाळू घसरू लागली. चिन्यांचा चिवट प्रतिकार पाहून जपान्यांचे मनातले मांडे मनातच राहिले. चिन्यांची ताकद दळणवळणाच्या साधनात नाही की उद्योगधंद्यात नाही, तर ती छातीचा कोट करून घरघर लढविणाऱ्या प्रत्येक चिन्यांच्या अस्मितेतच आहे हे समजायला जपानला वेळ लागला. कितीही कोंडी केली तरी चीन लढतच राहील याचा उलगडा जपानला झाला नाही. वारवार होणाऱ्या आक्रमणामुळे चिनी माणूस वृत्तीने लढाऊ बनलेला आहे तो सदैव युद्धमानच असतो. त्यामुळे युद्धपरिस्थितीवर मात करणे त्यांना अवघड वाटले नाही.

चीनमधील बहुतेक उद्योगधंदे त्यावेळी किनारपट्टीवर वसलेले होते आक्रमणाला तोंड देण्यासाठी हे कारखाने अंतर्भागात नेणे गरजेचे होते. असे उद्योग हलविण्याची कोणतीच साधने नसल्याने कारखान्यांचे सुटे भाग करून ते अंतर्भागात नेले गेले पण त्याला काहीसा वेळ लागला, त्याचे कारण उद्योगपती व सरकारी निर्णयाला झालेला विलंब. 'शांघाय'चे कारखान्यांचे स्थलांतर तर युद्ध सुरू झाल्यानंतर दोन आठवड्यांनी झाले. 'शांघाय मशिनरी वर्क्स' हा कारखाना प्रथम हलविला गेला. यांगत्से नदीतून होड्यांवर यंत्रसामुग्री ठेवून त्यावर पालापाचोळा झाकून यंत्रांचे सुटे भाग हलविले गेले. विमानांची घरघर ऐकू येताच या छोट्या छोट्या होड्या नदीकाठावरील झाडाझुडपांच्या आश्रयाला जात. तीन महिने जपानला शांघायची नाकेबंदी करायला लागले. तेवढ्या अवधीत सर्व कारखाने हलविले गेले होते. शांघायनंतर इतर उद्योगधंदे कशा पद्धतीने हलविले गेले हेही पाहणे महत्त्वाचे आहे. चीनमधील एक कापडगिरणी एक हजार मैल अंतरावरच्या क्षेन्चान येथे केवळ बैलगाड्यातून हलविण्यात आली. एक हजार टन वजनाची यंत्रे बांधाबांध करून बैलगाड्या, तराफे याद्वारे हलविली गेली.

सर्वच भागात बैलगाड्या वापरता येत नव्हत्या. काही काही ठिकाणी तर रेल्वे, मालमोटारी किंवा तराफे यांपैकी काहीच नव्हते. अशा ठिकाणी चिन्यांनी मशिनरीचा एकेक भाग पाठीवरून नेला. वीस टन वजनापर्यंतचे ओझे हजारो चिन्यांनी उचलत किंवा ढकलत नेले आणि हॅंकोच्या पश्चिमेकडे औद्योगिक वसाहती उभ्या केल्या. ज्या पहाडी भागात जंगली श्वापदांच्या आवाजाखेरीज अन्य आवाज ऐकायला मिळत नव्हता, त्या भागात गिरण्यांचे भोंगे वाजविण्याची किमया चिन्यांनी केली. 'हॅंको'चे पॉवरमशीन तर अखेरच्या दिवसापर्यंत चालू होते. अवघ्या एक दिवसात सुटे करण्यात येवून ते हलविले गेले. प्रत्येक चिन्याचे दोन हात हेच चीनच्या नवनिर्मितीचे यंत्र

आहे, याचा आत्मविश्वास राज्यकर्त्यांना पटला त्याप्रमाणे प्रत्येक चिन्याला जाणवला. बांबूच्या आधाराने पोलादाच्या कारखान्यांचे छत बांधले गेले. भट्ट्यासाठी लागणारा कोळसा हजारो चिनी डोक्यावर टोपली ठेवून नेत होते. विद्युत शक्तीची कामे हातानी केली जात होती.

ज्या पद्धतीने चिन्यानी कारखाने पहाडी भागात हलविले त्या पद्धतीनेच विद्यापिठे देखील हलविली. जपान्यानी पेकिंग, शिंगहुआ, येनचिंग, नानकार्य ही चार मोठी विद्यापीठे उद्ध्वस्त केली. हा कटू अनुभव जमेला धरून चिन्यानी बाकीच्या विद्यापिठाचे स्थलांतर तातडीने केले. जपान्यानी जेव्हा दक्षिणेकडून आक्रमण केले तेव्हा सन-येत सेन विद्यापिठातील विद्यार्थ्यांनी प्रथानी भरलेल्या बोटी कँटनच्या उत्तरेकडील उपनगरातून बाहेर काढल्या एकंदर १०८ उच्च शिक्षण संस्थापैकी ९४ संस्थाना अंतर्गत भागात हलविले गेले. या धामधुमीतही शिक्षणात व्यत्यय नव्हता सर्व अभ्यासक्रम १९३९ पर्यंत स्थिरावले होते विद्यार्थ्यांची संख्या ३२ हजार वरून पाच हजारावर गेली होती.

१९३७ जुलैमध्ये जपान्यानी हल्ला चढविला तेव्हा सर्व विद्यार्थी उन्हाळ्याच्या सुट्टीवर होते; पण शिक्षण मंत्रालयाने सर्वांना उत्तरेत पीत नदीच्या आतल्या किनाऱ्यावर 'सिआन' आणि यांगत्से नदीच्या दक्षिणेस चांगशा, या दोन ठिकाणी एकत्र येण्याचा आदेश मिळताच, पंधराशे विद्यार्थी-विद्यार्थिनी जमले पाचशे विद्यार्थ्यांची एक तुकडी या प्रमाणे सर्वांना दक्षिण येन्सीकडे जाण्यास सांगितले प्रत्येक तुकडीच्या पुढे पोलीस विभाग, दळण-वळण करणारी तुकडी असे. पाठोपाठ धान्य लादलेली खेचरं व खेचराच्या मागे मालमोटारी पथकातले काही लोक खेड्या-पाड्यातून भाज्या खरेदी करीत. तोपर्यंत बाकीचे भांडीकुंडी जमा करून स्वयंपाक करीत. अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी बिनतारी संदेशाची व्यवस्था करीत तर काही गट बातम्यांचे संकलन करून खेडुताना भित्ती पत्रकाद्वारे माहिती देत. इतक्या पद्धतशीरपणे चिनी लढत असल्याने जपानी लवकरच थकले नसले तरच नवल.

## भारतीय पथकाची कोंडी

अंतर्गत डावपेचामुळे भारतीय वैद्यकीय पथकाची चुंकिंग येथे मात्र चांगलीच कोंडी झाली. काहीच काम नसल्याने अक्षरशः माशा मारीत बसण्याची पाळी या पथकावर आली. अशाच उद्विग्न मन-स्थितीत डॉक्टर कोटणीस घरी पाठविलेल्या एका पत्रात लिहितात.

१) इकडे येण्यामध्ये माझा जो एक प्रमुख उद्देश होता तो म्हणजे शस्त्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळविण्याची संधी साधणे. पण त्या बाबतीत आतापर्यंत तरी संपूर्ण निराशा पदरी पडली आहे अर्थातच संधी मिळेल तेव्हा शस्त्रक्रियेवरची पुस्तकं वाचण्याचं मी चालू ठेवलं आहे. आम्ही आता ज्या ठिकाणी जाणार आहोत तिथं या दृष्टीने अनुकूल फरक दृष्टोत्पत्तीस येईल अशी अपेक्षा आहे त्या भागात जाणारं आमचंच पहिलं वैद्यकीय पथक आहे. आम्हाला अगदी इस्पितळ स्थापण्यापासून सुरुवात करावी लागणार आहे.

२) मला राजकारणाविषयी बरेच धडे मिळत आहेत निर-निराळ्या अनेक राष्ट्रातून आलेल्या भिन्नभिन्न राजकीय मतप्रणालीच्या अनेक लोकाशी माझा परिचय झाला. एकच घटना या निरनिराळ्या लोकाच्या दृष्टीस किती भिन्नभिन्न प्रकारची दिसते हे पाहणं फारच मनोरंजक वाटतं आधुनिक जागतिक राजकारणातील एक सामर्थ्यवान विचारप्रणाली म्हणजे कम्युनिझम. त्याविषयी अगदी जवळून अभ्यास करण्याची संधी मला यापुढील उत्तरेच्या दौऱ्यात मिळेल अशी अपेक्षा आहे. स्वातंत्र्य संपादनासाठी धडपडत असलेल्या देशातील प्रत्येक सुशिक्षित माणसाला एक चांगली राजकीय पार्श्वभूमी असणे आवश्यक आहे, असं माझं मत झालं आहे तरी पण मी स्वतः मुख्यत: एक डॉक्टर आहे, राजकीय चळवळ्या नाही, हे मी विसरलेलो नाही.

३) परदेश पर्यटन व परकीय लोकाच्या सहवासामुळे काही सुप्त परिणाम माझ्यावर होत असले पाहिजेत; पण मला त्याची जाणीवही नसावी.

थोडक्यात सांगायचं म्हणजे या अत्यंत गाजावाजा करून काढलेल्या आमच्या सहलीचा वेळ अगदीच फुकट गेलेला नाही आणि आम्ही आता जाणार त्या ठिकाणी तरी माझे इप्सित बरेच साध्य होईल अशी मला आशा वाटते.

युद्ध परिस्थितीमुळे भारत-चीन दळणवळणात व्यत्यय आलेला होता त्यामुळे साहजिकच पत्रे वेळेवर मिळत नव्हती. डॉ कोटणीस याना सोलापुरहून फक्त दोन पत्र मिळाली होती. आपली पत्र सोलापुरला पोचत नाहीत, अशी शंका आल्याने त्यानी हे पत्र डॉ. अटल याच्या हाती दिले डिसेंबर १९३८ मध्ये डॉ. अटल हे त्वचा रोगावर औषधोपचार करून घेण्यासाठी हाँगकाँगला गेले होते. डॉ अटल यानी हाँगकाँगमध्ये येताच हे पत्र पोस्ट पेटीत टाकल्याने ते काहीसे वेळेवर सोलापूरला पोचले.

युद्ध वणव्यात दळणवळण बंद पडल्याने डॉ.कोटणिसांच्या घरी होणारा पत्रव्यवहार बराच अनियमित बनला होता त्याचबरोबर डॉक्टराना घरून येणारी पत्रेही लवकर हाती लागत नसत चीनला पोचल्यानंतर कँटनहून डॉक्टरानी आपल्या वडिलाना पत्र लिहिले होते. त्याला उत्तर म्हणून त्याच्या वडिलानी लिहिलं होतं- 'आतापर्यंतची तुझी सर्व पत्रे आम्हाला माहितीपूर्ण व आनंद देणारी वाटली. आपल्या आयुष्यात तुला उच्च अधिकाऱ्याशी व वेगवेगळ्या देशातील महत्त्वाच्या व्यक्तीशी संबंध ठेवण्याचं भाग्य लाभलं आहे, तेव्हा तुझी पत्रं आठवणीच्या स्वरूपातली असायला पाहिजेत यासाठी रोज नेमाने थोडा तरी वेळ तू काढला पाहिजेस. मला विशेषत: तुला सांगायचय ते हे की, तू आपली स्वत.ची नीट काळजी घ्यायला पाहिजेस. कारण तू परदेशात आमच्यापासून हजारो कोस दूर आहेस व तुझ्यापर्यंत पोचणं आम्हाला केवळ अशक्य आहे. तुझी खुशालीची पत्रं हाच तुझ्या आमच्यातला दुवा आहे. डॉक्टर अटल व चोलकर यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या,चांगल्या लोकाच्या संगतीत तू आहेस हेच आमचं समाधान. या अनुभवी लोकाच्या सल्ल्यानं तू वागावंस आणि बंगालहून आलेल्या तुझ्या दोन सहकाऱ्याशी मित्रत्वाचे संबंध ठेवावेस हे काही मी तुला सांगायला नको कृपया वरचेवर पत्र पाठवून आपली खुशाली कळवीत जा युद्ध परिस्थितीमुळे चीनमध्ये टपाल सेवेबद्दल बऱ्याच अडचणी असतील याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. तरीपण अतिपूर्वेकडे गेलेल्या आपल्या लाडक्या लेकाच्या हातचं पत्र घेऊन

येणाऱ्या पोस्टमनच्या वाटेकडे आमचे डोळे नेहमीच लागून राहिलेले असतील.'

## वेदनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ

डॉ. अटलबरोबर हाँगकाँगच्या पत्रपेटीत टाकण्यासाठी डॉ कोटणिसानी डिसेंबर ३८ मध्ये पत्र दिले होते. त्या पत्रात त्यानी १९३९ हे नववर्ष सुखाचे जावो असे म्हटले होते; पण हे पत्र घरी पोचण्यापूर्वीच एका दुर्दैवी घटनेने त्याचे तीर्थरूप काळाने हिरावून नेले होते डॉ द्वारकानाथ कोटणिसाचे वडील तसे कष्टाळू त्यानी आपल्या हिमतीवर सर्व घर सुस्थितीत आणले होते. ते सुस्थितीत होते तरी मागच्या कठीण दिवसाचे त्याना विस्मरण झालेले नव्हते. साहजिकच कोणाही नडल्या–आडल्याच्या मदतीला ते धावून जात असाच त्यांचा एक मित्र अडचणीत आला म्हणून ते त्याला जामीन राहिले तो मित्र आपला शब्द पाळू न शकल्याने तगादेदारानी त्याच्यावर जप्ती आणली अशा अपमानास्पद स्थितीत जगायला नको म्हणून त्यानी आत्महत्येचा मार्ग पत्करला. २७ डिसेंबर १९३८. काही महत्त्वाचे काम आहे असे सागून ते विजापूरच्या रेल्वेत जाऊन बसले व वाटेत विषप्राशन केले. अत्यवस्थ स्थितीतच त्यांना विजापूर हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले; पण २८ डिसेंबर रोजी त्याचे निधन झाले.

ही घटना डॉक्टर द्वारकानाथ कोटणिसाचे वडील बंधू मगेश कोटणिस यानी डॉ. चोलकराना पत्र लिहून कळविली व वडिलाच्या दु खद निधनाचे वृत्त सौम्यपणाने द्वारकानाथच्या कानावर घालावे असे सुचविले. सोबत त्यानी भावालाही एक पत्र जोडले.

पत्र वाचून द्वारकानाथ कोटणीस दु खी झाले; पण त्यानी हा आघात मोठ्या धैर्याने सोसला. ते आपल्या थोरल्या भावाला–मंगेशला लिहितात, 'ही दु खद बातमी सहन करण मला फारस कठीण गेल नाही कालच या शहरावर पहिला बॉबहल्ला झाला व एका झटक्यात ५० माणस मारली गेली. माती–दगडाच्या ढिगाऱ्याखालून बिचाऱ्या निर्दोष बायकामुल, पुरुषाची प्रेतं बाहेर ओढताना मी पाहिली त्यानी असा कोणता अपराध केला होता की त्याना अस हृदयद्रावक मरण याव ? लहानस कोकरू काकडतं म्हणून थड वारा थोपवणारा तो परमेश्वर त्यावेळी कुठं गेला होता ? गरजवताना आपल कावळ देऊन स्वत: काकडून मरण पावलेल्या त्या महात्म्यासाठी त्यान काय केल ?'

'आपल्या आईच दु ख फार मोठ आहे. हजारो मैल दूर असल्यामुळे मी सात्वना करू शकत नाही. तरीपण तिच्या सुखासाठी देवाकडे जरूर प्रार्थना करीत आहे म्हणून साग तू धीर देशील अशी खात्री आहे.'

'तुला मी काहीच मदत करू शकत नाही याचं मला अतीव दु ख होतं. मनाच्या अशा दु खमग्न अवस्थेत सापत्तीक हलाखीच्या परिस्थितीलाही तोड द्याव लागणं खरोखर कठीण आहे. पण या सर्व परिस्थितीला तू तोड देऊ शकशील याची मला खात्री आहे.'

'या प्रसगी आपल्या आईच सात्वन करण्यासाठी आलेल्या आपल्या सर्व आप्त व मित्रमडळीचे माझ्यातर्फे आभार मान.'

वडिलाचे दुःखद निधन झाल्याने मनात वेदना दाटलेल्या पण भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ या जाणिवेने २१ जानेवारी १९३९ सकाळी निघालेल्या भारतीय वैद्यकीय पथकाबरोबर डॉक्टरांनी चुंकिंग सोडले. बरोबर रुग्णवाहिका व ट्रक होताच खरे म्हणजे या दोन्ही साधनाचा या पथकाला हा प्रथमच उपयोग होत होता. रुग्णवाहिकेचा ड्रायव्हर चिनी होता. त्याला चिनी भाषेशिवाय 'इंडोनेशियन' व 'इग्रजी' मोडके–तोडके बोलता येत होते पण ट्रक ड्रायव्हरला मात्र चिनी शिवाय अन्य कोणतीच भाषा येत नव्हती त्याने सामानाआड काही चिन्यांना लपविले होते. भारतीय डॉक्टरानी त्याना खाली उतरायला भाग पाडल्याने हा ड्रायव्हर भडकला. साहजिकच त्याने आपले एकेक प्रताप वाटेत दाखवायला सुरुवात केली. 'निकियांग' येथे एका खानावळीचे फाटकाला धडक दिली तर चेंगटू येथे कॅनेडियन मिशनच्या फाटकाची मोडतोड केली. डानचुग येथे एका दुकानाच्या वरचा तारेचा खाब पाडला. कुठे न कुठे काहीतरी केल्यामुळे हा ड्रायव्हर म्हणजे पथकाला एक डोकेदुखी बनला, तरी त्याशिवाय पर्याय नव्हता.

चुंकिंगच्या पश्चिमेला २८० मैलावर असलेल्या 'चेंगटू' येथे डॉक्टराचे पथक पोचले. तेथे मिशनरी डॉक्टराबरोबर काही काळ वास्तव्य करून पावचीला गेले. पावचीचा रस्ता डोगराळ भागातून जात होता. दिवसरात्र बर्फ पडत असल्याने कडाक्याच्या थंडीने झरे देखील गोठलेले असायचे.

पुरेसे पेट्रोल नसल्याने पावचीला पोचेपर्यंतच ते सपून गेले. साहजिकच पथकाला तेथे काही काळ अडकून पडावे लागले नंतर गाडी व ट्रक तेथेच ठेऊन पथकाने रेल्वेने प्रवास केला प्रवासात पथकातील रेवी अली यांना त्यांच्या ओळखीचा फा नु टे नावाचा बॉयस्काऊट भेटला. तो पूर्वी चिनी रेडक्रॉसमध्ये काम करीत होता. या फा नु टेच्या मदतीने पथकाने आपला पेट्रोलचा प्रश्न सोडविला. अखेर ते २ फेब्रुवारीला सध्याकाळी सिआनला पोचले. सिआन हे शान्सी प्रांताच्या राजधानीचे शहर पूर्वी ते हान व टाग राजघराण्याचे राजधानीचे शहर होते. भारतात आलेला सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएन सग हा येथून पायी प्रवासाला निघाला होता. त्याच्या स्मरणार्थ बाधलेल्या मनोऱ्याचे–पॅगोडाचे अवशेष अद्यापही अस्तित्वात आहेत.

## येनानमधील स्वागत

भारतीय वैद्यकीय पथक आणि येनान याच्यात काहीतरी वितुष्ट असावे. तसे येनान म्हटले की काही ना काही अडथळे येतच होते. प्रारभापासूनच ही परिस्थिती होती. येनानला जायला निघताना अखेरच्या क्षणी देखील कटकटी उद्भवल्याच. चॅग कै शेकचा अत्यत विश्वासातला चेंग–टिंग–वेन हा त्या प्राताचा गव्हर्नर होता. तो भारतीय पथकाला काही केल्या पुढे जायला परवानगी देईना. तेव्हा पथकाने रेवी अलीच्यामार्फत जनरल च्यू नावाच्या सेवानिवृत्त माचू जनरलशी सपर्क साधला. वाटाघाटीत औषधांचा साठा व इतर साहित्य बरोबर न्यायचे नाही, या अटीवर पथकाला येनान प्रातात प्रवेश देण्याचे मान्य करण्यात आले. नंतर परत एकदा वाटाघाटी झाल्या. त्यात फक्त क्ष किरण साहित्य व शस्त्रक्रिया उपकरणं बरोबर न्यायला अनुमती मिळाली. त्याप्रमाणे पथकाने प्रवासासाठी पुरेसे पेट्रोल घेऊन येनानकडे प्रयाण केले.

वाटेत त्यांना कडाक्याची थंडी, जिकडे तिकडे बर्फाच्या राशी, रस्ता डोंगराळ भागातून जाणारा वगैरेला तोंड द्यावे लागले. या भागातले बहुतेक लोक डोंगराच्या उतरणीवर खोदलेल्या गुहांतून रहात. लोक विटाने व मातीने बांधलेल्या पोकळ कट्ट्यावर झोपत. या कट्ट्यांच्या पोकळीत विस्तव घालून त्या गरम ठेवल्या जात. त्याला 'काँग' म्हणत. भारतीय डॉक्टरांना आपल्या अंगातली उष्णता कायम ठेवण्यासाठी या काँगचा भरपूर उपयोग झाला.

येनान वाटेवर कोमिंटांग सरकारच्या ताब्यात असलेले शेवटचे ठिकाण लोचुआन लागले. त्यानंतर वीस ली हे खेडे लागले. वीस ली पार करताच येनानचे दर्शन त्यांना झाले.

येनानचा सर्व कारभार कम्युनिस्टांच्या ताब्यात होता. या भागाला भेट देणारे पहिले परदेशी पथक म्हणून भारतीय वैद्यकीय पथकाचे अत्यंत उत्साहाने स्वागत केले गेले. भित्तीपत्रके, कापडी फलक, त्याच बरोबर स्त्री-पुरुषांच्या दुतर्फा जमावाने 'भारतीय डॉक्टरांचे स्वागत असो' अशा घोषणात येनानमध्ये स्वागत झाले. १२ फेब्रुवारी १९३९ रोजी पथकाच्या स्वागतासाठी एक सभा झाली. या सभेला खुद्द माओ-त्से-तुंग व चिनी कम्युनिस्ट पार्टीचे प्रमुख नेते उपस्थित होते. स्वागताला उत्तर देताना डॉ. अटल यांनी 'हिंदी लोकांच्या मनात चीनबद्दल अपार सहानुभूती आहे व चीनच्या मदतीसाठी भारताचा मैत्रीचा हात सदैव पुढे असेल असे सांगितले.' डॉ. अटल यांचे भाषण जेव्हा दुभाषाने अनुवादीत करून सांगितले तेव्हा श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात भारताचा जयजयकार केला.

येनान शहर येन व दुसरी एक नदी यांच्या संगमावर वसलेले आहे. भोवताली डोंगर आहेत. येथले तपमान शून्याच्या खाली ७-८ डिग्री खाली असल्याने नदी, नाले, गोठून जात. दिवस असो की रात्र, दोन-दोन-तीन-तीन पायमोजे घालून त्यावर चांगल्या जाड तळाचे बूट घालावे लागत. तरीही थंडीने पायाला वेदना होत असत.

चीनच्या कम्युनिस्ट पार्टीचे मध्यवर्ती केंद्र व लाल सेनेचा प्रमुख तळ म्हणून येनानचे महत्त्व बरेच वाढलेले होते. त्यात जपानच्या आक्रमणाने तर सर्वांचे लक्ष येनानकडे लागले होते बाहेरून येणाऱ्या लोकांच्या लोंढ्यामुळे येनानची लोकसंख्या बरीच वाढली होती. त्यामुळे घरांचा प्रश्न निर्माण झाला होता. भोवतालचे डोंगर खोदून 'गुहा-गृहे' बांधली गेली होती. त्याला 'याओ-फेंग' म्हणत असत. उजेड येण्यासाठी खिडक्या पाडून तावदाने बसवलेली असत. कम्युनिस्ट सरकारच्या प्रशासकीय कचेऱ्या, शाळा, इस्पितळं, टपाल व तार कचेऱ्या या 'याओ-फेंग' मध्येच असत. हॉस्पिटलसदेखील त्यात असत. एकावेळी यात ७५ ते १०० माणसे राहू शकतील अशा या 'याओ-फेंग' असत. बाँब हल्ल्यापासून ही 'गुहा-गृहे पूर्णपणे सुरक्षित होती.

भारतीय पथकाने चीनमधील ज्या ज्या शहरांना भेटी दिल्या त्यापेक्षा येनान शहर वेगळे आहे हे त्यांच्या चटकन लक्षात आले. चीनमधील इतर भागापेक्षा या भागातील लोक सुदृढ, तगडे, कामसू होते. लोकांना संगीताची मनापासून आवड होती. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर रात्रीच्या वेळी सैनिक, विद्यार्थी नाच-गाण्याचे कार्यक्रम करीत. साहजिकच त्यात भारतीय डॉक्टरांचीही उपस्थिती असे. भारतीय डॉक्टरांना गाणी म्हणण्याचा आग्रह केला जाई. एका पत्रात डॉ. कोटणीस म्हणतात, 'आणि माझ्या अत्यंत गोड (!) आवाजात जेव्हा मी गाणं म्हणतो तेव्हा एवढ्या टाळ्या पडतात की, बालगंधर्वांनासुद्धा माझा हेवा वाटला असता.'



**चेअरमन माओ-त्से-तुंग बरोबर येनान येथे (१९३९)**
**-डॉ. अटल (उजवीकडे) व डॉ. द्वारकानाथ कोटणीस**

□

## चिनी नेत्यांची भेट

एका भल्या पहाटेच भारतीय पथकाला चेअरमन माओ त्से तुंगकडून भेटीचे निमंत्रण मिळाले. त्यावेळी माओ येनानपासून थोडेसे पश्चिमेला फिनिक्स टेकडीवरील गुहा-गृहात वास्तव्याला होते. त्यांच्या या घराला तीन खोल्या होत्या. उजव्या बाजूला कचेरी व झोपण्याची खोली, डाव्या बाजूला अभ्यासिका, त्याला लागून असलेल्या तिसऱ्या खोलीत भेटीगाठीची व्यवस्था होती

या ठिकाणी माओत्सेतुंगविषयी थोडक्यात माहिती घेऊ.

कोट्यावधी चिनी जनतेच्या आशा-आकांक्षांचे व क्रांतीच्या सफलतेचे प्रतीक बनलेला माओ त्से तुंग २६ डिसेंबर १८९३ रोजी शाओशान (हुनान प्रांत) येथे एका शेतकऱ्याच्या पोटी जन्मला. माओ प्रथम चांगशाला शाळेत गेला व पुढे २५ व्या वर्षी १९१८ च्या उन्हाळ्यात पेकिंगला गेला.

माओचे लग्न त्याच्या वडिलांनी वयाच्या १६ व्या वर्षी एका आडदांड शेतकऱ्याच्या मुलीबरोबर लाऊन दिले होते. या पोरीचे पुढे काय झाले माहीत नाही. १९२० मध्ये प्रोफेसर यांग यांची सुंदर

तरुण मुलगी– यांग–कुई–हुई या बुद्धिमान मुलीबरोबर प्रेमविवाह झाला. यांग–कुई–हुई केवळ सुंदर नव्हती, तर अतिशय बुद्धिमान क्रांतिकारक होती पुढे कोमिंटागच्या सैन्याने तिला ठार मारले. तिला दोन मुले होती.

कियागशी सोव्हिएत स्थापण्याच्या सुमारास १९२८ साली माओने हो-त्सू-सेन हिच्याशी विवाह केला. तिला तीन मुले झाली. तीन मुलासह ती लॉगमार्चमध्ये सहभागी झाली आजारी म्हणून तिला रशियात पाठविले. तिकडेच ती वारली

माओची पुढे चॅग–चिंग या नटीबरोबर ओळख झाली. चॅग–चिंगचे पूर्वाश्रमीचे नाव लान–पिंग. १९३६ पर्यंत शाघाय फिल्म स्टुडिओत ती नटी होती. १९३३ मध्ये तिने गुप्तपणे कम्युनिस्ट पार्टीचे सभासदत्व स्वीकारले १९३९ मध्ये माओने लान–पिंगशी विवाह केला. १९६६ च्या रेडगार्डसची ती संचालिका होती.

माओ येनान येथील दोन खोल्याच्या गुहेत आपली पत्नी, मुलासह रहात असे. शेजारच्या शेतात कादे, बटाटे, टमाटे, तादूळ पिकवी.

लालबुद गाल, स्वच्छ चेहरा, भव्य कपाळ, डोळयाच्या फटीतून दिसणारी काळीभोर बुबळे, कपडे साधे असत अगावर जीर्ण कोट, डोक्यावर सुरकुत्या पडलेली टोपी, तळवे झिजलेले बूट.

माओची सरकारी कचेरी झाडाखाली किंवा जुनाट तबूत तर कधी एखाद्या शेतकऱ्याच्या झोपडीत तर कधी गुहेत. राहणी साधी, सैनिकी पोशाखाचे दोन जोड, अथरायला सतरजी, कापूस–लोकर मिश्रित दोन पांघरुणे शिवाय एक स्वेटर. भात शिजवायला कटोरा, ठिगळे लावलेली छत्री, ब्रिफकेस, स्वत:चे सामान स्वत:च बरोबर घेई. मध्यरात्रीपर्यंत काम मग दुपारी शिजवलेला भात खाई शिल्लक राहिला तर कागदात बाधून ठेवीत असे व दुसरे दिवशी खाई.

माओ गप्पा मारताना किती स्वच्छ गप्पा मारीत असे त्याचे एक उदाहरण म्हणजे पत्रकार ॲना लुई स्ट्रॉंग हिच्याशी झालेल्या त्याच्या गप्पा-' कम्युनिस्ट कशासाठी लढताहेत हे मी अमेरिकनाना कसे समजावून सागू ?'

— ॲना लुई स्ट्रॉंग

' चॅगच्या सेना गरीब, शांतताप्रिय लोकाना ठार करतात म्हणून हे लोक स्वसंरक्षणासाठी लढतात. ते लोक स्वसरक्षणासाठी लढतात हे अमेरिकनांना महज समजू शकेल '

—माओ

' कम्युनिस्ट असा किती वेळा लढा देऊ शकतील ?'

—ॲना लुई

' एक दिवसही लढण्याची आमची इच्छा नाही; पण लढायचे किंवा नाही हे आमच्या इच्छेवर अवलबून नाही आणि जोपर्यंत आम्हाला लढणे भाग आहे तोवर आम्ही लढू.'

—माओ

असाच मोकळेपणा भारतीय पथकालाही अनुभवायला मिळाला. भारतीय पथकाने प्रवेश करताच माओ त्से तुंग उठून उभे राहिले. त्यानी प्रत्येकाचा परिचय करून घेत सर्वांशी हस्तांदोलन केले व बराच वेळपर्यंत त्याच्या गप्पा झाल्या. माओनी गांधी, नेहरू व देशातील राजकीय स्थितीबद्दल प्रश्न विचारले. एम्. एन्. रॉय यानी चीनमध्ये कोमिंटागच्या वतीने काम केल्याचा उल्लेख करून सध्या ते कुठे असतात, क्रांतीकारी चळवळीशी त्यांचा काही सबध आहे का वगैरे चौकशी केली.

येनानच्या वास्तव्यात भारतीय डॉक्टरांना माओत्सेतुंग, चाऊएन लाय, जनरल चुतेह व कम्युनिस्ट पार्टीच्या अन्य नेत्याची भेट घेण्याची अनेक वेळा सधी लाभली एकदा तर चाऊएनलाय याचा घोड्यावरून पडल्याने हातच मोडला. तेव्हा त्यानी तात्काळ भारतीय डॉक्टरांना पाचारण केले व हाताचे प्लॅस्टर काढण्याच्या दिवशी डॉक्टर अटल, डॉ बसु व डॉ. कोटणीस हे गेले. पाऊस पडला असल्याने वाटेत चिखल होता व प्रवास घोड्यावरून होता. प्रवास करताना वाटेत ते तिघेही घोड्यावरून पडून चिखलात भरले. नेमके त्यावेळी माओत्से तुगही तिथे हजर होते. भारतीय डॉक्टराच्या कपड्याकडे बघत ते म्हणाले. ' हे माझे दोनही पाय आहेत ना हेच माझे विश्वासू घोडे ते मला कधी दगा देत नाहीत ' माओच्या वक्तव्यावर हास्याची खसखस पिकली.

## ' कांगटा 'ची स्थापना

येनानला भारतीय पथकाची सोय एका हॉटेलात करण्यात आली होती कामाला सुरुवात करण्यापूर्वी त्याना पन्नास मैलाच्या परिसरातील वैद्यकीय सस्था नेऊन दाखविण्यात आल्या या भागातील रस्ते खराब होते. खेचर किंवा घोड्यावर बसून जावे लागत असे. येनानपासून १५ मैलावर असलेल्या विकमाव येथील हॉस्पिटलची जबाबदारी डॉ. अटल, डॉ बसू व डॉ कोटणीस या तिघावर सोपविली गेली. डॉ. कोटणीस याच्याकडे शस्त्रक्रिया व क्ष–किरण विभाग सोपविला गेला. विकमाव हॉस्पिटलचे रुपातर ' आदर्श हॉस्पिटल 'मध्ये करावे म्हणजे इतराना त्याचे अनुकरण करता येईल असे चिनी नेत्याकडून डॉ. अटल याना सुचविण्यात आले

विकमावचे हे हॉस्पिटल म्हणजे डोंगरात कोरलेल्या गुहा होत्या. एकदर पंचवीस गुहा कोरण्यात आल्या होत्या. त्यापैकी १६ गुहा एका रागेत होत्या. प्रत्येक गुहेत पाच याप्रमाणे एकूण २०२ खाटाची सोय करण्यात यावयाची होती सासर्गिक रोगाच्या रुग्णासाठी शेजारच्या डोगरावर स्वतत्र गुहा कोरल्या जाणार होत्या.

येनानपासून ८० मैलावर असलेल्या वायशॉव येथील वैद्यकीय शाळेत डॉक्टर चोलकर आणि डॉ. मुखर्जी परिचारिकाना शिक्षण देत असत.

हिंदी वैद्यकीय पथकाने अल्पावधीतच लोकप्रियता प्राप्त केली. २४ मे १९३९ रोजी प जवाहरलाल नेहरू यानी लिहिलेल्या पत्रात माओत्से तुग म्हणतात–

' हिंदी वैद्यकीय पथकाचे स्वागत करण्याचा मान आणि आनंद आम्हाला मिळाला. तसच हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसनं चिनी जनतेला जपानी साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्यास दिलेले प्रोत्साहन व शुभेच्छा संदेश मिळाला. आम्ही आपणास कळवू इच्छितो की हिंदी वैद्यकीय पथकाने इथे आपल्या कार्यास सुरुवात केली आहे व आठव्या फौजेचे सर्व सभासद त्याचं हार्दिक स्वागत करीत आहेत. आमच्या अडचणीत सामील होण्याची त्याची जिद्द पाहून तर त्याच्याशी संबध येणाऱ्या

सर्वांवर चागलीच छाप पडते. आपण आम्हाला वैद्यकीय व इतर साधन सामुग्रीची जी मदत पाठविली त्याबद्दल आपल्या थोर हिंदी जनतेचे व हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसचे आभार मानण्याची ही संधी आम्ही घेत आहोत. आम्हाला आशा आहे की भविष्यकाळातसुद्धा हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेस व हिंदी जनता आपली मदत चालू ठेवील. आणि जपानी साम्राज्यवाद्याना घालवून देण्यास आम्हास सहाय्य करील.'

भारतीय पथकाचा निघताना तसा कार्यकाल निश्चित करण्यात आलेला नव्हता, तरी साधारणत: वर्षभर थांबण्याची कल्पना होती. पण वर्षभरातील कामात चागली सफलता मिळाल्याने पथकाचा मुक्काम त्यानी चार महिन्यानी वाढविला म्हणजे डिसेंबर १९३९ अखेरपर्यंत जायचे ठरले डॉ. चोलकर यानी मात्र मे १९३९ मध्ये परतण्याचा निर्णय घेतला.

१९३९ मध्ये गनिमी पद्धतीमुळे जपानी टेकीला आले होते. युद्ध चालू ठेवण्यापलिकडे मुसंडी मारणे त्याच्या दृष्टीने कठीण बनले होते जिथे रस्ते नाहीत, जगले आहेत, दऱ्या–खोऱ्या डोंगर आहेत तिथे जपानी जात नसत. उलट चिन्याचे आश्रयस्थान हेच असे. जपान्यानी चढविलेल्या निकराच्या बॉंब हल्ल्यामुळे वाहतूक व टपालसेवा पार विस्कळीत झाली होती. ३९ च्या जूनमध्ये मध्यावर जपान येनानच्या पूर्वेला शभर सवाशे मैलावर पीत नदी ओलांडण्यात यशस्वी झाला येनानला शत्रू साधारणत. आठवडाभरात पोचू शकत होता. त्यामुळे अतर्गत भागात हॉस्पिटल हालविण्याचा आदेश मिळाला पण गनिमी पथकाने पिछाडीने जाऊन जपान्याची फळी तोडल्याने जपानी पुढे सरकले नाहीत.

युद्ध चालू असल्याने हिंदी पथकावर कामाचा फारसा बोजा नव्हता. होते ते काम सर्वजण मन लावून करीत होते. जूनच्या एका महिन्यातच या पथकाने निरनिराळ्या मोठ्या पंचावन्न शस्त्रक्रिया पार पाडल्या होत्या. जवळचा औषधाचा साठा सपत आल्याने चिनी रेडक्रॉस अधिकाऱ्याकडून औषधे घ्यावी लागली.

तरुणाना क्रातीप्रवण करण्यासाठी माओत्से तुगने १९३७ मध्ये 'कागटा' ही सस्था स्थापन केली होती. 'कागटा'चा अर्थ चिनी लोकाचे जपानविरोधी लष्करी व राजकीय कॉलेज, असा त्याचा थोडक्यात अर्थ. या 'कागटात' तीस हजार विद्यार्थी होते. येनान हे प्रतिकाराचे मुख्य केंद्र ठरवून हे जपान्यानी येनानवर प्रचड बॉंबवर्षाव केला. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांना जपान्याच्या पिछाडीला हलविण्याचा निर्णय घेतला गेला. त्याप्रमाणे १५ हजार विद्यार्थी पीत नदीमार्गे शान्सी प्रात ओलाडून गेले. जपान्याच्या ताब्यातील रेल्वेलाईन पार करण्यापूर्वी, त्यानी आपले तीन गट केले.

युद्धभूमीशी चटकन सपर्क साधणारी एक मजबूत फळी होती. त्याच्यापैकी काहीनी प्रत्यक्ष युद्धात भाग घ्यायचा तर उरलेल्यानी शत्रूने कब्जा केलेल्या भागात फिरून प्रचार करायचा. गाणी, नाटक, फलक याद्वारे जनजागरण करायचे. त्याच्या दिमतीला डॉक्टर व परिचारिकाचे एक पथकपण देण्यात आले होते. पाठीवर पिशवी, पाण्याची बाटली, जेवणाच्या कांड्या, कपडे वगैरे आपापले सामान प्रत्येकाच्या पाठीवर लादलेले असे. कित्येक वेळा गनिमी तुकडीत चकमक होत असे. अशा वेळी खाण्यापिण्याच्या पदार्थांनी भरलेल्या पिशवीचा वापर केला जाई.

'कागटा'चा प्रवास, दक्षिण–पूर्व शान्सीकडे जाणारा होता. अंतर जवळजवळ पाचशे मैलाचे होते. अशाच एका तुकडीबरोबर जाण्याचा आदेश डॉ. बसू व डॉ. कोटणीस याना मिळाला. दोघेही 'क्लोअिमाव' हॉस्पिटलमधून प्रथम येनानला आले. नतर तुकडीत सहभागी झाले. दररोज पंचवीस मैलाचा प्रवास करीत शत्रूच्या फळीतून पीतनदी ओलाडायची होती. त्याबद्दल डॉ. कोटणीस लिहितात. 'आम्हाला आमच्या नियोजित स्थळी पोचायला महिना तरी लागेल. या प्रवासातील ५०० मैलाच्या प्रत्येक मैलागणिक आम्ही एखादा डोंगर चढत तरी असू किंवा उतरत तरी असू. खरोखरच मोठे कठीण काम आहे! शत्रूच्या प्रदेशातून जाताना रात्रदिवस चालत रहावं लागणार आहे. आमच सामान न्यायला आम्हाला एक खेचर देण्यात आल आहे. शिवाय मदतीला पण एक मनुष्य आहे. आतापासूनच आम्ही सैनिकी जेवणावर आहोत. दिवसातून तीन वेळा जेवण मिळतं. प्रत्येक जेवणात भरपूर धान्य, भाताप्रमाणे किंवा पेजेप्रमाणे शिजवलेले असते. (मिठाशिवाय) आणि उकडलेली भाजी असते. तीसुद्धा मीठ किंवा मिरीशिवायच दूध किंवा साखरेशिवायच्या पांचट चहाची आम्हाला जरा जरा आवड उत्पन्न व्हायला लागली होती. पण तीही मिळत नाही. बऱ्याच प्रयासानं शोधून मिळणारं एकमेव फळ म्हणजे जगली काकडी.'

## चुंकिंगमध्ये पंडितजी

डॉ. मुखर्जी काही काळ हवापालट करण्यासाठी सिआनला गेले होते. पण तिथे त्यांचा किडनीचा आजार अधिकच बळावल्याने त्यानी भारतात परतायचा निर्णय घेतला. दक्षिण–पूर्व शान्सीकडे निघण्याआधी डॉ. मुखर्जींची भेट घ्यावी म्हणून ३ जुलै १९३९ मध्ये सिआनला जाऊन आले व सर्वांना भेटून गेले

डॉ कोटणीस व डॉ. बसू येनानला परतले तेव्हा पधरा हजाराचा गट त्याच्या प्रतिक्षेत होता; पण या डॉक्टराचे या तुकडीबरोबरचे जाणे ऐनवेळी रद्द करण्यात येऊन त्याना अति महत्त्वाच्या व्यक्ती असलेल्या गटाबरोबर प्रवास करायला सागण्यात आले. निघण्याच्या तयारीत असतानाच ते ज्या ठिकाणी जाणार होते तिथे युद्धाची तीव्रता अधिक वाढल्याने प्रवास स्थगित करण्याचा आदेश मिळाला

डॉ. बसू, डॉ. कोटणीस व डॉ. अटल येनानमध्ये असताना १७ ऑगस्ट १९३९ रोजी पडीत नेहरूची तार मिळाली ते २४ ऑगस्टला चुंकिंगला येत होते. साहजिकच तिघानाही फार आनद झाला. पडीतजी दोन महिन्याच्या वास्तव्यात येनानला भेट देतील त्यावेळी त्याच्याबरोबर त्यांना पुढील कार्यक्रम ठरवायचा होता जानेवारी १९४० मध्ये वैद्यकीय पथक भारतात परतणार होते. त्याच्या जागी नवीन पथक येणार की काय याचा उलगडा पडीतजीच्या भेटीत झाला असता; पण पडीतजीची दुसरी तार आली, त्यात त्यानी लगेचच भारताकडे निघणार असल्याचे कळविले होते त्यामुळे पथकाची निराशा झाली. दरम्यान डॉ. मुखर्जी भारताकडे निघालेच होते, ते पंडीतजी चुंकिंगला येईपर्यंत तिथेच थांबले. चुंकिंगला दोघांची भेट झाली. या भेटीत हिंदी पथकाने केलेल्या कार्याची सविस्तर माहिती डॉ. मुखर्जींनी पडीतजीच्या कानावर घातली.

पंडीत नेहरू दहा–बारा दिवस चुंकिंगमध्ये होते. त्या काळात

त्याना युद्ध परिस्थिती स्वतःच्या डोळ्यानी पाहता आली. ते लिहितात– ' आकाशातून प्रत्यक्ष मृत्यू झेप घेत असतानाही चिनी लोकाचे समुदाय अगदी शातपणे व कुठल्याही प्रकारे विचलित न होता वावरत असलेले पाहून कौतुक वाटल. युद्धाचा एवढा भयकर ताण असूनही शहरी जीवन नित्याप्रमाणे सुरळीत चाललेल दिसत होत. मी कारखाने, उन्हाळी शाळा, लष्करी शिक्षण संस्था, तरुणाची शिबिर, विद्यापिठं याना भेटी दिल्या जुन्यापुराण्या विचाराच्या मुळासकट उखडून निघालेल्या या सस्था, केवळ बाबूच्या झोपड्याच्या आश्रयाने नवजीवन व चेतना मिळवत आहेतस दिसल. ग्रामीण सहजीवनाची चळवळ व छोटे घरगुती उद्योगधंदे पाहून मला आश्चर्य वाटल. '

१ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने पोलडवर आक्रमण करून दुसरे महायुद्ध सुरू केले. त्यामुळे युरोपभर युद्धाचा भडका उडाला युद्धात इग्लड सहभागी होते त्यामुळे भारतातील राजकीय स्थिती गुतागुतीची बनली. साहजिकच पडितजीनी तातडीने भारतात परतायचा निर्णय घेतला व चिनी सरकारच्या विमानाने ते भारताला रवाना झाले.

डॉ. कोटणीस, डॉ. अटल, डॉ. बसू या तिघानी डिसेंबर १९३९ नतर भारतात परतण्याचे ठरविले होते व तसा निर्णय हिंदी राष्ट्रीय काँग्रेसला कळविला होता. पण युद्ध विभागातून स्वत जनरल च्यूह-तेह यानी व्यक्तिगत तार करून हिंदी पथकाला दक्षिण–पूर्व शान्सीतील प्रमुख ठिकाणी येण्याची विनती केली. खरे म्हणजे हिंदीपथक भारतात परतायला अधिर बनले होते; पण त्याना ऐन लढाईत चालून आलेली मदतीची सधी दवडावी वाटत नव्हती. हा कम्युनिस्टाचा मोठा अड्डा होता. पाच महिन्यापूर्वी ते तिकडे निघाले होते; पण जपान्यानी आक्रमणाची तीव्रता वाढविल्याने बेत रद्द करावा लागला होता; पण त्याना ही सधी आता घालवायची नव्हती त्याप्रमाणे त्यानी हिंदी काँग्रेसला तसे कळवून टाकले डॉ. कोटणीस यानी घरी एक पत्र टाकून आपला निर्णय कळविला व चिंता करू नये असे सागितले.

४ नोव्हेंबर १९३९ रोजी भारतीय डॉक्टर्स–डॉक्टर अटल, डॉ. बसू व डॉ. कोटणीस येनान सोडून सिआनमार्गे दक्षिण–पूर्व शान्सीवरील लाल सेनेच्या मुख्य ठाण्यावर जाण्यास निघाले. या भागाचे प्रमुख होते जनरल च्यूह-तेह त्याची ऑगस्ट १९३७ मध्ये आठव्या सेनेचे प्रमुख म्हणून नियुक्ती झाली होती जनरल च्यूह तेह यानी लाल फौजेच्या ११५, १२०, १२९ ह्या तुकड्या अत्यत हिकमतीने पीत नदी पार करून शान्सी प्रातात आणल्या होत्या.

## अविस्मरणीय प्रसंग

शान्सी भागात जाण्यापूर्वी डॉ. अटल यानी पडित जवाहरलाल नेहरू व डॉ. जिवराज मेहता यांना आपला कार्यक्रम कळविला होता तत्पूर्वी सिआनमध्ये भारतीय डॉक्टराचे पथक असताना कोमिंटागच्या लोकानी चुंकिंगमध्येच काम करण्याची विनती भारतीय डॉक्टरांना केली होती; पण अटल यानी आठव्या फौजेबरोबर काम करण्यात आम्हाला जास्त आनद आहे, असे स्पष्ट शब्दात सागितले होते.

साधारणतः दोन महिन्यानतर भारतीय डॉक्टरांचा उत्तरेकडे वुथाईशान इथ जाण्याचा विचार होता,कारण त्या भागात प्युपिन येथे डॉ नॉर्मन बेथ्यून यानी सुरू केलेले अंतरराष्ट्रीय ' शातता हॉस्पिटल ' होते. त्याला भेट द्यायची इच्छा होती. स्वतः बेथ्यून याना भारतीय डॉक्टर्सच्या पथकाची मदत हवीच होती. बेथ्यून यानी सुरू केलेल्या वैद्यकीय शाळात शिकविण्यासाठी कोण तरी हवे होते. भारतीय डॉक्टर्स–विशेषतः डॉ. कोटणीस यानी प्युपिन येथे राहून हॉस्पिटल व शाळा साभाळावी अशी बेथ्यून याची इच्छा होती व या कालावधीत ते अमेरिका, कॅनडात जाऊन औषधे, पैसे गोळा करणार होते. पण दुर्दैवाने डॉ. बेथ्यून याचे ९ नोव्हेंबर १९३९ रोजी आकस्मिक निधन झाले.

चीन–जपान युद्धाचे पारडे आता फिरले होते. चीनने चागशा परत जिंकून घेतले होते. तर जपानने व्यापलेल्या हँको व कँटन शहरावर बॉबफेक करून जपान्याना जेरीस आणले होते.

वुताईशान येथे जपान्याच्या पिछाडीला असलेला आठव्या सेनेचा मोठा तळ होता तिथे भारतीय पथक जाणार होते तेथून पेकिंगजवळ असलेल्या शान्सी प्रातात प्रवेश करणार होते. प्रवासाचा कालावधी साधारणतः सहा महिन्याचा गृहीत धरला होता त्यानंतर ते परत येनानला परतणार होते ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे डॉक्टरमडळीनी १८ नोव्हें. १९३९ मध्यरात्री सिआन सोडले.

या प्रवासाबद्दल डॉ. कोटणीस एका पत्रात लिहितात, ' आमच्या मार्गावरील एक मोठे शहर जपान्यानी काबीज केलं होतं आणि त्याच्या दोन्ही बाजूला असणारी दोन खेडेगाव पण त्याच्याच हाती होती शहराकडे जाणारा मुख्य रस्ताही त्यःच्याच ताब्यात होता. आणि नव्या दमाच आलेलं सैन्य बहुधा याच रस्त्याने लष्करी ठाण्यावर जात असे. खरं म्हणजे अशी माहिती मिळाली होती की, ताज्या दमाच्या दोन हजार तुकड्या त्या दिवशीच शहरात येऊन धडकल्या होत्या. नेहमी साधारणपणे ४०० ते ५०० सैनिक तिथे ठेवलेले असत त्या दिवशी चिनी गनिमानी बाजूला असलेल्या दोन्ही खेड्यावरती नेहमीपेक्षा जोरदार हल्ले चढविले होते. अशा तऱ्हेने जपानी सैन्याला बाहेर काढून आपल्याकडे खेचून घेण्याचा त्याचा प्रयत्न होता. हा उद्देश साध्य झाला आहे की नाही, याबद्दल मात्र आम्हाला नक्की कळलं नव्हत. एक अधिक खबरदारी म्हणून व आम्ही सुखरूप पार होईपर्यंत जरूर लागल्यास शत्रूला थोपवून धरण्यासाठी आम्ही आमच्याबरोबर नेहमीच सैनिक असलेल्या तीनशेच्या दोन तुकड्या व शभर गनिमी योद्धे घेतले होते जपानी सैन्य चिनी सैनिकावर हल्ला करण्याचा प्रयत्न क्वचितच करी. कारण रात्रीच्या काळोखात चिनी सैनिकाची सख्या खरोखर किती याचा त्याना अदाज लागत नसे आम्ही एकेकटयाची ओळ करून डोंगरातल्या दरीतून जात होतो बोलणे किंवा सिगारेट ओढण्याला सक्त मनाई होती. सुरुवातीस थोडे चादण होते; पण नतर एकदम मिट्ट काळोख झाला. आमचे पाय बर्फावरून पुन्हा पुन्हा घसरत होते. एका जपानी ठाण्यानजिक आल्यानतर आमच्या बरोबरचे सैनिक दोन्ही बाजूच्या डोंगरावर चढले. त्यानी आम्हाला दरीतून पळत जायला सागितले. शहर जेमतेम २–३ फर्लांग अंतरावर होत आणि आम्ही जवळजवळ एका उडीतच मोटारीचा तो रस्ता ओलाडला. मला वाटत नाही त्या दिवशी शहराकडे जाणारा रस्ता ओलाडायला मी जेवढी घाई

केली तेवढी मुंबईत क्विन्स रोड ओलांडतानासुद्धा कधी केली नसेल. जपान्यांनी थोडया फैरी झाडल्या खऱ्या; पण त्या आम्ही धोक्याच्या पलीकडे मैलभर पोचल्यानंतर. आम्ही आमच्या वाटेवर तीन-चार फर्लांगापर्यंत पुढे गेल्यावर पुष्कळसे गनिम पुन्हा मागे गेले आणि जपान्यांच्या दळणवळणाची एक मैलभर लांबीची टेलिफोन वायर कापून काढली व ती आपल्याबरोबर घेऊन आले. आम्ही तिकडून गेल्यानंतर एका आठवडयाच्या आतच चिनी लोकांनी ते शहर व दोन्ही बाजूंची दोन्ही खेडीसुद्धा काबीज केली. या भागातील खेडी केव्हा ना केव्हा, त्यातली काही जवळजवळ आठ वेळा जपान्यांच्या ताब्यात होती. नाव सोडून जायची पाळी आली की गावातील घरांना ते आग लावून टाकीत. त्यामुळे इकडची बरीच घरं छपरांशिवाय आहेत.'

## डॉ. अटल भारताकडे

डॉ. कोटणीस यांनी भारतीय पथकातले डॉक्टर्सदेखील किती काळजी घेत याचे वर्णन केले आहे; पण युद्धाच्या वातावरणात जीवन जगण्याचा प्रसंग कधी न आल्याने त्यांच्याकडून देखील चुका घडत. एकदा असेच डॉ. बसू झोपेने पेंगुळले होते. झोप जावी म्हणून त्यांनी सहज सिगारेट शिलगावली. तत्क्षणी एका जपान्यांच्या बंदुकीचा आवाज झाला. सुदैवाने डॉक्टर बसू अगर कोणा भारतीय डॉक्टरांना इजा झाली नाही.

डोंगराळ रस्ते, कडाक्याची थंडी, अंधार यातून मार्ग काढीत जवळजवळ पंचवीस मैल पायी चालत भारतीय पथक जपान्यांचा मार्ग ओलांडून दुसरे दिवशी सकाळी ६ वाजता सैनिकी तळावर येऊन पोचले. त्यात भर पडली ती वाटाडयांच्या चुकीची. तो रस्ता चुकला पण त्याच्यावर सर्वांना डोंगराची चढउतार करावी लागली. त्याचा परिणाम असा की दिवसभर डॉक्टरांना झोपून काढावे लागले. थकल्यामुळे त्याना इतकी झोप लागली की बाँब पडल्याचीही जाणीव त्यांना झाली नाही. सर्वांनी निघताना त्यांना उठविले. त्यानंतर तीन दिवस अखंड प्रवास केल्यानंतर शान्सीच्या आग्नेय दिशेला वुशियांग जवळील आठव्या फौजेच्या प्रमुख तळावर ते पोचले.

ठाण्यावर पोचल्यानंतर लगेचच त्यांची भेट जनरल च्यूह-तेह यांच्याशी झाली. आठव्या फौजेचा हा मुख्य तळ वांग-चिआ-यु व च्युआन-पी या दोन गावांमध्ये होता. ही गावं शान्सी प्रांताच्या आग्नेय दिशेला वुशियांग जिल्ह्यात तायहांग पर्वताच्या पायथ्याशी अगदी आतल्या बाजूस होती. जनरल च्यूह तेह यांचे लष्करी ऑफीस एका शेतकऱ्याच्या अंगणात होते. डॉ अटल, डॉ बसू व डॉ. कोटणीस तिघंही जनरल च्यूह तेह यांच्या या प्रमुख तळावर जानेवारी ११४० पर्यंत एक महिनाभर राहिले.

या काळात त्यांनी स्थानिक हॉस्पिटलमध्ये काम केले. हे हॉस्पिटल म्हणजे अनेक झोपडयांचा समूह. हॉस्पिटलचे निरनिराळे विभाग शेतकऱ्यांच्या झोपडयांमध्ये विखुरलेले होते तर कित्येक विभाग जवळपासच्या खेडयातील झोपडयातही होते साहजिकच भारतीय डॉक्टरांना रुग्णांना तपासण्यासाठी कडाक्याच्या थंडीतून रात्री-अपरात्री चालत जावे लागे.

ही सर्व हॉस्पिटल्स बहुतेक करून बंदुकीच्या गोळीच्या टप्प्यात येणार नाहीत अशा पद्धतीने उभारलेली असत. त्यामुळे जखमी सैनिकांना पोचायला कमीत कमी दोन किंवा कधी कधी अधिक दिवस लागत. त्यामुळे जखमा चिघळून, अधिक रक्तस्राव होऊन सैनिक दगावत. त्यावर उपाय म्हणून डॉ. कोटणीस व बसू यांनी युद्धावर निघालेल्या सैन्याच्या कार्यक्षेत्रात दोन-दोन मैलापर्यंत काम करू शकणारे फिरते वैद्यकीय पथक उभारायचे ठरविले. जनरल च्यूह-तेह यांनी या कल्पनेस मान्यता दिली व जनरल चेंग गेंग यांच्या नेतृत्वाखालील ७११ व्या तुकडीबरोबर ते निघाले. 'वुशियांग' आणि 'हांगसिन' या ठिकाणावर त्यांनी प्रत्यक्ष काम करून ही कल्पना मूर्त स्वरूपात आणली.



डॉ. कोटणीस भाषण करीत असताना. जपानी हल्ल्याचा लोकांनी यशस्वीपणे कसा प्रतिकार करावा याबद्दलचे १२ मुद्दे त्यांच्यासमोर ठेवलेल्या पत्रकावर लिहिलेले आहेत.

चिनी सैनिक जन्मल्यापासून चिनी वातावरणात वाढले होते. युद्धातील दगदगीचे जे काही परिणाम होत ते अगदी किरकोळ असत; पण भारतीय डॉक्टरांची परिस्थिती तशी नव्हती. एक तर भिन्न हवामान, दुसरा भाग आयुष्यभरात कधी न केलेली धावपळ, व प्रत्यक्ष कामाचा ताण. त्यात सैन्यातील लोकांबरोबर घ्यावे लागणारे निकृष्ट जेवण त्याचा परिणाम थोडाफार सर्वांवरच झालेला होता. डॉ. अटल यांना त्वचारोग झाला होता त्यावर तिथे

इलाज होण्यासारखे नव्हते म्हणजे त्यानी मार्च १९४० मध्ये येनान मार्गे भारताला परतायचे ठरविले. तुकडी प्रमुख असल्याने डॉ. कोटणीस व डॉ. बसू याची जबाबदारी डॉ. अटल याच्यावर होती. म्हणून त्यानी बसू व कोटणीस याना भारताकडे निघण्याबद्दल सुचविले. डॉ. बसू व डॉ. कोटणीस याची तयारी नव्हती. त्यांना युद्धभूमीवर काम करण्याची तीव्र इच्छा होती. जनरल च्युतेह याना जेव्हा हे समजले तेव्हा त्यानी डॉ. अटल याना दोघांनाही चीनमध्ये ठेवून जाण्याबद्दल विनती केली व डॉ. कोटणीस व डॉ. बसू चीनमध्ये सुरक्षित राहतील याबद्दल खात्री दिली अखेर अटल यानी त्यास मान्यता दिली. खुष झालेल्या जनरल च्यूह–तेहनी डॉ. अटल याची येनानला जाण्याची व्यवस्था केली ते पुढे चुंगिगहून भारताला जाणार होते.

## युद्धभूमीवर रात्रंदिवस

डॉ. चोलकर व डॉ. मुखर्जी आधीच भारतात परतले होते. ते दोघे गेले तरी तुकडी प्रमुख अटल होतेच. डॉ. अटल यानी जवळजवळ दोन वर्षे त्याना मार्गदर्शन केले होते. साहजिकच अटल निघताना डॉ. कोटणीस व डॉ. बसू याचे डोळे अश्रूनी भरून आले.

युद्धाच्या धामधूमीत काही क्षण फुरसतीचेही असत त्यावेळी किंवा प्रवासात, गनिमी सैनिक, नेते, युद्धाचे अनुभव सागत. ते डॉक्टर बसू व डॉ. कोटणीस लक्षपूर्वक ऐकत असत. डॉ. कोटणीस ऐकल्यानतर या सर्व गोष्टी तपशिलवार लिहून ठेवीत असत. प्रारंभीच्या पत्रात त्याच्या वडिलानी त्याना त्याबद्दल लिहिले होते. ते डॉ. कोटणीस यानी ततोतत कृतीत आणले होते. या टिपणाची चर्चा होई तेव्हा ते म्हणत, मला जरी 'कागटा'चा अभ्यासक्रम पुरा करता आला नसला, तरी मला वाटतं की मी एका अजब लष्करी विद्यापिठाची पदवी घेतली आहे, आणि त्या व्याख्यानाची माझी ही टिपणे आहेत! अर्थात हा झाला गमतीचा भाग पण भारतीय वैद्यकीय पथकाची जी सविस्तर हकिकत भारतापर्यंत पोचू शकली त्याचे श्रेय डॉ. कोटणीस याच्याकडे जाते.

डॉ. कोटणीस यानी चिनी भाषा चागली आत्मसात केली होती आणि त्याही पेक्षा ते चिनी लोकात आवडीने मिसळत भारतीय डॉक्टरांबद्दलची माहिती चीनभर पसरली होती. डॉ कोटणीस व बसू खेडूतासमोर भाषणे करीत. साहजिकच त्याना बघायला सभोवतालचे शेतकरी गर्दी करीत. असेच एकदा डॉ कोटणीस लोकामध्ये गप्पा मारीत उभे असताना एका वृद्धा त्याच्याकडे आली आणि म्हणाली, 'दोन भारतीय डॉक्टर आज येथे आले आहेत म्हणून समजले. त्यापैकी एक तिकडे उभा आहे पण दुसरा कुठे आहे समजत नाही. तुला माहीत आहे का?'– मिष्कील स्वभावाचे कोटणीस लगेच म्हणाले, 'नाही आजी, मी पण त्यानाच शोधतो आहे; पण ते काही सापडत नाहीत.' डॉक्टरांच्या शब्दावर सगळेजण जोरात हसले तेव्हा वृद्धेचे लक्षात आले की, अस्खलीत चिनी बोलणारा हाच तो डॉक्टर आहे.

खेडेगावी पोचले की डॉक्टर कोटणिसाचा व डॉ. बसूचा आणखीन एक उद्योग असायचा. तो म्हणजे सध्याकाळच्या वेळी गावाबाहेर भटकायला जाणे. युद्ध परिस्थितीमुळे असे भटकणे धोक्याचे असायचे. कारण हेरांचा सुळसुळाट असायचा एकप्रसगी त्याच्या या भटकण्याच्या सवयीने त्याना चागलेच गोत्यात आणले. ते बाहेर पडतात न पडतात तो पचवीस तीस सशस्त्र लोकानी त्याना गराडा घालून गावच्या चौकीवर नेले. शेवटी दोघानाही आपली ओळख पटवून मोठ्या मुष्कीलीने आपली सुटका करून घ्यावी लागली.

डॉ. कोटणीस व डॉ. बसू १९४० च्या मध्याला चिन,–चा–ची सीमा विभागात पोचले तोपर्यंत कम्युनिस्टांनी आपले वर्चस्व शान्सी टेकड्या, होपेच्या मैदानापलिकडे पॅसिफिकच्या किनाऱ्यापर्यंत पूर्वेला आणि शाटूग प्रांतात दक्षिणेला पसरवले होते. आता कम्युनिस्टानी आक्रमणाचा अवलब करण्याचे धोरण आखले होते. आठव्या फौजेने शभर तुकड्याना बरोबर घेऊन आक्रमण मोहीम आखली होती. रेल्वेमार्ग, प्रमुख रस्ते वगैरे ठिकाणी पहारा करणाऱ्या जपान्याच्या तळांवर एकदम हल्ले चढवायचे, लष्करी शस्त्रागारे, अन्नधान्य कोठारे लुटायची योजना आखून पार पाडली.

डॉ बसू व कोटणीस यानी प्रत्यक्ष युद्धभूमीवर औषधोपचार करण्याच्या हेतूने युद्ध आघाडीवरच काम करण्याचा निर्णय घेतला. डॉ. बसू त्या भागातील एका दलाबरोबर उत्तरेकडील युद्धभूमीवर गेले तर डॉ कोटणीस दक्षिणेकडील युद्धभूमीवर गेले. हे दोघे प्रथमच विभक्तपणे काम करणार होते. भारतीय पथकाने चीनमध्ये काम करताना काही मार्गदर्शक तत्त्वे अगिकारली होती. ती म्हणजे १) कोणत्याही परिस्थितीत जखमींवर अगदी वेळेवर उपचार करायचे. २) गोळीबाराच्या टप्प्यात एकही जखमी विनासेवा राहू द्यायचा नाही. ३) टंचाईचा औषधी साठा जास्तीत जास्त उपयोगी पडेल अशा पद्धतीने वापरायचा. डॉ. बसू व डॉ. कोटणीस यानी या मार्गदर्शक तत्त्वाचे पुरेपूर आचरण केले.

डॉ बसू चहार प्रातातील लाईयुआन आघाडीवर गेले होते. तिथे जपान्याच्या लष्करी ठाण्यावर पधराशे गनिमानी हल्ला चढविला. डॉ. बसूनी आपले उपचार केंद्र एक मैल पिछाडीला ठेवले होते. एकीकडे युद्ध चालू होते तर दुसरीकडे जखमीवर डॉ बसू उपचार करीत होते. रात्रभर त्याचे काम चालू होते. सकाळी चकमक सपली व गनिमानी जपान्याना वेढा घातला. कोंडीत सापडलेल्या जपान्यानी प्रथम सर्व खेडे जाळून नष्ट केले. नतर खेड्यातील सर्व चिनी पुरुषांना ठार मारले व त्याच्या बायकावर सामूहिक बलात्कार केले आणि नतर सर्वांनी आगीत उड्या टाकून 'हाराकिरी' केली. डॉ. बसूना पाहायला मिळालेले हे दृश्य भयानक होते.

## नूतन कामगिरीवर हजर

डॉ. कोटणीस याची तुकडी लिंच्युईला गेली होती. या आघाडीवर सतत तेरा दिवस तुंबळ युद्ध झाले. एकदर ८०० सैनिक जखमी झाले होते. त्यापैकी ५५८ जणावर तातडीच्या शस्त्रक्रिया कराव्या लागल्या. हे काम रात्रंदिवस चाललेले असायचे. एका प्रसगी डॉ. कोटणीस यांनी सतत ७२ तास काम करण्याचा विक्रम केला. आज प्रत्येक चिन्यांच्या हृदयात डॉ. कोटणीस आहेत ते काही उगीच नव्हते.

लाल सेनेच्या आठव्या फौजेच्या वरिष्ठाधिकाऱ्यानी डॉ. बसू व डॉ. कोटणीस यानी येनानला परतावे असे सागण्याचे ठरविले; पण आठव्या फौजेचे सेनापती जनरल निअेजुग चेन याची त्याना संमती नव्हती. कारण शंभर फौजांच्या मोहिमेत प्रत्यक्ष युद्धभूमीवर डॉ.

कोटणिसांनी केलेली कामगिरी त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितली होती, म्हणून ते त्याना सोडायला तयार नव्हते. डॉ. नॉर्मन यांनी स्थापन केलेल्या आदर्श हॉस्पिटलला त्यांच्या मृत्यूनंतर चांगला डॉक्टर लाभलेला नव्हता. 'आदर्श हॉस्पिटल'मध्ये उत्कृष्ट शल्यतज्ज्ञ व प्रशासक म्हणून काम करण्यास डॉ. कोटणीस पूर्णपणे योग्य आहेत असे जनरल निअे यांचे म्हणणे होते. तर लढाईत नष्ट झालेल्या आदर्श हॉस्पिटलच्या जागी नवे हॉस्पिटल उभे करावे. त्याला 'आंतरराष्ट्रीय शांतता हॉस्पिटल' असे नाव द्यावे व ते बेथ्यून वैद्यकीय शाळेला जोडून हॉस्पिटलचे पहिले संचालक म्हणून डॉ. कोटणिसांची नियुक्ती करावी असा विचार चिन–चा–ची सीमा विभागाच्या मुख्य लष्करी केंद्राच्या बैठकीत झाला. तर जनरल निअे जुंग यांनी त्याही-पुढे जाऊन डॉ.कोटणीस यांच्यावर या जबाबदाऱ्यांवरोबरच संपूर्ण सीमा भागातील विभागीय व उपविभागीय हॉस्पिटल्स व रुग्णालये उभारण्याची जबाबदारी सोपवावी असा ठराव मांडला व स्वत: जनरलनी डॉ. कोटणिसांच्या मनाची त्याप्रमाणे तयारी केली व डॉ. बसूंनो युद्ध-पातळीवर काम करण्याच्या दृष्टीने येनानच्या मुख्य छावणीवर जावे असे सांगितले.

पाच डॉक्टरांच्या पथकात आता केवळ दोघेच उरले होते आणि आता त्यांच्यातही फाटाफूट होत होती. ही फाटाफूट दोघांनाही त्रासदायक वाटत होती पण नाईलाज होता. निघण्यापूर्वी बसूंनी डॉ. कोटणिसांना वचन दिलं, 'तुम्ही येनानला परतण्याची मी वाट पाहीन आणि तुम्हाला घेतल्याशिवाय मी भारतास परत जाणार नाही' अखेर डॉ. कोटणिसांचा निरोप घेऊन डॉ. बसू यांनी १९४० च्या नोव्हेंबरात येनानकडे कूच केली. ६०० मैलाचा कठीण प्रवास करून ते कसेबसे येनानला पोचले व तिथे त्यांनी सैन्याच्या मुख्य विभागाच्या संलग्न हॉस्पिटलच्या बाह्यरुग्ण विभागाचा मुख्य शल्य–चिकित्सक म्हणून चार्ज घेतला व डॉ. कोटणिसांनी आपले काम सुरू केले.

डॉ. कोटणीस व डॉ. बसू आपापल्या नूतन कामगिरीवर हजर झाले तेव्हा जपान्यांची सर्वनाश मोहीम गतिमान होती. चिन–चा–ची सीमा भागातील डॉ. बेथ्यून वैद्यकीय शाळेतून लिहिलेल्या एका पत्रात या मोहिमेची सविस्तर माहिती देताना डॉ. कोटणीस लिहितात.

'डॉ. बसू इकडून गेल्यानंतर महिन्यानं शत्रूची अपेक्षित 'सर्वनाश मोहीम' सुरू झाली. या खेपेस शत्रूनी अगदी गंभीरपणे ही मोहीम पार पाडायचं ठरवलं होतं. उत्तर चीनमधील सर्वात श्रेष्ठ अशा लष्करी अधिकाऱ्यानं स्वत: जवळजवळ वीस हजाराच्या वर असलेल्या सैन्य दलाला मार्गदर्शन केले. एक महिनाभर आम्ही शत्रूला चुकवत फिरत होतो. कधी कधी तर त्याला ऐकू येईल एवढ्या जवळून जायचे. वैद्यकीय शाळेचे अधिकारी स्वत: या हालचालींचं मार्गदर्शन करताना बघून मजा वाटत होती. आणि त्यातून शिकण्यासारखंही बरंच होतं. विद्यार्थी टेहळणीचं व पहारा देण्याचं काम करत. आमचे विद्यार्थी आम्ही यात गमावले.

इकडं आम्ही शत्रूच्या पिछाडीला आहोत. याचाच अर्थ आम्ही शत्रूची सरहद्द ओलांडून त्याच्या पाठीशी आलो आहोत, जणू काही त्याची शेपटी ओढण्यासाठी. म्हणजे तो पुढे सरकू शकणार नाही.



आठव्या फौजेतील दोन अधिकाऱ्यांना नुकत्याच आलेल्या क्ष–किरण यंत्राबद्दल माहिती सांगताना डॉ. कोटणीस

म्हणून आता हे युद्ध झाले आहे. शत्रूचं दळणवळण तोडून टाकणं. त्यांची संख्या कमी असेल तेव्हा त्यांच्यावर अचानक हल्ले चढवणं वगैरे वगैरे जरा नुसती कल्पना करा. आम्ही सभोवार शत्रूने वेढले गेलो आहोत आणि काही ठिकाणी तर तो आमच्यापासून १० मैलाच्या अंतरावरही नसेल तरी इकडे आम्ही वैद्यकीय शाळा, हॉस्पिटलं-बंदुकीच्या दारूचे कारखाने, लष्करी शाळा वगैरे चालवू शकतो. अशा प्रकारच्या 'बंदिस्त जागेला' सीमा विभाग म्हणतात. केवळ उत्तर चीनमध्येच असे आठ सीमा विभाग आहेत. त्यांतील प्रत्येक विभाग आपल्या भारतातील एखाद्या जिल्ह्या एवढा आहे.

'पण शत्रूचं काय? तो आमच्याबद्दल संपूर्ण बेपर्वा आहे का? नाही. तो तसा असणं शक्यच नाही. पण आमच्या सर्वांशी एकदमच लढण्याएवढी ताकद त्याच्याजवळ आहे. तेव्हा तो इतर ठिकाणाहून सैन्य गोळा करतो आणि एखाद्या सीमा भागावर 'सर्वनाश मोहीम' सुरू करतो जेव्हा अशा तऱ्हेचा हल्ला येतो, तेव्हा आम्हाला लपून राहाव लागतं. आम्ही आमचे बिछाने पाठीवर टाकतो आणि शत्रूशी असा काही लपंडावच खेळतो. त्यावेळी शत्रू आमच्यापासून फार तर एक दोन मैलावरच असतो. गावकऱ्यांची घरं पेटवत, काहीही जाळण्यासारखं असेल ते जाळत, काय दिसेल त्याचा नाश करत, गावकरी व सैनिक दोघंही आपली चीज वस्तु जमिनीखाली पुरून

ठेवतात. असा हल्ला जवळ जवळ एक ते दोन महिने चालतो व त्यात शत्रूच्या बाजूच नुकसान आमच्याहून किती तरी जास्त होत. विषेशत: दुसऱ्या सीमा विभागात, जिथून त्यानी आपले सैन्य काढून घेतलेले असते; त्याच ठिकाणी आम्ही जोरदार हल्ला करून त्याला परतायला भाग पाडतो साधारणत: अशा तऱ्हेचे सर्वनाशाचे हल्ले वर्षातून दोनदा होतात. आम्ही त्याला नेहमी तयारच असतो. उदाहरणार्थ सहा तासाच्या आत हॉस्पिटलमधील सर्व वस्तू आम्ही लपवून ठेवतो.

### अत्याचाराची सवय

सर्वनाश मोहिमेचा देखील चिन्यांवर फारसा उपयोग होत नाही असे दिसून आल्यावर जपान्यानी 'सँको सेईसाकू' या तंत्राचा वापर केला. 'सँको सेईसाकू' म्हणजे एकाच वेळी सर्व ठिकाणी सर्वनाश मोहीम. थोडक्यात लोकाना जगणे अशक्य करणे, दिसेल त्याला ठार मारणे, दिसेल ते जाळणे. हा सहार किती भयानक होता तर दोन महिन्याच्या कालावधीत एका जिल्ह्याएवढ्या आकाराच्या भागात साडेचार हजार चिनी नागरिकाना ठार मारण्यात आले पध्रा हजार घरे जाळली गेली. आणि सतरा हजार जणांना माचुरियातून बाहेर घालविले गेले. एक अमेरिकन गृहस्थ येनानमध्ये स्थाईक झाला होता त्याचे नाव डॉ. मा हाय. त्याने एका पत्रात जपान्याच्या अत्याचाराचा उल्लेख केलेला आहे तो म्हणतो... 'जपान्यांनी केलेल्या अत्याचाराच्या वृताताचा थोडासा भागही कोणाही सभ्य नागरिकाला रागाने उसळायला पुरेसा होईल. या रक्तलाछीत मोहिमेला विमानाचेही पाठबळ मिळे. निर्दयपणे सर्वांवर बाँबफेक करण्यात येई. त्यातून डोंगर कपारीतील छोटी खेडीसुद्धा सुटत नसत. त्यामुळे लांबवरच्या भागापर्यंत एक घर उभे दिसत नसे. सर्व भाग बेचिराख व उजाड दिसे. पद्धतशीरपणे प्रत्येक गाव साफ करण्याचा त्यानी प्रयत्न केला. घोडे व गायी याची शिकार केली. तयार झालेले उभे पीक फेकून देऊन किंवा घोडदलाचे घोडे मोकळे सोडून नष्ट केले. खेडूतांना एकत्र करून डोंगरावर नेऊन पाठीमागून मशीनगन्सनी गोळ्या झाडून मारलं जाई. लहान लहान मुलाना चिखलात चिरडले जाई. स्त्रियांचे कपडे ओढून काढून त्याची कातडी बाहेर काढली.'

हे वर्णन झाले अमेरिकन माणसाचे पण खुद्द जपान्यानी आपल्या भाईबांधवानी कसे अत्याचार चिन्यावर केले त्याचे वर्णन एका ठिकाणी एका सैनिकाने लिहिले आहे. तो लिहितो......'एक दिवस आमचा सेकंड लेफ्टनट ओतो आम्हाला म्हणाला–तुम्ही आतापर्यंत कोणालाच ठार मारले नाही तरी ठीक आहे आज आपण ठार मारण्याची सवय करू या. पहिली गोष्ट म्हणजे चिनी लोक ही माणसे आहेत असे मनातही आणू नका. कुत्र्या–मांजरापेक्षाही ते कमी दर्जाचे प्राणी आहेत. ठीक आहे. आता ही ठार मारण्याची सवय करण्याकरिता कोण पुढे येतो–चला पटापट आमच्यापैकी कुणीच हलले नाही तेव्हा तो ओरडला.

डुकरांनो ! भित्रे नामर्द कुठले. तुमच्यापैकी एकही स्वत:ला जपानी शिपाई म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाही ठीक आहे. मी सागतो. आणि त्याने एकेका सैनिकाचे नाव पुकारण्यात सुरुवात केली ओतानी–फुसकावा–इचेनो – तजीमा ( बाप रे ! माझेही नाव ) थरथरत्या हातानी मी माझी बायोनेटची बदूक वर उचलली. तो लेफ्टनट वेड्यासारखा माझ्या नावाने शिव्या देत पुढे होण्यास सागत होता. समोरच एका खड्ड्यासमोर एक गरीब चिनी उभा होता. तो खड्डा त्यानेच खणला होता, भीतीने कापणाऱ्या त्या चिन्याच्या दिशेने मी हळूहळू निघालो. मनातल्या मनात त्याची क्षमा मागितली. डोळे मिटले आणि लेफ्टनटच्या शिव्या कानात घुमत असतानाच बायोनेट त्या गरीब चिन्याच्या अगात खुपसली. मी डोळे उघडले, तेव्हा तो खड्ड्यात कोसळला होता. 'खनी–गुन्हेगार' मी मोठ्याने ओरडलो.'

जपान्यानी केलेल्या अत्याचाराचा उपसर्ग डॉ. कोटणीस किंवा शातता हॉस्पिटल कर्मचारी याच्यापैकी कोणाला पोचला नाही हे सुदैवच म्हटले पाहिजे. पण दुर्दैवाने डॉ. युसेन व्हा व त्याचे ३१ कर्मचारी मात्र एका बाँब हल्ल्यात बळी पडले

( शेवटचा भाग पुढील अंकात )


# शिखांचा इतिहास व सावरकर

'मूळ शीख वाङ्मय वाचण्याकरिता सावरकरांना गुरूमुखी लिपी शिकणे आवश्यकच होते. कारण आदि ग्रंथाचा (श्री गुरू ग्रंथसाहेबाचा) संपूर्ण इंग्रजी अनुवाद भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानतर प्रथम प्रसिद्ध झाला. हरनामसिंगासारख्या लंडनमधील आपल्या पंजाबी क्रांतिकारक सहकाऱ्याकडून सावरकर गुरूमुखी शिकले. आदि ग्रंथात मोठ्या आकाराची १४३० पृष्ठे आहेत व दशमग्रंथ जवळजवळ तितकाच मोठा आहे, हे लक्षात घेतल्यावर तरुण सावरकरांनी ग्रंथलेखनासाठी घेतलेल्या परिश्रमांची कल्पना येते...'

**–डॉ. अरविंद गोडबोले**

शिखांच्या इतिहासाचे एक आधुनिक अभ्यासक

## माणूस दिवाळी अंकात

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

लीला पाटील

## ऐलमा पैलमाचा ताळेबंद

काही वर्षांपूर्वी आमच्या घरी एक छोटा मुलगा दोन महिने आपल्या आईबरोबर पाहुणा म्हणून आला होता– त्याला जेव्हा कळलं की, मी शिकवायच काम करते, तेव्हा तो माझ्या मागं लागला 'मला शिकव' 'मला शिकव !' मी एक पुस्तक निवडलं आणि त्याला अधूनमधून शिकवू लागले. थोडयाच दिवसात छोटयाला त्या पुस्तकाचा कटाळा आला. चार वर्षाच ते मूल म्हणाल, 'आपणच लिहू या पुस्तक ' मी स्तभितच झाले. पुस्तक लिहायची कल्पना मलासुद्धा सुचली नव्हती, ती या मुलाला कशी सुचली? ज्याला चुकत-माकत अक्षर लिहायला येतात तो पुस्तक कस लिहिणार? पण मी छोटयाच्या बेताला मान्यता दिली आणि एका जुन्या पाठकोऱ्या कॅलेंडरची वही घालून दिली. छोटया दररोज पुस्तक लिहिण्यात गर्क राहिला. अनेक चित्र त्यान काढली 'छोटया आणि त्याची मनी', 'छोटया आइस्क्रीम खातो आहे, मनी त्याच्याकड आइस्क्रीम मागत आहे.' 'छोटया खिडकीतून मित्राला बोलावतो आहे ' जे त्याला लिहिता येत नसे असे कितीतरी तो मला सागत असे आइस्क्रीम मागताना मनी कशी बोलते आहे, तो मनीला काय सागतो आहे– अशा गमती-जमती आविर्भावासह छोटू सागे .. छोटू चित्र काढण्यात आणि चित्राबद्दल बोलण्यात म्हणजेच त्याच्या भाषेत पुस्तक लिहिण्यात गर्क होता. छोटूच्या या पुस्तक लेखनानं बरंच काही शिकवल. मुलाना कितीतरी सागायच असतं, ते सागण्याची सधी मिळाली की, मुलं खूप वेळ कामात मग्न रहातात. अशा कामाचा त्याना कटाळा येत नाही. मुलाच निरीक्षण फार सूक्ष्म असत आपल्याला अमुक चित्र काढता येणार नाही, हे लिहिता येणार नाही अस त्याना वाटत नाही हे सारं छोटूच्या सहवासातून मी शिकले.

आणखीही एका अनुभवानं मला बरच काही शिकवल. 'सृजन आनद शिक्षण वर्गाच्या नियोजनासबंधी शिक्षकाशी बोलताना अस लक्षात आलं की, त्याना मुलं खूप काही करू शकतात, याविषयीचा विश्वास नाही. मुल स्वत:ची स्वत: कविता रचू शकतात, नाटक सादर करू शकतात, कामाचे अहवाल तयार करू शकतात व ते माडतात आपल्यालाही सुचणार नाहीत असे प्रश्न मुल विचारतात– अशा प्रकारचे अनुभव शिक्षकाना नाहीत कोणीतरी शिक्षणाला 'unfolding of personality' अस म्हटलं आहे; परतु त्या शिक्षकाकड पाहिल्यावर मला असं वाटलं की, त्यांना folding of personality चाच अनुभव आहे मुलाच्या व्यक्तित्वाना आणि व्यक्तिमत्वाना घडीबंद ठेवणं म्हणजेच शिकवणं अस जणू शिक्षक मानत आहेत. ह्या अनुभवाबद्दल विचार करता करता आणखीही एक मजेची गोष्ट लक्षात आली. मुलाच्या personalities unfold व्हावयाच्या असतील तर स्वत: शिक्षकानीही आपल्या personalities वरचेवर unfold करण्याचा अनुभव घ्यायला हवा. मनाची अशी घडी घालून बघा, तशी घडी घालून बघा, ही घडी उसकटा, ही नवी घडी बसवा सृजन आनद शिक्षण वर्गात काम करणाऱ्या शिक्षकानाही कविता आणि नाटक तयार करायला सांगितल, त्यावेळी 'स्वत:ला हे जमेल का ?' अशी भीती त्यानी व्यक्त केली होती. का बरं ? स्वत च्या व्यक्तिमत्त्वाला असा हा एक नवाच धुमारा फुटू शकेल, याबद्दल शिक्षक साशक होते. 'करून तर पाहू ?' अस म्हटल तरी अनेक शिक्षकानी आपले स्वाध्याय केल नाहीत. 'जमलं नाही तर लीलाताई काय म्हणतील ?' 'इतर सहकाऱ्यापुढं आपली फजिती तर होणार नाही ' एक ना दोन. नाना शकांनी त्याची मन माक्रसलेली राहिली आणि त्यामुळच ते शिक्षक नव्या कृतीना बिचकून बाजूला राहिले.

नव्या शिक्षणाचा पाया घालण्याची इच्छा व शक्ती असणाऱ्या कोणाही व्यक्तीला नवं शिकण्याची मुलाची उत्सुकता आणि शिक्षकाची नव्याला बिचकण्याची वृत्ती या दोन्ही बाबीचा विचार करावा लागतो. या संदर्भात शिक्षकाच्यात जे बदल व्हायला हवेत, त्यासाठी उद्बोधन वर्ग, चर्चासत्र, परिसवाद या नेहमीच्या उपायापेक्षा काही नवेच उपाय शोधावे लागतील. असे काही उपाय कोणते असतील? सांगू–

### नवे उपाय

१) विषय आणि अभ्यासक्रम यांना काही दिवस फाटा द्या.

परिणाम काय होईल ? क्रमिक पुस्तक आणि अभ्यासक्रम सदोष आहेत आणि त्यामुळं नापासाची सख्या वाढते ही शिक्षकाची पेटट तक्रार त्याना करता येणार नाही. विद्यार्थ्याला शिकवावच लागणार असल्यामुळं क्रमिक पुस्तकाच्या कुबडीशिवाय कसं शिकवावं याचा शिक्षक विचार करतील.

२) प्रत्येक तासिकेत शिक्षकानं कमीत–कमी पधरा प्रश्न विचारलेच पाहिजेत, एखादी तरी कृती स्वत: केली पाहिजे व विद्यार्थ्यांनाही करण्याची सधी दिली पाहिजे असा आग्रह धरा.

शिक्षणातील कृतिशून्यता आणि शब्दजजाळ कमी होण्यास याची फार चागली मदत होऊ शकेल

३) सर्व चाचण्या आणि श्रेणी अथवा गुण याना फाटा द्या.

चाचणी आणि श्रेणी किंवा गुण ही शिक्षकाची जणू कवचकुंडल आहेत. स्वत:चा रूबाब, प्रतिष्ठा टिकविण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना परीक्षाची व गुणाची भीती घालतात, त्याचं भवितव्य काढून घेतली तर स्वत चा रूबाब आणि प्रतिष्ठा राखण्यासाठी अध्यापन कुशलता, अध्यापनाव्यतिरिक्त इतर एखाद्या बाबतीतील प्रावीण्य–यासारखं काहीतरी शिक्षकाना सपादाव लागेल.

(४) शिक्षकाच्या क्षमतेनुसार त्याच्या याद्या तयार करा व त्या सर्वांना माहीत होण्यासाठी प्रसृत करा. त्यांचा बुध्यंक व वाचननिर्देशाक (वाचनाची गती + आकलनाची टक्केवारी = वाचननिर्देशांक) यांची नोद यादीत असावी.

अनुभवी शिक्षक आणि अननुभवी शिक्षक याच्यातील फरक बरेचदा केवळ वर्षांच्या भाषेतल्या असतो कच्ची कैरी पिकलेला आंबा याच्यातील फरक केवळ त्याच्या रगात नसतो, त्याच्या गुणधर्मातही असतो. अध्यापनाच्या अनुभवामुळ शिक्षकाच्या गुणधर्मात कौशल्यात, समजदारीत फरक पडायला हवा मात्र असा फरक पडतोच असं आज दिसत नाही. असा फरक पडण्यासाठी वरील उपाय जालीम वाटला तरी शिक्षकाची व्यावसायिक गुणवत्ता वाढण्यास त्याचा कदाचित कपयोग होईल

(५) अध्यापनाशिवाय इतर अन्य कोणत्या तरी क्षेत्रात काम करण्यासाठी शिक्षकाला दोन वर्षांनी तीन महिन्याची रजा द्या.

आज विद्यार्थी असलेला माणूस उद्या शिक्षक होतो. डेस्कावर बसायच आणि टेबलाजवळच्या खुर्चीवर बसायचं एवढाच फरक त्या माणसात होतो. आपलं शिक्षकपण प्रभावी करण्यासाठी नानाविध अनुभवाची शिदोरी आपण सतत मिळवत राहिलं पाहिजे. यासंबंधी शिक्षक जागरुक असत नाहीत आणि त्यामुळच त्याचं अध्यापन रूप, रस, रग विहीन होतं बसकडक्टर, हॉटेलच्या गल्ल्यावर बसणारा माणूस, शेतकरी, कामगार, चित्रकार, नर्तक, श्रमसस्कार छावणीतील सैनिक अशा कोणत्याही एखाद्या नव्या भूमिकेत माणूस गेला की अनेक नवे अनुभव, नवे विचार त्याला नव्या कृतीना प्रवृत्त करतात. म्हणूनच स्वत ची शिक्षकाची ठरीव भूमिका सोडून इतर कोणत्याही दुसऱ्या भूमिकेत शिरण आणि ती भूमिका वठवण याचा शिक्षकाना नवे अनुभव मिळण्यासाठी चांगला परिणाम होऊ शकेल.

(६) स्वत च्या नातेसबंधात नसणारी एखादी तरी व्यक्ती शिक्षकाबद्दल 'हे मला आवडतात', 'ह्यांच्याबद्दल मला फार आदर आहे', 'याच्या सहवासाशिवाय मला आयुष्य बेचव वाटतं' अशा प्रकारच्या प्रतिक्रियेचा पुरावा शिक्षकाला सादर करायला सागावा.

वरील प्रकारच्या प्रतिक्रिया आपल्याबद्दल व्यक्त करायच्या म्हटल तर त्यासाठी आपल्याला समजदारीचे, प्रेमभावनेचे, विवेकाचे ताणेबाणे विणावे लागतात 'हा माझा विद्यार्थी आहे व त्याला माझ्याबद्दल आदर असलाच पाहिजे'– अशी गृहितके कित्येक वेळा अस्तित्वातच नसतात असे जे दिसून येते त्यावर हा उपाय कसा वाटतो ?

(७) स्वत.ला 'येतो' अस वाटणाऱ्या विषयाबद्दल शिक्षकाला पुस्तक लिहायला सागावं.

पुस्तक वाचकासाठी असतं व लेखक काय म्हणतो ते वाचकाला समजावून सांगण्याची जबाबदारी लेखकावर असते. त्यामुळच लेखकाची भूमिका पार पाडताना अनेक बाबी आपल्याला नीटशा माहीत असल्या तर त्या स्पष्ट नाहीत आणि स्पष्ट असल्या तरी त्या दुसऱ्याला स्पष्ट व सुगम करून सांगता येत नाहीत. याच प्रत्यतर येत राहत. मग आपण आपल्या कल्पना अधिक स्पष्ट करण्याचा, स्पष्ट कल्पना सुगम करून सागण्यासाठी जीवनातील सोपी सोपी उदाहरणं शोधण्याचा प्रयत्न करतो. त्यातूनच तो विषय आपल्याला अधिक चागला समजतो.

(८) प्रत्येक शिक्षकानं दरवर्षी काहीतरी नवं शिकलच पाहिजे व त्याचा उपयोग करून दाखविलाच पाहिजे असा आग्रह धरा

गाण, खेळ, नाच, जादू, व्यायामप्रकार, रांगोळी, पाककृती, माहिती यापैकी अथवा यासारखी एखादी तरी नवी बाब शिक्षकाला अवगत केलीच पाहिजे असा आग्रह धरला तर शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वावर साचणार शेवाळं आणि त्या शेवाळाखाली असणारी आत्मसतुष्टतेची भावना बरीचशी दूर होऊ शकेल.

(९) प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन पातळीवरच्या शिक्षक। प्राध्यापकाच्या भिन्नस्तरावर बदल्या करा.

## सुसंस्कारांची झापडं

वेगवेगळ्या शैक्षणिक स्तरावर काम करणाऱ्या शिक्षक। प्राध्यापकाना अन्यस्तरावर काम करण्यात कोणत्या अडचणी असतात, त्यासाठी किती बहुविध कौशल्याची गरज असते,आशयावरील पकड कशी पक्की असावी लागते, विद्यार्थ्यांना अध्ययनाकड आकृष्ट करणं कसं कठीण असतं याची कल्पना नसते आणि त्यामुळंच एकाच स्तरावर वर्षानुवर्षं शिकवीत राहिल्यामुळं, नव्या आव्हानाना सामोर जाण्यामुळ कृतीप्रवृत्तीना जी नवी पालवी फुटते त्यापासून ते वंचित राहतात. वरील उपाय करून पाहिल्यास अनेक प्राध्यापक। शिक्षक अधिक चागले शिक्षक होतील.

शिक्षकाचा पेशा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सृजनाचा आणि आनंदाचा अनुभव मिळाल्याशिवाय क्रमिक पुस्तक व परीक्षा याच्या डबक्यात साकळून राहिलेलं आजचं शिक्षण बदलणार नाही. 'ऐलमा पैलमा शिक्षण देवा' या लेखमालेत आपण मुक्त शिक्षणाचा विचार प्रामुख्यानं माडलेला आहे. शिक्षणाच्या आजच्या बदिस्त चौकटीतही 'मुक्तता' जपता येईल असं म्हटल आहे. आजचा नारा Creativity and not conformity हाच असावा असही म्हटल आहे दिवाबत्तीवाले, मानीवृत्तीचे, मान–व्यवस्थापक, बादलीभरू आणि मसलबिल्डर्स –अशा प्रकारचे एकारलेले शिक्षक स्वत: सृजन आनंदाला कसे पारखे असतात आणि इतरानाही सृजन आनंदाला कसे पारखे करतात हे आपण पाहिल आहे परिणामतः शाळेची सवय म्हणजे प्रश्न न विचारण्याची सवय, स्वत.तलं कुतुहल उपटून टाकण्याची सवय हे समीकरण कसं बनतं याचा शोध घेण्याचा आपण प्रयत्न केला आहे विद्यार्थ्यांवर विश्वास ठेवून आपण अधिक चागले शिक्षक बनू शकू असा नवा विश्वास बाळगायला आपण शिकलं पाहिजे यावद्दल आपण बोललो आहोत. विविधागी व्यक्तिमत्वाची मोजमापं विविधागी असायला हवीत असा आग्रह आपण माडला आहे कमालीच्या सुट्ट्या आणि कामाचे कमी दिवस म्हणजे शिक्षक व्यवसाय ही निरगाठ तुटायला हवी, अस पीटरच्या सदर्भात आपण म्हटल आहे. चागलं आणि घाणेरड, योग्य आणि अयोग्य इत्यादी मूल्य विषयक कल्पना कशा साचेबंद आहेत हे घाणेरड्या गाण्याच्या गोष्टीनं आपल्याला शिकविलेल आहे तुम्ही मीही आता एकनाथ, ज्योतिबा झाल्याशिवाय तरणोपाय नाही हे सत्य आपण मानल आहे. मुलाचे सवाद ऐकण्यातूनही किती सुदर शिक्षक, पालक प्रशिक्षण होतं याचे दाखले आपण पाहिले आहेत विविध उपक्रमाची रुजवण करण्याचे दिवस आता आले

आहेत व असे उपक्रम केल्याविना दगड-विटाच्या शिक्षणसस्था उभारता आल्या तरी 'शिक्षण उभं' राहात नाही याची खात्री आपण करून घेतली आहे. इंग्रजीच्या अप्रतिहृत ओढयामुळ आपण सृजनशीलतेला आणि आनदाला कसे पारखे होतो याबद्दल आपण चर्चा केली आहे अभ्यासाचे 'नय्यार गंडेदोरे' मुलाच्या 'अभ्यास करण्याला' उपयोगी पडत नाहीत याबद्दल आपण बोललो आहोत.

आजचं शिक्षण सचेतन, प्रभावी, कालोचित व्हावं, या शिक्षणातून व्यक्तीला सफल जीवनाची सजीवनी मिळावी, स्वतःच्या उत्कर्षाबरोबरच समाजाच्या उत्कर्षाचा विचारही माणसानं करावा, तथाकथित 'सुसस्काराची' झापड टाकून देऊन मूल्याविषयी मूलगामी विचार करावा— असे विविध आग्रह दि ९ मार्च १९८५ पासून आजवर 'ऐलमा पैलमा शिक्षण देवा' या लेखमालेतून वाचकासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. शिक्षकांइतकेच पालकही मुलाच्या शिक्षणाच्या सदर्भात क्रियाशील व जबाबदार घटक आहोत हा विचार या लेखमालेत अतर्भूत आहे गेल्या पन्नास वर्षात झालेल्या ज्ञानाचा प्रस्फोट, स्वातंत्र्यानतर शिक्षणाबद्दलच्या समाजाच्या आकाक्षात झालेली प्रचड वाढ आणि आपल्या देशातला दरदिवसाला वाढणारा लोकसख्येचा प्रस्फोट अशा तीन महत्त्वाच्या कारणामुळं शिक्षणाचे रंग, रूप व आकार बदलणं आवश्यक झालं असल तरी हे बदल निदान आता तरी जलद गतीन होण्यासाठी शिक्षणाच्या ग्राहकानीच— विशेषतः पालकानी व विद्यार्थ्यांनीही आवाज उठविला पाहिजे असा विचार या मालेत माडला. ही माला चालू झाल्यापासून महाराष्ट्र, कर्नाटक व मध्यप्रदेश अशा तीन राज्यातून काही वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया कळवून मला प्रोत्साहित ठेवले. एवढेच नव्हे तर लेखमालेत माडलेले विचार नवे असले तरी योग्य आहेत व त्यांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीनं प्रत्येकानच पावलं टाकली पाहिजेत असाही आग्रह मांडला. काहीनी तर या विचाराच्या अनुषगानं आपण काय केलं किंवा करणार आहोत हेही मला कळवलं. 'माणूस'च्या सपादकानी लेखमालेला योग्य न्याय दिला. सूचक व सुदर चित्रांनी अनेक लेखातील कल्पना अधिक स्पष्ट झाल्या माणूसच्या श्रीमती मेधा राजहंस यानी तर पहिला लेख वाचल्यापासून या लेखमालेवर स्वत च प्रेम जडल्याच मला सागितल. ऐलमा पैलमाच्या वाचकाना आवडेल अशी आणखीही एक गोष्ट या लेखमालेमुळेच झाली असं म्हणावं लागेल. या लेखमालेत व्यक्त झालेले विचार गेली काही वर्ष माझ्या मनात घोळत असले तरी त्या दिशेनं फारशी ठोस पावलं पडली नव्हती. परतु ही लेखमाला लिहिता लिहिता 'सृजन आनंद विद्यालय' उभ करण्याची गरज तीव्रतेनं जाणवू लागली आणि हे विद्यालय १० जून १९८५ पासून कोल्हापुरात सुरूही झालं. होऊ घातलेली आणखीही एक गोष्ट म्हणजे सृजन आनद शिक्षण केंद्राची नोदणी...लवकरच या केंद्राचीही नोदणी होईल. या केंद्राची नोदणी होण्यापूर्वीच कोल्हापुराबाहेरही सृजन आनद शिक्षणाचे वर्ग घेण्याची सुरुवात गतवर्षीच झालेली आहे नोदणी झाल्यानतर कदाचित असे अनेक वर्ग महाराष्ट्रात घेणं शक्य होईल व त्यामुळ शाळाशाळातील नीरस, बोजड, कृत्रिम, नि प्रभ शिक्षण सृजन आनदाच्या दिशेन मार्ग आक्रमू लागेल अशी आशा वाटू लागली आहे. पण आपण लक्षात ठेवायला हवं. 'Nothing is more difficult than a beginning.'

**समाप्त**


# 'स्वतंत्रता संग्राम'

**1857 से 1947 तक की प्रमुख ऐतिहासिक घटनाओंकी**
**लगभग 400 कृष्णधवल तसवीरोंकी–**

# भव्य प्रदर्शनी

**स्थान : काँग्रेस भवन, शिवाजीनगर, पुणे.**

**दिनांक : 2 अक्तूबर से 16 अक्तूबर**
**प्रतिदिन : सायं. ३ से रात ८ तक**
**प्रवेश निःशुल्क**

संयोजक : प्रदर्शनी विभाग,
विज्ञापना और दृष्यप्रचार निदेशालय,
सूचना और प्रसारण मंत्रालय.

Davp 85/275

राजहंस वार्ता

# दोन पुस्तके, दोन परिसंवाद

बुधवार, दि. २ ऑक्टोबर रोजी टिळक स्मारक मंदिरात पी डी.ए. या नाट्यसंस्थेतर्फे एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता राजहंस प्रकाशनतर्फे डॉ. चंद्रशेखर बर्वे यांचे 'तेंडुलकरांची नाटके' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे त्या निमित्त हा कार्यक्रम होता. गेली ३५ वर्षे पी. डी. ए. ही नाट्यसंस्था नाट्यक्षेत्रात काम करीत आहे. तेव्हा प्रायोगिक रंगभूमीचा विचार करण्याच्या दृष्टीने मान्यवर व्यक्तींचे असे परिसंवाद, भाषणे आयोजित करावीत असा उपक्रम या संस्थेने योजला आहे. हा त्यातील पहिलाच कार्यक्रम असे सुरुवातीलाच श्री भालबा केळकर यांनी सांगितले.

प्रथम पुस्तकाचे लेखक डॉ. चंद्रशेखर बर्वे यांनी या पुस्तकाच्या लेखनासंबंधीची आपली भूमिका स्पष्ट केली. ७७ साली पुणे विद्यापीठाकडून मान्यता मिळालेल्या प्रबंधावर आधारीत हे पुस्तक असले तरी दरम्यानचा ८ वर्षांचा कालखंड हा पुनर्लेखनासाठी लागला नाही, तर या कामी अनेक अडथळे आणले गेल्याने हा कालखंड लांबला असा खुलासा डॉ. बर्वे यांनी केला. ते पुढे म्हणाले, 'मूळ प्रबंधात ८ वर्षांपूर्वी जे काही विचार, मते मांडली त्यात आता नव्याने काहीही बदल केले नसून केवळ जागेअभावी संक्षेप केला आहे. मूळ प्रबंधाच्या जवळ जवळ १।३ इतका हा संक्षेप असल्याने, तेंडुलकरांची नाटके समजण्यासाठी सर्व प्रबंध अभ्यासकांना जास्त मार्गदर्शक ठरला असता असे मात्र आपल्याला नक्की वाटल्यावाचून रहात नाही'

आपण तेंडुलकरांसारखा वादळी, वादग्रस्त अनेक प्रकारे अडचणीत आणणारा विषय का निवडला? याचे कारण सांगताना डॉ बर्वे म्हणाले, 'तेंडुलकरांनी आशय, अभिव्यक्ती, आकृतीबंध या अनेक गोष्टीत जुन्या चौकटी मोडून नवता आणली. म्हणून ते श्रेष्ठ नाटककार आहेत का? हे आज जरी सांगता आले नाही– कारण काळाच्या ओघात या मूल्यमापनाची परिमाणे बदलतात– तरी त्यांनी मराठी नाटकाला काय दिले?– खरं म्हणज काही द्यायच या भूमिकेतून त्यांनी लिहिलच नाही– तेव्हा त्यांच्याकडून काय मिळाले? याचा शोध घेण्याच्या भूमिकेतून माझे लिखाण झाले आहे आणि तेंडुलकरांबद्दल जे अनेक ग्रह, गैरसमज आहेत, त्यातील एखादा जरी या पुस्तकामुळे दूर झाला तरी तेंडुलकर कळण्यास थोडीफार मदत झाली असे वाटून माझे श्रम सार्थकी लागले असे मला वाटेल.' आपल्या भाषणात शेवटी डॉ. बर्वे यांनी 'नीरक्षीरविवेक' हा राजहंसच करू शकतो, तेव्हा हे पुस्तक राजहंसतर्फे प्रकाशित झाले हे उचितच झाले असे समाधान व्यक्त केले

'माझ्या पुस्तकापेक्षा तेंडुलकरांवर चर्चा झाली तर ते मला अधिक आवडेल,' असे जरी डॉ बर्वे म्हणाले असले तरी प्रा. वीणा देव मात्र पुस्तकाच्या संदर्भातच बोलल्या. महाराष्ट्राला नाटकाचे वेड असले तरी त्यावर अभ्यासपूर्ण पुस्तके मात्र हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच–ही खंत त्यांनी व्यक्त केली आणि या पार्श्वभूमीवर डॉ बर्वे यांच्या पुस्तकाचे मोल अधिकच वाटते हे पटवून देताना त्या म्हणाल्या, 'प्रायोगिक नाटक येऊन बरीच वर्षे झाली असली तरी त्यातील नवता यावर सूत्रबद्ध विचार फारसा झाला नाहीच आणि हा प्रस्तुत लेखकाने केला अगदी नाट्य म्हणजे काय? याची मूलभूत चर्चा इथून सुरुवात करून नाट्याची स्थिती, गती आणि आंतरक्रिया या घटकात विभागणी करून लेखकाने नवनाट्याची चर्चा केलेली दिसते नाटक रंगभूमीवर सादर झाले तरच त्या नाटकाची परिपूर्ती होते– प्रयोगाशिवाय नाटक असूच शकणार नाही, असे मानण्याचे कारण नाही. नाटकाच्या संहितेचे महत्त्व जास्त आहे. कारण नाटक संहितेइतके प्रयोगातून पोहचत नाही तेंडुलकरांनी आशय आणि आकृतीबंध या दोन्हीत नवता आणली. पारंपारिक नाटकांच्या चौकटीत जरी तेंडुलकर बसले नाहीत तरी त्यांच्या कोणत्याच नाटकात पारंपारिकता आढळत नाही, असेही म्हणता येणार नाही, तर एक प्रकारचा मिश्र नाट्यानुभव त्यांच्या नाटकातून मिळतो. त्यांच्या लेखणीत बेदरकारपणा, रोखठोकपणा, वास्तवदर्शन आढळते त्यामुळे तेंडुलकर तात्त्विक चर्चा करीत नसले तरी तत्त्वचिंतनशीलता मात्र त्यांच्या प्रत्येक नाटकात स्पष्टपणे दिसते.'

'तेंडुलकरांची नाटके'चे महत्त्व, मूल्य मान्य करताना त्यात जाणवलेल्या काही त्रुटींचाही वीणा देव यांनी उल्लेख केला. 'नाट्य आणि नवता याच भूमिकेतून विचार ही या पुस्तकाची मर्यादा आहे नाट्यतंत्राची चर्चा– जी मूळ प्रबंधात आहे– ती पुस्तकात पण असती तर बरे झाले असते. तसेच नाट्यसंहितेचा विचार करताना तेंडुलकरांच्या भाषाशैलीचा विचार होणेही आवश्यक होते.'

तेंडुलकरांप्रमाणेच इतर नाटककारांचाही अभ्यास होणे ही गरज आहे, असे त्या शेवटी म्हणाल्या.

तेंडुलकरांच्या पहिल्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगापासून आजपर्यंत (गृहस्थ – १९५५– हेच पुढे पुनर्लेखन होऊन कावळ्यांची शाळा नावाने रंगभूमीवर आले.) ३० वर्षांच्या दीर्घ वाटचालीत सहभागी झालेले कमलाकर सारंग, अनेक महत्त्वाच्या वादग्रस्त वळणावर तेंडुलकरांबरोबर असलेले. म्हणूनच ते काय बोलतात हे ऐकण्याची श्रोत्यांमध्ये उत्सुकता तेंडुलकरांची नाटके समजण्यासाठी तेंडुलकर माणूस समजणे महत्त्वाचे आहे असे त्यांना वाटते. कारण तेंडुलकरांनी सोसलेल्या वेदनांची छाया त्यांच्या नाटकात पडलेली दिसते सुरुवातीच्या काळात ती गडद होती; पण पुढे त्यांच्या नाटकात इतरांच्या दुःख, वेदनांचे चित्र उमटलेले दिसते. अर्थात ही माणसेही 'उपेक्षित'च आहेत उदा. सखाराम, बेबी. यानंतर मात्र तेंडुलकर सामाजिक नाटकाकडे वळलेले दिसतात कमला, कन्यादान या नाटकांचा या दृष्टीने उल्लेख करता येईल. असा तेंडुलकरांच्या नाट्यक्षेत्रातील ३० वर्षांच्या कारकीर्दीचा धावता आढावा घेऊन सारंग पुढे म्हणाले, 'नेमक्या शब्दात नेमका आशय मांड-

णारा प्रथितयश लेखक, असे तेंडुलकरांचे नेमके वर्णन करता येईल. याचे कारण तेंडुलकर स्वत: अगदी कमी बोलतात–स्वत:-बद्दल आणि स्वत:च्या कलाकृतीबद्दलसुद्धा; पण इतरांकडून भरभरून घेतात, स्वत:त रुजवतात आणि नाटकाच्या माध्यमातून आपल्यापुढे मांडतात. सखाराम बाईंडरची माहिती ऐकल्यावर ते स्वत: आवर्जून त्याला भेटायला गेले आणि पुढे काही कालाने आपल्यासमोर–रंगभूमीवर सखाराम बाईंडर उभा राहिला. हे त्यांचे वैशिष्टय जाणवण्यासाठी प्रस्तुत पुस्तकात–अल्पस्वरूपात का होईना– त्यांचे चरित्र आलं असतं तर बरं झालं असतं. व्यावसायिक रंगभूमीवर तेंडुलकर फारसे यशस्वी नसले तरी १९५५ मध्ये त्यांनी लिहिलेल्या एकांकिकांच्या छायेखाली आज रंगभूमीवर येणाऱ्या एकांकिका आहेत हे त्यांचे ऋण आपण मान्य करायचं हवं. त्याचबरोबर चाकोरीबद्ध आकृतीबंधाच्या मर्यादा ओलांडून आपल्याला भावला असा नवा आकृतिबंध त्यांनी घाशीराममधून आपल्यापुढे आणला. मराठी मनाला न पेलणारे विषय त्यांनी हाताळले. यशापयशाची पर्वा न करता आशय, आकृतिबंध यात नवता आणण्याचे हे प्रयोग सतत करत राहण्यासाठी आवश्यक ते धारिष्टय त्यांच्यात आहे. त्याचप्रमाणे एका प्रकारात गुंतून न पडता, formula बनू न देता पुढची वाटचाल करण्याचा अलिप्तपणाही त्यांच्यात आहे, हे आपण मान्य करायलाच पाहिजे.

सारंग तेंडुलकर या माणसाची उकल दाखवणारी काही व्यक्तिगत स्वरूपाची उदाहरणे, प्रसंग सांगतील अशी काही श्रोत्यांची अपेक्षा होती, त्यांची मात्र थोडी निराशा झाली.

'गृहस्थ' या नाटकात मिळालेल्या अपयशाने निराश होऊन पुन्हा नाटक न लिहिण्याची प्रतिज्ञा करणारे तेंडुलकर त्याच वर्षात 'श्रीमंत' सारखे यशस्वी ठरणारे नाटक लिहितात आणि पुढे ३० वर्षे सातत्याने लिहितच राहतात हे त्यावेळी कोणाला काय खुद्द तेंडुलकरांनाही खरं वाटल नसतं. तेंडुलकर जाणीवपूर्वक ठरवून–नाटक लिहायचं, नवता आणायची असं करताना दिसत नाही. त्यांना वाटलं की ते लिहितात. त्यांना योग्य वाटेल तो form ते हाताळतात. आपण



भाषण करताना लेखक बर्वे
बसलेले डावीकडून– सारंग, भालबा, व. दि. आणि वि. भा.

¤

नंतर त्याच्याबद्दल विचार करत बसतो. योग्य–अयोग्य, यशस्वी–अयशस्वी, पुरोगामी –प्रतिगामी चिकित्सा करतो– तेंडुलकर मात्र या सर्वापासून अलिप्तच राहतात. हेच त्यांचे वेगळेपण आहे एकाच वेळी ते परंपरावादी आणि नवतावादी आहेत या दोन्हीचे बेमालूम मिश्रण त्यांच्या काही नाटयकृतीत पाहायला मिळते' अशी सुरुवात करून सुप्रसिद्ध समीक्षक वि. भा. देशपांडे पुढे म्हणाले–'नाटयविषयक चर्चेसाठी मी अनेक ठिकाणी, प्रांतात जातो. कुठेही चर्चेला सुरुवात झाली की तेंडुलकरांचा विषय अपरिहार्यपणे निघतो. इतर प्रांतात त्यांच्याबद्दल विलक्षण आकर्षण व उत्सुकता असल्याचे मी अनुभवले आहे. १९६८ मध्ये त्यांना कमलादेवी चटोपाध्याय पुरस्कार मिळाला त्यांच्या 'शांतता'...चे १४ भाषांमध्ये भाषांतर झाले आणि तेंडुलकरांची प्रतिमा भारतीय नाटककार अशी झाली. तर 'घाशीराम'च्या प्रयोगांनी त्यांची प्रतिमा जागतिक पातळीवर नेली.

–असं असलं तरी तेंडुलकर प्रथमपासूनच वादग्रस्त ठरले. त्यांच्या नाटकांचे विषय, आशय, आकृतिबंध या सगळ्यांवर वादळी चर्चा होऊनसुद्धा ते आपल्या मार्गाने जातच राहिले. या सगळ्या आक्षेपांना उत्तरं देण्याच्या फारसा प्रयत्न जरी झाला नाही तरी जेव्हा त्यांनी उत्तरं दिली तेव्हा गुंतागुंत जास्तच वाढली. 'गिधाडे'च्या संदर्भात बोलताना तेंडुलकर एकदा म्हणाले होते– 'मला जसं आयुष्य दिसतं तसं मी मांडतो. मला अशाच प्रकारची माणसं भेटतात.' आपल्या कलाकृतींचं असं स्पष्टीकरण देणारे तेंडुलकर आपल्या अनुभवांची कटुता नाटकातील संवादात येऊ देत नाहीत. वेदना मांडतानाही ते विनोदाने त्याची तीव्रता कमी करताना दिसतात. यश आणि अपयश सारख्याच ताकदीने पचवणारे तेंडुलकर म्हणूनच आपल्यातील नवता ३० वर्षानंतरही टिकवू शकले.'

वि. भां.च्या या विधानांची कारणे प्रा. स. शि. भाव्यांच्या भाषणात आपल्याला सापडतात. भावे म्हणाले, 'कलावंताला इतर सामान्य माणसापेक्षा जास्त तीक्ष्ण व तप्त असा डोळा लाभलेला असतो. त्यामुळे त्याला आपल्या आवाक्या–कक्षेपलिकडचं दिसतं. ते मांडणं ही एक तपश्चर्याच आहे. ललितलेखन कथाकथन, एकांकिका हे सर्व वाङमयप्रकार तेंडुलकरांनी यशस्वीपणे हाताळले. यात केवळ स्वत:च्या fulfilment चा विचार त्यांनी महत्वाचा मानला. हेच त्यांचं सामर्थ्य आणि वेगळेपण असावं. यशाच्या मोजमापानुसार बदल न करता इतर वाङमयप्रकारात नसलेला Presence नाटकात आहे असे वाटल्याने ते नाटकाकडे वळले असावेत. form हे साधन मानले की कलावंताला

त्याची मर्यादा वाटण्याची शक्यता असते. परतु तेंडुलकरानी form हेच साध्य मानून नाटकात समक्षता ( Live presence ) आणली आपल्या नाटकातून तेंडुलकर बिन-चेहऱ्याचा माणूस शोधण्याचा प्रयत्न करताना दिसतात. 'सामान्यामधील असामान्यांचा वेध आणि असामान्यांतील सामान्याचा शोध,' असे त्याच्या नाटकाचे थोडक्यात वर्णन करता येईल.'

दारिद्रय, उपेक्षा, अपमान, अपयश यांची खत न करता सतत ३० वर्षं आपली लेखन तपश्चर्या करीत राहणाऱ्या कलावंताची समीक्षा आम्ही जुन्या ठराविक चाकोरीतून करत राहतो हे समीक्षक भाव्याना अन्यायाचं वाटतं. तेव्हा कोणताही पूर्वग्रहदूषित विचार न करता एक कलावत म्हणूनच समीक्षकाची भूमिका असणे आवश्यक आहे असा महत्त्वाचा विचार त्यानी आपल्या भाषणातून दिला.

शेवटी प्रा भावे म्हणाले,कमला, मित्राची गोष्ट, कन्यादान ही अलिकडची तेंडुलकराची नाटके पाहता ते स्वत च्याच शोकातिकेच्या formula त अडकून पडतात की काय असे वाटते; पण लवकरच ते त्यातून बाहेर पडतील असा आशावाद त्यानी व्यक्त केला.

समारोपाच्या आपल्या भाषणात डॉ. व. दि. कुलकर्णी यानी प्रथम डॉ. चद्रशेखर बर्वे यानी एक परिपूर्ण प्रबध लिहिल्याचे श्रेय त्याना दिले तसेच आधीच्या वक्त्यानी पुस्तकातील ज्या अपेक्षाचा उल्लेख केला त्याला उत्तरही दिले. प्रबधलेखनाची दिशा आणि कक्षा ठरलेल्या असल्याने त्याच त्याच्या मर्यादाही असनात, असे ते म्हणाले.

नाटककार तेंडुलकर असा विचार करताना तेंडुलकरानी स्वतःबद्दल सागितलेलं वाक्यच मला त्यांच्या नाटकाचे ब्रीद वाक्य वाटते. मी व माझी नाटके वेगळी नाहीत प्रत्येक नाटकाच्या वेळी माझा पुनर्जन्म होतो आणि हे खरही वाटतं तेंडुलकर नवा आशय अनुभवतात. तो जुन्या पठडीत, पारपारिक रूपात बसत नाही तेव्हा नव तत्र घडत. जन्म पावत हा जाणीवपूर्वक केलेला प्रयोग नसतो. गेली ३० वर्षे तेंडुलकर हे अनुभवतायत. हे त्याचे वेगळेपण आहे. मिळेल तिथून, मिळतील तितके अनुभव जमा करत, ते माडण्याच स्वातत्र्य घेत त्यांनी आपल्यातला 'मी' साभाळला हेच त्याच प्रमुख वैशिष्टय आहे

□

नाटककार तेंडुलकर यांच्याप्रमाणेच अधश्रद्धा हा एक बहुचर्चित, वादग्रस्त, उलटसुलट प्रतिक्रिया येणारा विषय. राजहस प्रकाशनातर्फे अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या या दोन्ही पुस्तकावर आधारित परिसवाद मात्र दुसऱ्या संस्थानी आयोजित केले होते. अधश्रद्धा विरोधी चळवळीतील कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोळकर यानी लिहिलेल्या 'भ्रम आणि निरास' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाबरोबरच त्याच पुस्तकावर आधारित 'अधश्रद्धेने ग्रस्त समाज' या विषयावर परिसवाद झाला.

गुरुवार दि. ३ ऑक्टोबरची संध्याकाळ. टिळक स्मारक मंदिराचे सभागृह बरेचसे भरलेले विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तीची उपस्थिती ही उल्लेखनीय बाब (पु. ल. पति–पत्नी, ग. बा. सरदार वगैरे)

महात्मा फुले समता प्रतिष्ठान व बुद्धिप्रामाण्यवादी मच याच्यातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अधश्रद्धा दूर करण्यासाठी ग्रथबळ हे प्रभावी साधन आहे आणि डॉ. दाभोळकरानी सतत लोकाशी संपर्क साधून, त्याच्या प्रतिक्रिया जाणून घेऊन, अनेक ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी करून मग या पुस्तकाचे लेखन केले असल्याने या पुस्तकाचे मूल्य आणखीच वाढले आहे. तेव्हा या पुस्तकाचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा, त्यानिमित्ताने लोकानी एकत्र येऊन चर्चा करावी म्हणून आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. या उपक्रमाची सुरुवात या प्रकाशनाच्या निमित्ताने परिसंवाद योजून केली आहे–असे सुरुवातीलाच प्रास्ताविकात सागितले गेले.

परिसवादाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाल्यावर डॉ. अनिल अवचट बोलण्यास उभे राहिले हे स्वतः अधश्रद्धा विरोधी चळवळीतील कार्यकर्ते. अनेक ठिकाणी यासाठी हिंडलेले–अंधश्रद्धेची पाळेमुळे किती खोलवर रूजली आहेत हे पाहून आलेले त्यामुळे स्वाभाविकपणेच भाषणात उदाहरणाची विपुलता डॉ. दाभोळकराच्या पुस्तकाचे स्वरूप सागताना ते म्हणाले– 'दाभोळकर स्वतः गभीर प्रकृतीचे असले तरी पुस्तकाची भाषा मात्र अत्यत सोपी व सरळ आहे. पुस्तकाची माडणी वैचारिक स्वरूपाची वाटली तरी अनेक अनुभवानी समृद्ध असे हे पुस्तक आहे. आजही महाराष्ट्रात कोणत्या रूढी, समजुतीचे साम्राज्य आहे याचे दारूण दर्शन आपल्याला निश्चितपणे थांबून विचार करायला लावते. हे वाचून आपले डोळे उघडले तर आज जे अत्याचार समाजात धर्माच्या नावाखाली चालले आहेत ते थाबण्याची शक्यता निर्माण होईल. तसेच हे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरेल असे हे पुस्तक आहे.'

'दाभोळकराच्या मते अधश्रद्धेची आणीबाणी असली तरी मला तर शतकानुशतके इथे अधश्रद्धेच अबाधित साम्राज्यच पसरलेल दिसतंय. त्याच कारण अस आहे की, सनातनी, प्रतिष्ठित, राजकीय लोकाचे हितसबध यात गुतले आहेत. स्वत च्या हितसबधासाठी हे लोक या समजुती, अधश्रद्धाना धक्का लागू नये म्हणून जपताना दिसतात. त्यामुळे यातून बहुजन समाजाला बाहेर काढण फार अवघड तर झालच आहे, पण धोक्याचंही झाल आहे. इतकं की कार्यकर्त्याला प्रसंगी जीव गमावण्याचीही तयारी ठेवावी लागते. इतक अधश्रद्धाचं सामर्थ्य आहे'–असे या चळवळीतले आणखी एक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव म्हणाले. 'राजकारण फक्त परिवर्तनाची भाषा बोलतं; परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करत नाहीच तर असा प्रयत्न करणारे पराभूत व्हावेत म्हणून त्याच बळही कमी करत. तेव्हा समाजाच्या तळागाळातून ही चळवळ उभी राहणं, सघटित होणं आणि शिक्षणाच्या माध्यमाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतला तर हे कार्य होण शक्य आहे' अस डॉ. आढाव यानी सागितलं.

आधीच्या दोन वक्त्याप्रमाणे प्रा. मे. पु. रेगे हे चळवळीत प्रत्यक्ष सहभागी होणारे कार्यकर्ते नव्हेत. त्यामुळे साहजिकच याचे भाषण तात्त्विक चर्चेकडे अधिक झुकलेले. श्रद्धेच्यासबधी विचार माडताना ते म्हणाले– 'अधश्रद्धा हा शब्द वापरताना डोळस श्रद्धा असते असे आपण गृहित धरतो का? मुळात श्रद्धा हा शब्दच आपण मानतो का हे आधी पाहणे आवश्यक आहे. अधश्रद्धेविरुद्धचा लढा डॉ. दाभोळकर आणि त्याचे सहकारी अत्यंत धैर्याने देत आहेत. पण आपल्या

समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अत्यंत गुंतागुंतीची आहे. ती प्रथम माहीत करून घ्यायला पाहिजे बहुजनसमाजाला संकलितरीत्या तर्कशुद्ध विचार करण्याची शिकवण, शिस्त आजपर्यंत लागलीच नाही. शिक्षणाशिवाय हा चिकित्सक, वैज्ञानिक दृष्टिकोन येणार नाही. समाजाच्या निकोप सांस्कृतिक जीवनासाठी हे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विज्ञानाची कास धरून समाजात असलेले दारिद्र्य, विषमता दूर होऊ शकेल असा दिलासा मिळण्याचीही समाजाला गरज आहे.'

'या विषयावर भरपूर वादविवाद होण्याची शक्यता आहे याची कल्पना असुनही मी या पुस्तकाचे लेखन केले. यामुळे लगेच समाजपरिवर्तन होणार नाही. ही तेवढी सोपी गोष्ट नाही याची मला पूर्ण जाणीव आहे; पण या पुस्तकाचा परिणाम म्हणून अंधश्रद्धेला विरोधी लढा देणारी काही माणसे तरी पुढे येतील असा मला विश्वास वाटतो. अर्थात अशा कार्यकर्त्याप्रमाणेच अंधश्रद्धेला बळी पडलेल्या लोकांनीही त्यातून बाहेर पडून आमच्यात सामील व्हावं हा आमचा या मागचा प्रमुख हेतू आहे.' असे पुस्तकाचे लेखक डॉ. नरेंद्र दाभोळकर म्हणाले. या विषयाचा त्यांचा अभ्यास आणि अनुभव खूप व्यापक स्वरुपाचा असल्याने हे कार्य किती कठीण आहे, त्याचे परिणाम किती अल्प प्रमाणात होणे शक्य आहे हे ते जाणून आहेत. त्यांनी समाजात प्रचलित अंधश्रद्धांचे तीन विभाग पाडले–एक, अज्ञानातून आलेली अंधश्रद्धा. याच्याशी लढा देणे, त्यांना तुलनेने सोपे वाटते. कारण त्यापोटी आलेल्या समजुतींचे दृश्य परिणाम लगेच दिसतात. कुत्रा चावल्यावर चौदा इंजेक्शने न घेता इतर गोळ्या घेणे. साप चावल्यावर मांत्रिकाकडे नेणे, पोलिओ झालेल्या मुलाला उकिरड्यात पुरून ठेवणे यांचे अनिष्ट परिणाम माणसाला अंधश्रद्धेपासून दूर न्यायला मदतच करतात, असे त्यांना वाटते. महाराष्ट्रात या बाबतीत अगदी प्राथमिक स्तरावर का होईना पण चर्चा सुरू झाली आहे, असे सांगून डॉ. दाभोळकर म्हणाले की, ही चर्चा, विचारांची देवाणघेवाण उघडपणे विस्तृत रूपात व्हावी. लोकांनी पुढे येऊन आम्हाला प्रश्न विचारावे असा आमचा



'मुंबईत सिद्धीविनायकापुढे लागणाऱ्या रांगा
मला अस्वस्थ करतात, अंतर्मुख करतात'–डॉ. दाभोळकर

प्रयत्न आहे. कारण याबाबतची टीका, चिकित्सा माणसाला अंतर्मुख करून अंधश्रद्धेपासून दूर नेते असा अनुभव आहे.

दुसरा प्रकार अध्यात्मातून आलेल्या अंधश्रद्धा. याच्याशी दोन हात करणे तुलनेने कठीण. कारण या स्वरूपातील अंधश्रद्धांना धार्मिक ग्रंथांचा आधार. तसेच या धर्मश्रद्धा तपासून पाहणेच समाजाला मान्य नाही कारण त्या मानलेल्याच असतात.

सामाजिक विषमतेतून–बेकारी, महागाई, असुरक्षिततेची भावना यातून अगतिकतेपोटी ज्या अंधश्रद्धा निर्माण होतात त्या दूर करणे ही सर्वांत अवघड गोष्ट आहे असे दाभोळकरांना वाटते. 'मुंबईत सिद्धीविनायकापुढे लागणाऱ्या रांगा मला म्हणूनच अस्वस्थ करतात, अंतर्मुख करतात' कारण त्यावरचा इलाज माझ्याकडे नसतो. तरीही वास्तवाला सामोरे जाण्याइतके मानसिक बळ देण्याचा आम्ही प्रयत्न करू. हे परिवर्तन दूरचे वाटले तरी असंभाव्य मात्र नाही.'

'डॉ. आढावांनी म्हटल्याप्रमाणे अंधश्रद्धा, लोकभ्रमांचे पालनपोषण हे सामाजिक, राजकीय हितसंबंधच करतात. असा इतिहासच आहे,' असे समारोपाच्या आपल्या भाषणात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले. 'आपलाच नाही तर सगळीकडेच धर्म आणि विज्ञान यांच्यातील विरोधाने भरलेला इतिहास आहे. उदाहरण पाहायचे तर युरोपचा इतिहास काय सांगतो ते पहा. जातिभेदावर आधारलेली अंधश्रद्धा विलक्षण सामर्थ्यशाली आहे. जोतिबांनी हल्ले चढवलेल्या सर्व गोष्टी आम्ही त्यांचे उत्सव साजरे करत आलो तरी जपल्या आहेत. हिंदू विषमता आम्ही जशीच्या तशी राखली आहे.'

धार्मिक श्रद्धा या तपासून पाहायच्या नसतात कारण अनेकदा त्या अनुभूतीतून, साक्षात्कारातून आलेल्या असतात. विज्ञानाला अजूनपर्यंत न उलगडलेली काही मूल्ये आपण मानतो, अनुभवतो, कारण ती सुखकारक असतात. अशी काही श्रद्धा मानण्यास हरकत नसावी' असेही त्यांनी सुचविले.

२१ व्या शतकाला सामोरा जाणारा माणूस वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करणारा असण्याची गरज आहे. शिक्षण पद्धती आणि अभ्यासक्रम यांच्या माध्यमातून बुद्धिप्रामाण्यवाद, चिकित्सक वृत्ती निर्माण करणे शक्य आहे आज याची साधने अपुरी आहेत. हे जरी खरं असलं तरी या चळवळीतील कार्यकर्त्यांनी बुद्धिवादावर आपले विचार केंद्रित करून कार्य केल्यास अशक्य मात्र नाही, असा आशावाद शेवटी तर्कतीर्थांनी व्यक्त केला.


–सौ. शलाका सोमण

# “माझं जीवन हाच माझा संदेश”

सत्य
अहिंसा
शांति
प्रेम
सहिष्णुता
निर्भयता
समता
साधेपणा
स्वदेशी

गांधीजींच्या दृष्टीनें हे निव्वळ शब्द नव्हते की आणखी कशाचे द्योतकहि नव्हते. त्यांच्या प्रत्येक कृतीचे, प्रत्येक कार्याचे ते निकषच होते. त्यामुळेच तर त्यांचं जीवन, मानवी मूल्यांचं सार ठरलं आणि प्रत्येक उच्चार, खरोखरीचा संदेश ठरला.

**आपल्याला सदैव प्रेरणा देत राहील असा हा मंत्र**



## शेअरबाजार

पृष्ठ ४ वरून

वाटते. कारण गेल्या काही महिन्यात इतर व्यवसायामधील पैसा शेअर बाजारातील तेजी बघून शेअर व्यवसायात आला होता तो आता आपल्या मूळ क्षेत्राकडे वळू लागल्याचे जाणवत आहे असे दलालाना वाटत आहे. प्रामुख्याने सोने–चादी व्यवसायातील पैसा परत मुळच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर फिरला आहे, आणि सोने–चादी बरोबर शेतकी व्यवसायातील पैसाही मोठ्या प्रमाणावर शेअर व्यवसायाकडे वळला हाता व तो सुद्धा आता माघारी जाऊ लागला आहे एकदा का हा पैसा परत मूळ व्यवसायाकडे गेला की त्याला परत खेचणे जिकिरीचे होईल. ही खत एका दलालाने बोलताना व्यक्त केली.

शेअर बाजारातील दैनंदिन व्यवहार जरी नरमाईत असले तरी नवीन इश्यूचा जोर मात्र आहे तसाच आहे नवीन इश्यूना लोकाकडून अजूनही उदड प्रतिसाद मिळत आहे व तो यापुढे कायम मिळत राहणारच अशी लक्षणे आहेत याच सदर्भात रिलायन्स टेक्सटाइल या उद्योगाने विक्रीस काढलेले १५ टक्के व्याजाचे अपरिवर्तनीय कर्जरोखे, लोकाचा नवीन 'इश्यू' असलेला उत्साह दाखवून गेले. या उद्योगाने हे कर्जरोखे दोन महिने विक्रीस ठेवले होते व या कर्जरोख्यामार्फत उद्योगाने ३७० कोटी रुपये जमविले. टाटा बरोज या उद्योगाने समभाव व त्याना जोडून कर्जरोखे असा 'इश्यू' काढला होता मूळ 'इश्यू'च्या ९० पट भरणा झाला. पैसे भरण्याची मुदत केवळ तीन दिवस असूनसुद्धा या उद्योगाने या कालावधीत १५० कोटी रुपये जमविले

रिलायन्स टेक्सटाइल या उद्योगाचे कर्जरोखे हे अपरिवर्तनीय असले तरी पुढेमागे त्याचे समभागात रुपातर करून मिळेल या लोकांच्या आशेमुळे त्याना यश मिळाले. तर टाटा बरोज हा एक यशस्वी उद्योग त्यामुळे त्याना एवढे यश मिळाले. या यशस्वी उद्योगांबरोबर नवीन उद्योगाना लागणाऱ्या भाडवलाबाबतीतही लोकाचा उत्साह अजूनही तोच आहे, ही मात्र आनदाची बाब. समभाग-रोखे याच्यातील गुतवणुकीबाबतची अधिकृत आकडेवारी आता उपलब्ध झाली आहे. रिझर्व बँकेच्या नवीन वार्षिक अहवालात या संबधित अनेक आकडे व अंदाज आहेत. ८३–८४ मध्ये उद्योगाच्या समभाग-रोखे विक्रीतून ९४१ कोटी रुपये जमा झाले तर ८४–८५ मध्ये १३३६ कोटी रुपये. तर चालू वर्षात ही वाढ गतवर्षीच्या दुपटीनी होईल असा अदाज आहे गेल्या वर्षभरात बिगरसरकारी भाग भाडवलात २१ टक्क्यानी वाढ झाली. ८३ सालात केंद्र सरकारने १०५५ इरादापत्रे मजूर केली तर ८४ मध्ये १०६४. चालू वर्षात हा आकडा मोठ्या प्रमाणावर फुगलेला आढळेल. सहाव्या पचवार्षिक योजनेत ५.५ टक्के दराने उद्योगिय उत्पादन वाढले. ते सातव्या योजनेच्या काळात ७ टक्के दराने वाढवण्याचे योजिले आहे. कारण तसे झाले तरच नवीन गुतवणूक फायदेशीर ठरू शकेल. वित्तीय सस्थाकडे कर्जासाठी मागणी करणारे २९२ उद्योग होते या २९२ उद्योगानी गतवर्षी सव्वा तीन हजार कोटी रुपयाच्या कर्जाची मागणी केली होती. ८३ सालच्या तुलनेत गतवर्षीच्या कर्जाच्या मागणीत झालेली वाढ बरीच जास्त होती. ८३–८४ मध्ये समभाग वा रोखे विक्रीची परवानगी ४७२ उद्योगाना दिली होती ८४–८५ मध्ये ७१२ उद्योगाना ही परवानगी मिळाली तर चालू वर्षात हा आकडा '१५००' च्या घरात गेला तर नवल नाही.

नवीन भाडवल गुतवणुकीत दिसणारा उत्साह–शेअर बाजार तेजीतून नरमाईकडे झुकलेला असूनसुद्धा–स्तुत्य आहे. वित्तीय सस्थांनी समभागाची मोठ्या प्रमाणावर विक्री करून वाढणाऱ्या फुग्यातील हवा काढून घेतली तेसुद्धा स्तुत्यच आहे सध्याच्या नरमाईच्या परिस्थितीत विशेष फरक येत्या काही दिवसात पडेल असे वाटत नाही. परतु काही दलालाना अजून आशा आहेत. ते म्हणतात...वित्तीय सस्थाची विक्री पूर्ण थांबू देत, मग बघा कशी तेजी येईल...सध्याचा नरमाईचा काळ हीच खरेदीची खरी सधी आहे.

—विनायक गोखले

## महाराष्ट्र राज्य लॉटरी
# सर्वसामान्यांचं काय ?

रौप्य महोत्सवी वर्षात मोठ्या ठमक्यात महाराष्ट्र राज्य लॉटरी वाटचाल करीत आहे शासकीय यत्रणा किंवा नियत्रणाचे त्यामुळे खरोखरीच कौतुक वाटते. हिचे किती गुण वर्णन करावेत ? महाराष्ट्र शासन ही लॉटरी स्वतःच चालविते, ठरलेल्या दिवशीच लॉटरीची सोडत काढली जाते, सोडतीचे कामकाज स्वतत्र पचमडळाच्या देखरेखीखाली व लोकाच्या उपस्थितीत होते, सोडत कुणालाही विनामूल्य पहाता येते, दरमहा १५ व्यक्ती लखपती होतातच, बक्षिसाची रक्कम विनाविलंब दिली जाते, सचोटी, निर्दोष सोडत पद्धती, बक्षिसाचे झुकते माप यामुळेच महाराष्ट्र राज्य लॉटरी दिमाखाने उभी आहे.

यात खरोखरीच काही वाद नाही महाराष्ट्र राज्यात गेल्या पचवीस वर्षात किती जरी मन्त्रिमंडळे गडगडली असली, राजकारणात कितीही उलथापालथ झाली असली किंवा अन्य कितीही गैरकानूनी व्यवहार झाले असले तरी म. रा. लॉटरी आपले कामकाज मोठ्या डामडौलात चालवीत आहे. त्यापूर्वी सामान्य जनतेमध्ये 'आकड्यावर' खेळ चालत. हजारो लोकाचे लक्षावधी रुपये यात मातीमोल व्हायचे आकडेसम्राटाचे राज्य त्यासाठीच सरकारने निपटून काढले. जनतेमधील 'आकडेबाजी' नष्ट केली आणि त्याचे आकर्षक आणि जनताभिमुख स्वरूप महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या रुपात वावरू लागले लोकाची तशी आकडेबाजी जरी बद झाली असली तरी तिकिटावरील आकड्याचे काही आडाखे लोकानी आपआपल्या समजुतीने सुरू केले महाराष्ट्र राज्य लॉटरीमधून होणारा नफा महाराष्ट्राच्या विकासाकरिताच वापरला जाईल, जनतेचे कल्याण साधले जाईल या अर्थी सुरुवातीस बराच प्रचार झाला. आता गेल्या २४–२५ वर्षात या विभागाने किती नफा मिळविला व त्यातील कितीसा भाग राज्य विकासाकडे वळविला व त्यामुळे सामान्य जनतेला किती लाभ झाला हे कळणे आवश्यक आहे. भले तो नफा धरणाच्या कामी वापरला असो कि तो दुसऱ्या कोणत्या विधायक कार्यक्रमासाठी वापरला असो, पण त्याची माहिती जनतेस मिळणे आवश्यक आहे सर्वसामान्य लोकाच्या थोड्या थोड्या पैशानी चालविलेली ही लॉटरी शेवटी राज्य विकासास किती उपयुक्त झाली व त्यामुळे महाराष्ट्र राज्य किती प्रगति पथावर गेले हे कळले तर जनतेलाच मिळेल असे नाही का वाटत ? मग महाराष्ट्र राज्य लॉटरीचीच तिकिटे का घ्यायची ?

—श्री. आ. मांडके

चित्रपट

# 'बेपनाह' सारंच अमर्याद !

हिंदी चित्रपटाना हिंसेशिवाय करमत नाही हेच खरं ! नाही तर एका बाजूला 'प्यार झुकता नही', 'प्यारी बहेना', 'सागर'सारख्या मारधाडविरहित प्रेमकथा यशस्वी होत असताना 'मिसाल' किंवा 'बेपनाह' सारख्या हिंसेला प्राधान्य देणारा चित्रपट काढायच्या वाटेला कुणी गेलं नसत. 'बेपनाह' हा हिंसाप्रधान चित्रपटातला ताजा चित्रपट तर नावाप्रमाण सगळ्याच बाबतीत अमर्याद आहे. या ना त्या प्रकारानं मारामाऱ्या, खून दाखवण्याच्या प्रयत्नात-कथा नावाची गोष्ट महत्त्वाची असते याचा दिग्दर्शकाला विसरच पडल्यासारखा वाटतो.

दद्दू उर्फ दयाशकर (कादरखान) हा गुन्हेगारी जगताचा राजा. कायद्यालासुद्धा तो आपल्या मर्जीप्रमाणे हवा तसा वाकवू शकत असतो. त्यानं निर्माण केलेल्या अनभिषिक्त साम्राज्याचा वारसदार असतो त्याचा नातू बबुआ उर्फ बजरग (मिथुन चक्रवर्ती) हे साम्राज्य नष्ट करणं पोलिसाना शक्य होत नसत. पण शेवटी रवी मल्होत्रा (शशीकपूर) नामक एक तरुण ऑफिसर (आता हा ऑफिसर प्रत्यक्षात तरुण दिसत नसला तरी चित्रपटाच्या सोयीसाठी प्रेक्षक त्याला तरुण समजून घेतात ) हे आव्हान स्वीकारतो.

दरम्यान त्याची ओळख भावना भारद्वाज (रती अग्निहोत्री) नामक एका सुदर वकिलाशी होते. आणि हिंदी चित्रपटाच्या नियमाना अनुसरून फारसं फूटेज वाया न घालवता ती दोघं प्रेमात पडतात. थोड्याशा भावनिक संघर्षासाठी बजरंगही भावनाच्याच प्रेमात पडलेला दाखवलाय ती अर्थातच त्याला प्रतिसाद देत नाही उलट धिक्कारत राहते.

या त्रिकोणाचा चौथा कोन बनून येते कल्पना (पूनम घिल्लन ) रवी मल्होत्राला वडिलाची शेवटची इच्छा म्हणून तिच्याशी लग्न कराव लागत. त्यामुळ भावनाला धक्का. आणि होणार मूल ती एकटीनं वाढवायचा निर्णय घेते. दरम्यान दोन-तीन केस जिकल्याच्या आधारावर तिन मोठा बगला वगैरे उभारलेला असतो. बजरगच तिच्याकडे येणं आणि 'मैं तुमसे टूटकर प्यार करता हूँ' वगैरे चालूच असतं.

दरम्यान बजरगाच्या गँगचे वकील (मदन पुरी) आणि बजरंग याच्यात सघर्ष निर्माण होतो आणि वकिलाने बजरंगाचा काटा काढण्यासाठी रचलेल्या कटात त्याचे आजोबा दयाशकरच बळी जातात लगेच बजरग त्या वकिलाचाही काटा काढतो. इथपासून पुढं खून, मारामाऱ्या जरा जोरात सुरू होतात.

जॅक (मजहरखान ) हा लहान मुलगा पळवून नेणारा गुन्हेगार भावनाशी पूर्वी असलेल्या वैमनस्यातून तो तिच्या मुलाला पळवून नेतो. या वेळेस बजरग तिच्या मदतीला येतो. त्या मुलाला वडील म्हणून आपल नावही देतो. इकडे बजरगच्या आपल्या गँगकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे त्याचे लोक त्याच्यापासून फुटतात मग चित्रपटभर चाललेली हाणामारी अपुरी होती अस वाटल्यावरून शेवटची धुमश्चक्री त्यात बजरग, कल्पना आणि इतर वीस-पचवीस जण खतम् होतात

चित्रपटातला शेवट हाच चित्रपटातला वेगळेपणा. शेवटी नाही तरी रवी आणि भावनाच त्याच्या मुलासह जिवत राहिलेले असतात त्यामुळ त्याना एकत्र दाखवण दिग्दर्शकाला सोप होतं. त्याऐवजी रवी मल्होत्रान पुढ केलेला हात नाकारून भावना मरणोन्मुख बजरगकडेच जाणं अधिक पसत करते अस दाखवलय

पण एवढं सोडल तर बाकी सगळा आनंदच आहे चित्रपटभर हाणामारी आहेच, पण मधेच हे फार होतय अशी दिग्दर्शकाला जाणीव झाली की भावनात्मक प्रसंग टाकले आहेत. या दोन्हीचीही सागड व्यवस्थित घालता आलेली नाही सुरुवातीला उजागर या बजरगच्या सहकाऱ्याच प्रकरण इतक लाबवलय की त्यातच जवळजवळ निम्मा चित्रपट जातो मग एकदम रवी, भावना, कल्पना हा त्रिकोण. या वेळेस गुन्हेगारी जगत पूर्णपणे अदृश्य होत. उरलेल्या वेळात मारामारी 'टाइमपास' म्हणून आहेच

खरोखर चित्रपटभर सर्व मंडळी हाणामाऱ्या का करत असावीत हे कोडं शेवटपर्यंत उलगडत नाही सतरा रिळाच्या या चित्रपटातली बहुसख्य रिळ त्यापायीच खर्ची घातली आहेत. हिंसाचार हा बहुतेक हिंदी चित्रपटातल आवश्यक अग आहे पण यातला हिंसाचार उबग आणि किळस आणणारा आहे

चित्रपटाचे सगीतकार म्हणून खय्यामच नाव आहे खर; पण ते नाव बघून झालेला आनद फार काळ टिकत नाही चित्रपटभर कुठेही त्याचा ठसा जाणवत नाही.

कलावतापैकी लक्षात रहातात ते मिथुन चक्रवर्ती आणि रति अग्निहोत्री अर्थात या दोघानीही लक्षणीय कामगिरी करूनही चित्रपट सावरण्यात त्याचा फारसा उपयोग झालेला नाही हा भाग वेगळा. मिथुनने गुन्हेगारी जगतात पूर्ण बुडालेला तरीही मनाचा कोवळेपणा शिल्लक असणारा बजरंग चांगला खुलवला आहे रतीही चागल्या अभिनयाबरोबरच चांगल्या दिसण्यामुळेही लक्षात रहाते.

शशीकपूर आणि पूनमबद्दल मात्र फारस बोलण्यासारखं नाही. अभिनयाचं जाऊ दे, पण शशीकपूरच आतापर्यंतच पडद्यावरचं दर्शन तरी सुखद असायच पण या चित्रपटात आडमाप वाढल्यामुळ त्याच नाचणं, मारामाऱ्या करण डोळ्याना त्रास देणारच ठरतं. पूनमला तिच्या भूमिकेत काही वावच नाही संपूर्ण चित्रपटभर ती दिसलीयेही अगदी मलूल, निस्तेज, त्यामुळ तिचा काहीच प्रभाव पडत नाही.

कादरखानचा दयाशकर जेव्हा नेपोलियनची वाक्य बडबडायला लागतो तेव्हा हा आता हाताबाहेर जाणार की काय असं वाटायला लागत. पण त्याला वेळीच चित्रपटाबाहेर घालवून निदान एक त्रास तरी कमी केल्याबद्दल दिग्दर्शकाला धन्यवाद द्यायलाच हवेत

—सीमा कुलकर्णी


इकडे रेडियोवर पुल ' जिंकू किंवा मरू ' गात असायचे. तिकडे बिर्ला मातुश्रीत चाळीचे प्रयोग हाऊसफुल्ल जात असायचे. ' व्यक्ती आणि वल्लीला ' ॲकेडमी ॲवॉर्ड मिळालेलं असायचं. पद्मश्रीची महिरप बघता बघता चढलेली असायची. रेडियोवर त्यांची भाषणं व्हायची, सभासंमेलनांची अध्यक्षपदं त्यांच्यामुळे शोभिवंत व्हायची. इतक्या सगळ्या माध्यमांमधून एकाच वेळी झळकणारे पुल मात्र ती काही वर्षं मला ' माझे ' वाटायचे ! एकाच वेळी देव्हाऱ्यातही असायचे आणि अवतीभोवतीही विहरायचे. ही किमया त्यांची ? माझी ? की त्या वयाचीच ? त्यानंतर पुलंविषयी इतक्या लोकांनी इतकं काही लिहिलंय की आता ती एक व्यक्ती (किंवा वल्ली) उरलीच नाही. ती एक ' लिव्हिंग लीजंड ' झालीये ! चालतीबोलती दंतकथा ! पण ही दंतकथा आमच्याच डोळ्यांसमोर घडली ना ? कळतनकळत आम्ही ती घडवण्यात हातभार लावला ना ? कधीही न भेटलेली, बोललेली व्यक्ती आपली कशी वाटते ? भाबड्या वयात केलेला हीरोवरशिपचा हा मागोवा !



## -तुझे पुल

मंगला गोडबोले

## माणूस दिवाळी अंकात



पठ्ठे बापूराव बाटले की बाटले नाहीत ?
ते महार की ब्राह्मण ?
वाद त्या काळी भलताच रंगला.
त्यावरून मारामाऱ्या झाल्या.
प्रकरणे कोर्टात गेली.
शेवटी याचा निकाल थेटरात लावायचे ठरले.

त्या दिवशी थेटर गर्दीने ओसंडून चालले होते.
पठ्ठे बापूराव गर्दीतून कशीबशी वाट काढत रंगमंचावर आले.
सोबत पवळा तमासगिरीण.

बापूरावांनी आतून शिजवलेल्या अन्नाचे ताट मागवले.
रंगमंचावर दोन पाट माडले.
आणि सगळ्या गर्दीच्या समोर पवळाने बापूरावांच्या तोंडात घास घातला.

लगेच वातावरणाचा भेद करीत एक लावणी कडाडली...

श्रेष्ठवर्ण मी ब्राह्मण असुनी
मशाल धरिली हाती तमाशाची
लाज लाविली देशोधडी.
कलियुगाचा ऐका दाखला
पठ्ठे बापूराव भुलला पवळीला
महारणीसाठी महार झाला
पुन्हा जात मिळेल का हो त्याला ?

# तमाशाने झपाटलेले वादळ
# पठ्ठे बापूराव

## लेखक – प्रा. द. ता. भोसले

# माणूस दिवाळी अंकात